म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २७५९



वाङ्मयशारदेचे नूपुर



REFBK-0022702

सौ. मालती दांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

24 OCT 1979

24 MAY 1987

(क्र. मा. प.)

संदर्भ शारदा
निबंध
२७५९
२२७०२
२६।९।५९

वाङ्मयशारदेचे नूपुर

सौ. मालती दांडेकर

REFBK-0022702

'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

प्रकाशक :
ह. अ. भावे
वरदा बुक्स
'वरदा' सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६.

© सौ. मालती दांडेकर

पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९७९

मुखपृष्ठ : अनंत सालकर

किंमत : चौदा रुपये

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

अर्पण–
ती. महादेवशास्त्री जोशी
यांसी आदरपूर्वक–

सौ. मालती दांडेकर



मनोगत

'लोकसाहित्य' हा साहित्याच्या विशाल प्रांतातलाच एक वेगळा विभाग. या लोकसाहित्याचा परिचय रसिकतेने व नव्याने करून देण्याचे महत्त्वाचे कार्य आज अनेक नामवंत लेखक निष्ठेने करीत आहेतच, त्यामुळे लोकसाहित्याच्या सर्वच शाखांवर तजेलदार सौंदर्याचा पुष्पबहार उमललेला दिसून येतो. त्यातल्याच काही लोकसाहित्यप्रकारांचे माझ्या अनुभवाला आलेले, प्रतितीला जाणवणारे हे रूपलेख.

मराठी लोकसाहित्याचा आणि माझा मैत्रपणा आजकालचा नव्हे, तो अनेक वर्षांचा-सरासरी तीन तपांचा आहे. तेव्हांपासूनच लोककथा, उखाणे, म्हणी, जुनी स्त्रीगीते, लोकगीते, ओवीगीते, इत्यादिंचे संकलन व अध्ययन मी हौसेने व निष्ठेने करीत आले आहे, त्यात मला अधिक आनंद लाभतो– आणि तेव्हांपासूनची ही जिव्हाळ्याची संगतसोबत आजतर रेशीमगाठी पडाव्या तशी दृढतर झालेली आहे.

या तीन तपात, लोककथा, गोंधळाच्या कथा, रूखवताचे उखाणे व गाणी, जात्यावरील लोकगीते, जुन्याजुन्या म्हणी व वाक्प्रचार, 'उत्तर' विचारणारे उखाणे तसेच पतिनाम गुंफलेले ग्रामीण उखाणे, 'माजघरातील गाणी' या नावाने ओळखली जाणारी जुन्या स्त्रियांची भाविक गाणी, अशा अनेक प्रकारच्या लोकसाहित्याचा सातत्याने व उत्कटतेने मला अभ्यास घडला, त्यापैकीच काही प्रकारांचा हा विशेष परिचय आज 'वाङ्मयशारदेचे नूपुर, या लहानशा पुस्तकात मी देत आहे.

मी ग्रामीण विभागांतच वर्षानुवर्षे राहिलेली, तेव्हा मैत्रिणीही बहुतांशी

ग्रामीण, मराठमोळा व कामकरी वर्गांतल्याच असाव्यात, हेही साहाजिकच. या पुस्तकांतील अनेक लेखांचें मूलधन मला त्यांच्याकडूनच मिळाले, जुनी मौलिक स्त्रीगीते, गीतरूपक, इत्यादितील जुनी गेय गीते मध्यमवर्गीय वृद्ध स्त्रीजनांकडून मी अगत्याने मिळवली; लोककथांचे संकलनही माझ्या ग्रामीण रहिवासातच झाले, तेथेही काही कथा सांगणारे लोक होते. त्यांनी व अनेक वृद्ध स्त्रियांनी हे कथासाहित्य मला अगत्याने दिले, परप्रांतीय कथांचे वाचन तर नित्याचेच !! तसेच देवीचा गोंधळ, हा सांस्कृतिक, धार्मिक स्वरुपाचा एक गीतकथाप्रकार, तोही खेड्यांतून कार्यप्रसंगानुसार बऱ्याच ठिकाणी आज साजरा होतो, तोही वरचेवर ऐकण्याचा योग आला. ह्या सर्वांचेच प्रतिबिंब ह्या पुस्तकातील लेखांतून वाचकांना आढळून येईल. हे सर्व साहित्य देणारी मंडळी अनेक; व्यक्तिशः त्यांचे आभार मानणेही कठीण, पण त्या सर्वांची मी ऋणी आहे व राहीन.

मात्र 'ग्रामीण स्त्रीची ओवीगीते' या माझ्या प्रिय विषयावरचा लेख यात मी दिलेला नाही, हे खरे; पण ती धनसंपदा एवढी समृद्ध व अतूट आहे की, त्यावर स्वतंत्रच दोन पुस्तके मी लिहीत आहे ! छोट्या लेखापेक्षा तेच योग्य, नाही काय ?

एक सांगायला हवं, इतर भारतीय भाषा, व पाश्चात्य देशांच्या भाषा व पाश्चात्य देशाच्या भाषा यांचेही राज्य लोकसाहित्याने चांगले समृद्ध आहे. त्याचाही परिचय अनेक साहित्यिकांच्या लेखनातून घडला, त्यातला 'उत्तराचे' उखाणे, हा प्रकार अगदी आपल्याकडच्या तशा उखाण्यांप्रमाणेच मनोरंजक वाटला म्हणून 'दूरदेशचे उखाणे' हा एक त्याबद्दलचा लेख या पुस्तकात मी दाखल केला, आहे तो वाचकांना नाविन्याने आवडेलही असे मी गृहीत धरते.

हे सर्व लेख मी शक्य तेवढे आटोपशीर, रंजनप्रमुख व लहानथोर, सर्वांनाच वाचावेसे वाटावे, अशा हेतूनेच लिहिले आहेत. अर्थात ह्यातून त्या त्या विषयाची वैपुल्याने माहिती अगर पुष्कळसे संकलन देता येणे शक्य नव्हतेच, पण केवळ 'वानगी' म्हणूनच हे लोकसाहित्याचे भिन्नप्रकार मी रसिक वाचकांसमोर सादर केले आहेत–

आणि या रंजनप्रमुखतेला, व सानुल्या देहरूपाला-उद्देशूनच मी या त्यांच्या संकलित रूपाला 'नूपुर' म्हणते आहे. होय नूपुरच ! पण ते वाङ्मयशारदेच्या पदकमलावर शोभणारे!! त्यांची ही मृदु, मंजुळ रुणझुण लोकसाहित्यप्रेमी वाचकांच्या मनाला रिझवील अशी आशा करावीशी वाटते.

बी– ९ स्टाफ कॉलनी
M. R. E. कॉलेज
जयपूर ३०२००४
१० जुलै १९७९

सौ. मालती दांडेकर

अनुक्रम

	पृष्ठ
१) वाङ्मयशारदेचे नूपुर	१
२) उखाणेच पण दूरदेशचे !	१६
३) उदो उदो ग अंबाबाई !	२५
४) अशा लोककथा आणि अशी रंजकता.	३५
५) जुनी मौलिक स्त्रीगीते	५०
६) जानपद उखाणे	६५
७) गीतरूपक	७७
८) असे हे संगीत रंगीत रूखवत	९१
९) लोकसाहित्यातील विनोद	१०७

१ : वाङ्मयशारदेचे नूपुर

म्हणी

नूपुर ! रुणझुणण्याची लाडकी किणकिण करून आपल्या नाजुकशा कुसरीच्या घडाईने मन आकर्षित करून घेणारा व सुंदर पदकमलांची शोभा वाढवणारा हा छोटासा अलंकार, त्याची उपमा मला द्यावीशी वाटते ती, या लोकसाहित्यातील म्हणी, वाक्प्रचार व कूटप्रश्न या छोट्या छोट्या वाङ्मयप्रकारांना. वाग्देवतेच्या अंगावर अनेक सुंदर वाङ्मयभूषणे शोभतात, तसे हेही अलंकार तिच्या पदतली सुरेल रुणझुण करून रसिकाचे चित्त वेधून घेत असतात.

लोकसाहित्यातले लोककथा, पोवाडे, लोकगीते, कथाकाव्ये, इत्यादींच्या तुलनेने पाहिलं तर म्हणी व वाक्प्रचार हे अगदीच अल्प व्याप्तीचे– किंबहुना यांचा आटोपसरपणा हेच तर यांचे प्रमुख वैशिष्ट्य ! पण यातले वाङ्मय-गुण मात्र लहान वा इतकेसे नसतात. उदाहरणार्थ, मराठींतल्या म्हणींचीच प्रकृती पाहाना– म्हण म्हणजे काय ? तर अगदी थोडक्या पण समर्पक शब्दांत बोलणाराच्या शब्दांना दुजोरा देणारे वाक्य, असे स्थूल मानाने म्हणता येईल– स्थूलमानाने म्हणण्याचे कारण असे की, वाक्य म्हटले तर कर्ता, कर्म, क्रियापद इत्यादी सारे अवश्य आहे व असते– पण म्हणींतून पुष्कळदा कर्ता क्रियापद वगैरे प्रत्यक्षात न येता फक्त सूचितच केलेले आढळते. कारण एकच. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त

करणे हेच म्हणीचे प्रमुख लक्षण, तेथे मग सूचकतेलाच प्राधान्य मिळणे सहजच. या संदर्भात पुढील काही उदाहरणे पाहण्याजोगी आहेत–

घराला नाही कौल रिकामा डौल ! – कर्ता अदृश्य)

उधारिचं पोतं सव्वा हात रितं ! –(क्रियापद अदृश्य)

म्हणीची व्याख्या

दुखणं जोरावर–पथ्य शेरावर ! – कर्ता क्रियापद दोन्हीही केवळ सूचित केलेली.

यातही एक गोष्ट नजरेत भरणारी आहे, ती ही की, ठसकेदार भाषा आणि सयमक रचना, हीच दरेक म्हणीची प्रधान अंगे दिसतात, म्हणूनच की काय, काही प्रसिद्ध साहित्यिकांनी हिची व्याख्या करतानाही गमतीने अनुप्रासयुक्त ललित भाषा वापरलेली दिसते. न. चिं. केळकर यांनी 'चिमुकले, चतुरपणाचे व चटकदार वचन' अशा तीन 'च'कारात म्हणीचे लक्षण सांगितले, तर नी. शं. नवरे यांनी, म्हण ही 'सूचक, समंजस व सुटसुटीत' असली पाहिजे अशा तीन 'स'कारात म्हणीचे रूप प्रकट केले आहे. आणि एका इंग्रजी ग्रंथकाराने तर म्हण ही सुईसारखी 'शॉर्ट, शार्प ॲन्ड शाइनिंग' असते असे सांगून तीन 'श'कारही व्यक्त केले आहेत !

या चटकदार म्हणींची रचना अनुभवाच्या पायावर झालेली, त्यामुळे त्यांत जनरीत, मनुष्यस्वभाव, समाजदर्शन, व व्यवहार यांचीच वर्णने किंवा लक्षणे बहुतांशी वर्णित केली जातात, पण किती थोडक्यात ? लघुनिबंधाप्रमाणेच म्हणीचे सारे न्यारे सौंदर्य तिच्या चिमुकल्या पण ऐटबाज बांध्यातच असते ! बोलभाषेतल्या हजारो म्हणी, लहानपणापासून माणसाच्या कानी पडत असतात. आणि त्या बहुधा स्त्रीवर्गाच्या जीभेवर अधिकच खेळत असतात. अशा या म्हणी कोणी रचल्या हे मुळीच सांगता येणार नाही, पण त्या पूर्वापार असून परंपरेने चालत आल्या आहेत एवढे खरे. बोलभाषांतून त्या अगदी चपखल बसलेल्या आहेत. देह इटुकला असूनही त्यांना भाषेच्या जडणीघडणीत बरेच मोठे स्थान आहे हेही लक्षात घ्यायला हवेच.

म्हण ही गद्यात्मक खरी, पण पद्याचेही काही गुण तिच्या ठायी असतात. उदाहरणार्थ, अनुप्रास, यमक, इत्यादी काव्यलक्षणे तिच्या इवल्याशा व्याप्तीतूनही प्रकटलेली दिसतात. सयमक शब्दरचना हे म्हणीचे एक आगळे वैशिष्ट्यच असते म्हणा ना ? म्हण चार शब्दांची असो की दोन वाक्यांची

असो, पुष्कळदा यमक त्यातून जोडीच्या बिलवरांसारखे खण्कन् वाजून, नाद व साद द्यायला सिद्धच ! अगदी साध्या साध्या– 'करावे तसे भरावे,' 'ज्याचं जळतं त्याला कळतं,' 'आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास,' 'आपला हात, जगन्नाथ,' इत्यादी म्हणींतून या सयमक रचनेची साक्ष पटते. म्हणीची रचना करणारांनी तिचे अंत्य शब्द एकमेकांशी जुळते असावेत असा एक अलिखित संकेत स्वत:ला घालून घेतलेला दिसतो खराच.

म्हणीतून यमके अशा प्रकारे अधिकांश वापरली जाण्याचे कारण म्हणजे पाठांतराला, सयमक रूप अधिक सुलभ व पोषक ठरते हे होय. म्हणी लक्षात राहतात त्या बहुधा यावरील प्रकारच्या जुळत्या-मिळत्या शब्दांच्या यमकांनीच आणि त्यांची मौखिक परंपरा आजवर चालत आली आहे, टिकाव धरून राहिली आहे, तीही या समयक रुपांनीच.

परंतु काही वेळा समयक पदर जुळले जाण्याएवढीही छोटच्या म्हणींत जागा नसते, तेथे अनुप्रासयुक्त अगर समान शब्दांच्या उच्चाराने नाद-माधुर्य साधल्याचीही उदाहरणे सापडतात, तशी, ही कितीतरी उदाहरणे :–

१. अति तेथे माती.
२. आयत्यावर कोयता.
३. उडत्याचं जाणील तर पडल्याचं काय ?
४. सख्खे भाऊ–पक्के दाईद.
५. देश तसा वेष.
६. भुकेला कोंडा अन् नीजेला धोंडा.
७. कामापुरता मामा.

अशा शेकडो म्हणी या प्रकारच्या समान, लयदार व नादमधुर शब्दांनी बनलेल्या आढळतात.

म्हणीतील सयमक रचनेचा आणखी एक सुंदर प्रकार, म्हणजे दीपक अलंकाराचा. तीन-चार वस्तूंबद्दल अगर अनेक विषयांसंबंधी एक समसंकेत प्रकट करणे व या प्रकटीकरणातही यमक वा जुळणारे शब्द योजणे याने हा अलंकार सिद्ध होतो. मराठी म्हणींचे एक अभ्यासू लेखक श्री. नी. शं. नवरे यांनी दीपक अलंकाराचे एक सुरेख उदाहरण दिले आहे ते हे– 'गवत गोंडाळ, बायको तोंडाळ अन् शेत धोंडाळ,' ('नसावे' हे क्रियापद येथे

अध्याहृत.) या पद्धतीच्या आणखीही काही म्हणी या दीपकालंकाराची उदाहरणे ठरू शकणाऱ्या आहेत. उदा–

(१) उन्हाळा जोगी–पावसाळा रोगी–हिवाळा निरोगी
('दिसणारच' क्रियापद अध्याहृत)

(२) गाता गळा, शिंपता मळा व लिहिणाराचा हातवळा–
('तेजीत असतोच')

(३) भाजी बघावी देठांत– पोळी बघावी काठांत– अन् बायको बघावी ओठांत !'

या दीपक अलंकारात तिहेरी उदाहरणे (समानधर्मी उत्तराची) योजली आहेत. गोंधळ्यांच्या जुन्या गाण्यांतून अशा प्रकारच्या 'असावी रे असावी,' व 'नसावी रे नसावी' या सदरात येणाऱ्या गोष्टींची अशीच उदाहरणे कितीतरी आढळतात, त्यातही समानार्थी शब्द योजून सयमक रचनेचा प्रयत्न दिसतो. वरील दीपक अलंकाराचीच साक्ष त्यातूनही मिळू शकेल.

काही वेळेला म्हणनिर्मात्या लोकांच्या प्रतिभेची झेप इतकी तिहेरी उदाहरणे नमूद करण्याएवढी पल्लेदार असत नाही, तिथे दोनदोन गोष्टी योजूनही म्हणींची पूर्तता केलेली आढळते, तीही लक्षणीयच ठरेल. उदा०–

१. शिष्याला सुई अन् घराला बाई (हवीच !)

२. पहाऱ्याला संत्री अन् राज्याला मंत्री (पाहिजेच !)

३. नाहातीचे बाल अन् खातीचे गाल (उत्तमच असणार.)

४. करंटयाला बोल न् चिकणमातीला ओल (असणारच)

५. खंडीत नवटक्के अन् कटकात चवटक्के (पाहू नये)

याखेरीज म्हणींच्या ठायी योग्य अशी उपमा उपमानेही दिसावीत हे नाही का नवल ? अर्थात ही उपमाने छोटीछोटीच कारण हिच्या इवल्याशा देहाला मोठ्या जड अलंकाराचे ओझे झेपावे कसे ? पण त्यातूनही छोटी उपमा डोकावते ती मात्र समर्पकतेने खुलणारी व खुलवणारीच ! अशा वेळी म्हणीची व्याप्ति थोडीशी वाढते– बहुधा अशी म्हण दुहेरी वाक्याची बनते. उदाहरणार्थ 'उतरंडीला नसावी केळी व घरात नणंद नसावी खेळी' ही म्हण घ्या. केळी ऊर्फ कळशी ही उतरंडीत चपखल बसत नाही तद्वत् घरात खोडकर स्वभावाची नणंदही मुकाटयाने सामावत नाही हा यातला

आशय स्पष्ट आहे व उपमा कौटुंबिक व व्यवहारातलीच आहे. 'घरात नसावा साला, शेतात नसावा नाला' किंवा 'खैराचं झाड नि म्हाताऱ्याचं हाड,' या म्हणी अशा उपमांची उदाहरणे होऊ शकतील. शेवटची म्हण तर उपमा वापरूनही लहान व्याप्तीची आढळते. 'साप म्हणू नये धाकला न् नवरा म्हणू नये आपला' हे उद्‌गार तर जुन्या स्त्रियांच्या ओठावर नित्य खेळणारेच, त्यांचा मतितार्थ समजावून द्यायला कशाला हवा ?

अर्थात म्हणी काही नेहमीच अशा सहेतुक शब्दयोजनेच्या चौकटीत बसणाऱ्या नसतात. पुष्कळदा अनुप्रास. यमक, समान नाद-लयीचे शब्द यापैकी काही एक न वापरताही त्यांची रचना साधी व एखादे व्यवहारी तत्त्व ठासून सांगण्यासाठी होते. लोकांच्या तोंडी वर्षानुवर्ष अशाही म्हणी खेळत राहतात याचे कारण एकच. त्यातून व्यक्त होणारा जगाचा अनुभव हा लोकांच्या काळजाला हात घालण्याएवढा धीट व सच्चा असतो, प्रभावी असतो हेच. उदाहरणार्थ, 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र,' 'अवघड जागी दुखणे जावई वैद्य' किंवा 'दिव्याखाली अंधेर,' इत्यादी म्हणींत कोठे आहे यमक वा प्रासयुक्त रचना ? पण त्यात व्यक्त झालेली गमके इतकी सत्याची प्रचीती देणारी की या बाह्यालंकाराच्या उणीवेकडे लक्षही जात नाही लोकांचे ! 'बडे घर पोकळ वासा,' 'शेळी जाते जिवानिशी– खाणारा म्हणतो वातड,' इत्यादी अनेक म्हणी अशा बिनयमकाच्या असूनही बिनबियांच्या द्राक्षांप्रमाणे अधिकच मधुर आशयाच्या आढळतात.

काही वेळा म्हणी दुहेरी पदरांच्या हारासारख्या दोनदोन सारख्या वाक्यांच्या आढळतात. पण आश्चर्याची गोष्ट अशी की अशाही विस्तृत व्याप्तीत त्या सर्रास वापरल्या जाण्याएवढी लोकप्रियता मिळवून बसलेल्या आहेत ! उदाहरणार्थ, 'मुरक्यावाचून बाई नाही, भुरक्यावाचून जेवण नाही,' 'नळी फुंकली– सोनारे, इकडून तिकडे गेले वारे,' या म्हणी पहा. 'लग्न पहावं करून अन् घर पहावं बांधून,' किंवा 'बोलेल तो करील काय– गर्जेल ते पडेल काय,' इत्यादी दुहेरी म्हणी पहा. आशयाला त्या लाखमोलाच्या आहेत, पण म्हणीचा लहानपणा, अनुप्रासादी कटकटी या या म्हणींनी पार धुडकावून दिलेल्या आहेत !

अर्थात हे सारे भाषालंकार वरवरचे, शरीरावर वस्त्रेप्रावरणे चढवावीत

तसे, पण यातून डोकावणारा म्हणींचा आशय अधिकच महत्त्वाचा असतो, हे प्रथम ध्यानी घ्यावयास हवे. भाषालंकृत म्हण देखणी दिसते खरी पण तिचे खरे सौंदर्य हेच नव्हे, तर ते आहे तिच्या समर्पक आशयात अन् अनुभवसिद्ध शिकवणीत !

दैनंदिन आयुष्यात पुष्कळदा मनुष्याची परिस्थिती व त्याची वागणूक यांची विसंगती जाणवते. काही वेळा जनरीतीचे नित्याचे अनुभवही मनुष्य विसरलेला दिसतो, काही वेळा तर एकादा माणूस अगदी वेडे विचार करतो, अशावेळी त्याला काही सुचवावे सांगावेसे वाटते, पण असला दीर्घ व लांब चेहऱ्यानं केलेला उपदेश हवाय कोणाला आज जगात ? आणि हा उपदेश नेटक, अल्प परंतु प्रत्यायक शब्दात व्यक्त कसा करावा हीही केवढी अडचण ? पण ही अडचण चिटुकली म्हण तेव्हाच दूर करते. उदाहरणार्थ, एखाद्या वृद्धाने एखाद्या कोवळ्या पोरीशी लग्न करणे ही व्यावहारिक दुर्घटना व्यक्त करण्यासाठी 'बिबी आली उमरीत अन् मियां चालले कबरीत !' ही एवढीशी म्हण बस् ! किती स्पष्टतेने ती त्यातला मूर्खपणा व्यक्त करते, पहा बरे ! म्हणींचे हे सामर्थ्य अगदी वेगळेच, आणि समाजाला शिकवण देणारी हिची वृत्तिही मोठी जहांबाज. केवळ सौम्य उपदेशच नव्हे तर उपरोध, उपहास, व्यंगार्थ, व्याजोक्ति, अतिशयोक्ति, सारे काही म्हणीची चुरचुरीत जीभ येता-जाता व्यक्त करताना दिसते अन् हे तिचे सामाजिक निरीक्षणावर आधारलेले 'बोल' इतके समंजस अन् वस्तुनिष्ठ असतात की, ऐकणाराचा मर्मभेदच व्हावा ! उदाहरणार्थ, 'नाकापत्तुर पदर अन् दिल्लीवर नदर,' हे चंचल स्त्रीचे वर्णन पहा. जणु दोन-चार ठळक रेषा मारून काढलेले सुबक रेखाचित्रच ! 'आधी सूनसून, मग फुणफुण !' 'कुणाच्या गाई-म्हशी अन् कुणाला उठाबशी ?' 'लाखाची मत्ता पण कवडीची सत्ता, किंवा 'अग माझी ऊं, सर्व गोत तू !' 'न कर्त्याचा वार शनिवार,' इत्यादी म्हणीतून लोकस्वभावाचे किती मार्मिक वर्णन येते ! अशा थोडक्या शब्दात जास्त आशय परिणामकारकतेने व्यक्त करणे हाच तर म्हणीचा देहस्वभाव ! एका पाश्चात्य लेखकाने– 'ए प्रॉव्हर्ब इज् ए शॉर्ट सेन्टेन्स ड्रॉन फ्रॉम लाँग एक्स्पीरिअन्स' (दीर्घ अनुभवाचे छोटे वचन) अशी एक म्हणीची व्याख्या केली आहे तिचे प्रत्यंतर वरील म्हणींतून पटते.

म्हणींची आणखी काही व्यवच्छेदक लक्षणे आहेतच. उदाहरणार्थ, हिचा ठसका ! एखादी ठसकेबाज म्हण ऐकली की, लोकांची उणीदुणी काढून कमरेवर हात ठेवून लोकांना बोलणारी खबरदार ग्रामीण स्त्री समोर येऊन उभी राहिली आहे असे वाटते. का ? ग्रामीण स्त्रीचीच आठवण का ? याचे उत्तर असे की, खेडवळ म्हणी अधिकच स्पष्टवक्त्या अन् वर्मावर बोट ठेवणाऱ्या असतात. त्यांची भाषा आपली उघडउघड-आडूनदडून संकेताने बोलणे ही सुशिक्षित सफाई ग्रामीण म्हणींना जमत नाही, सगळे रोखठोक काम असते. पुढील काही ग्रामीण म्हणी किती ठसकेदार आहेत पहा तरी ?

१) आल्ये नांदायला पर मडकं न्हाई रांधायला !
२) पाटलाची सून बटकीचं गुण !
३) मला न्हाई अब्रू, कशाला घाबरू !
४) पदरी पडलं दोड हसून करा गोड !
५) मन लई मोठं चोळी शिवली दोन बोटं !
६) अग अग बायकु–कुठवर आयकू !

अशा या रोचक म्हणी व त्यांचा हा वेगवेगळ्या घाटाचा प्रपंच !

वाक्प्रचार

वाक्प्रचार हे म्हणींचेच सहोदर भाऊ, तेव्हा दोहोंच्या प्रवृत्तींत व आशयात बरेच साम्य असते. मात्र जुळ्या भावंडांतही पुष्कळदा रूपाचे वेगळेपण आढळावे तसे या वाक्प्रचारांचे रंगरूप म्हणीहून काहीसे वेगळेआगळे दिसते. म्हणीप्रमाणे वाक्प्रचारही सुटसुटीत रचनेचे असतात. थोडक्या शब्दांत मनुष्य-स्वभावाचं व व्यवहाराचं दिग्दर्शन करण्याचा त्यांचाही देहगुण व म्हणींतून जो उपरोध, उपहास वा सत्यदर्शन असते ते यांच्यातही भरून राहिलेलेच ! पण म्हणीला शब्दसौंदर्य, अनुप्रास, यमक यांचे लेणे शोभवीत असते तर वाक्प्रचार हा, मुक्तछंद कवितेसारखा ' स्वच्छंद ' असतो, त्याला अमुकच व्याप्ती हवी अगर शब्दलालित्य, जुळणारे शब्द हवेत, असली बंधने नसतात. समर्पक पण नेटक्या शब्दांत व्यवहारनीती सुचवून हेही भाषेला अवश्य उठावदार व प्रभावी करतात– थेट म्हणीसारखेच !

वाक्प्रचार व म्हणी यांच्यातला एक लक्षणीय फरक श्री. शं. नवरे यांनी नमूद केला आहे, तो म्हणजे वाक्प्रचारात जरी पद्यात्मक रचना नसली

तरी त्याचा एकही शब्द बदलता अगर मागे-पुढे करता येत नाही. उदाहरणार्थ–

' हात दाखवणे ' ह्या वाक्प्रचारात ' दाखवणे ' या शब्दाऐवजी ' हात मारणे,' ' हात धरणे,' ' हात पसरणे,' ' हात पोचणे,' ' हात घालणे,' अशी वेगळी क्रियापदे योजली तर अगदी वेगळेच अर्थ निघतात– ' माशा मारीत राहणे ' याचा अर्थ आपल्या मनात इतका ठसलेला की, ' चिलटं मारीत राहणे ' हा बदल मानवणे आपल्याला कठिण ! तेव्हा वाक्प्रचारांची व्याख्या अशी करता येईल की, भाषेत छोटी, रूढ झालेली, लाक्षणिकतेने समर्पक अर्थ व्यक्त करणारी, अशी गद्यात्मक शब्दसंहती म्हणजे वाक्प्रचार. ' वाक्प्रचार ' या वैशिष्ट्यपूर्ण नावातही बोलभाषेत रुळून गेल्याचा वाक्प्रचाराचा विशेष व्यक्त झालेला आहेच.

वाक्प्रचार म्हणीइतकेच वैपुल्याने बोलभाषेत वापरले जातात. बहुधा एखादे अनुभवाचे वाक्य अगर मनाला सहज प्रतित होणारा प्रसंगोचित दाखला त्यातून व्यक्त होतो. उदाहरणार्थ, म्हाताऱ्या माणसाबद्दल अगदी सहजतेने ' पिकले पान ' हा वाक्प्रचार वापरला जातो. अन् या दोनच शब्दांत यथार्थपणा केवढा भरलेला ! पिकलेले पान आज-उद्या गळणार, तद्वत् वृद्धाच्या आयुष्याचा नेम नाही हे समर्पकतेने यातून व्यक्त झाले आहे. ' घटकेचं घडचाळ ' हाही वाक्प्रचार आसन्नमरण माणसाबद्दल असाच वापरला जातो– कुरुप स्त्रीला उद्देशून ' कोळशातलं माणिक ' म्हटलं जातं. दोन शब्दांत याहून प्रभावी वर्णन मिळणं मुष्कील.

व्यक्तिवर्णनाच्या बाबतीत या प्रकारचे वाक्प्रचार म्हणीहूनही सरस ठरणारे आहेत. अमूक माणूस ' अल्लाची गाय ' (अतिशय गरीब स्वभावाचा) तर तमूक ' कळीचा नारद ' कुणी ' गुळाचा गणपती ' तर कोण ' पाताळयंत्री !' कोणी ' घरकोंबडा ' तर कोणी ' बाइलबुद्धचा !' निरनिराळ्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे नमुने दोन शब्दांतच नजरेसमोर उभे करणारे हे समर्थ वाक्प्रचार, सर्वपरिचितच आहेत, त्यांचे आणखी स्पष्टीकरण कशाला ? माणसाचे रूपविशेष वा स्वभावविशेष व्यक्तवणारे असे कैक वाक्प्रचार भाषेत रूढ झालेले आहेत. ते कधी दोन शब्दांत वरीलप्रमाणे प्रकट होतील, तर कधी पूर्ण वाक्यातही वर्णन करू लागतील. उदाहरणार्थ,

नकटया माणसाबद्दल ' नाकावर म्हशीनं पाय दिला आहे ! ' ही व्याजोक्तीची वर्णनशैली पाहा किंवा अमूक माणूस ' फाटक्या अंगाचा ' अगर ' सुदामदेव ' आहे हे सांगणे पहा. थोडक्या शब्दांत पुरा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य म्हणीइतकेच वाक्प्रचारातही अनुस्यूत आहे हे आता सहज पटावे.

आणखीही काही उदाहरणे अशीच– एखादी निश्चित घटना सूचित करताना ' ती दगडावरची रेघ समजा,' असे चटकन बोलणारा बोलून जातो. दगडावरच्या रेघा अगर अक्षरं थोडीच पुसली जातात ? त्या शाश्वतीची सूचनाच या शब्दांतून दिली जाते. ' चंबूगबाळे आटपणे ' हा एक वाक्संप्रदाय बघू या. चंबू म्हणजे लोटा व गबाळे म्हणजे मुकटा ठेवायची पिशवी. ही दोन्ही उचलून घेणे म्हणजे तेथून माणसाने निघून जाण्याची तयारी करणे अगर ' काढता पाय घेणे ' (हाही एक वाक्प्रचारच !) ' दिवे लावणे ' (अक्कल पाजळणे या अर्थी) ट ला ट जुळवणे, (कसेतरी काव्य रचणे) चुरमुरे खात बसणे (हतबुद्ध व निराश होऊन स्वस्थ बसणे), जोडे फाडणे (पायपीट करणे), पवाडे गाणे (स्तुती करणे), दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे (परबुद्धीने चालणे), भ्रमाचा भोपळा फुटणे– (भ्रांत फिटणे), असे कितीतरी क्रियापदरूप वाक्प्रचार आढळतात. ते दुधात साखर मिसळल्याप्रमाणे भाषेशी एकरूप झालेले आणि तिचे माधुर्य वाढवणारेच असतात. प्रत्येक मराठी माणूस कळत नकळत हे वाक्प्रचार म्हणीप्रमाणेच बहुलतेने वापरीत असतो व त्यात खेडुतांइतकेच नागरलोकही भाषेचे हे लेणे लेववून अलंकृत करीत असतो. वा. गो. आपटयांनी याला वाक्संप्रदाय म्हटले आहे, त्यातही एक वेगळा अर्थ आहेच. ' संप्रदायात ' रूढ झालेल्या भाषिक परंपरेचाही यातून बोध होतो व तेही वाक्प्रचाराचे एक व्यवच्छेदक लक्षण आहेच. म्हणीपेक्षा वाक्प्रचार कसे निराळे असतात, हे आता सहज ध्यानी येण्याजोगे आहे. वरील वाक्प्रचारात कोठेतरी यमक अगर जुळते शब्द जुळवण्याचा आग्रह दिसतो काय ? मुळीच नाही. अर्थात कधी कधी वाक्प्रचारातही प्रासयुक्त भाषा येते. उदाहरणार्थ, ' गुंजेत गाढव मढवणे ' (थोडक्या सामुग्रीने महत्कार्य करू पाहणे) होळीचे होळकर, मरतमढे (मेषपात्र माणूस), रडत राऊत, मनात मांडे खाणे, पराचा पारवा करणे, अशी उदाहरणे शोधून काढावी लागतील इतकी दुर्मिळ ! एकंदरीने शब्द

थोडे पण अर्थ फारहेच धोरण वाक्प्रचारात प्रामुख्याने अवलंबिलेले दिसून येते.

काही वेळा या वाक्प्रचारांना पौराणिक व्यक्तिविशेषांची अगर ऐतिहासिकाचीही पार्श्वभूमी लाभलेली दिसते. उदाहरणार्थ, 'अनागोंदी कारभार,' हा एक वाक्प्रचार भाषेत आहे. अनागोंदी ही दक्षिणात्यांची एक जुनी राजधानी होती. तेथे राज्याचा भपका व दबदबा फार व तो टिकवण्यासाठी खोटे जमाखर्च मांडले जात अशी वदंता आहे, त्यावरून पैशाआडक्यासंबंधी ताळतंत्र नसणे याला अनागोंदी कारभार म्हटले जाते. 'गंगेत घोडे न्हाणे' हा वाक्प्रचार असा सर्वविश्रुतच आहे, याचे मूळ कोठे आहे. ते ऐकले तर नवलच वाटेल. पूर्वी मराठे लोक उत्तरेवर स्वाऱ्या करायचे, तेव्हा इकडच्या भीमथडीच्या तट्टांना 'गंगेचे स्नान घडवू' (म्हणजे गंगेपर्यंतचा मुलुख जिंकू) असा त्यांचा मनसुबा असे. 'एकदाचे गंगेत घोडे न्हाले' म्हणजे योजले कार्य सिद्धीस गेले हा आज निघणारा रूढार्थ अशा रीतीने इतिहासावर आधारलेला आहे.

'बाजीराई' म्हणजे दुसऱ्या बाजीरावासारखा थाटमाट– अशी कित्येक उदाहरणे इतिहासाशी नाते सांगणारी, तर भगीरथ प्रयत्न, दुर्वासाचा अवतार, यमाचे बोलावणे, रामबाण, राहूसारखे मागे लागणे, अक्काबाईचा फेरा, शनीची साडेसाती, ब्रह्मज्ञान, सूतोवाच, (पूर्वी सूतऋषी शौनकांना पुराणकथा सांगत असत, त्यात प्रारंभी 'सूत– उवाच' (सूत म्हणाले) असे शब्द नित्य येत म्हणून 'सूतोवाच म्हणजे प्रारंभ' असा अर्थ) असे पौराणिक व्यक्तींशी वा कालाशी संबंधित असलेले वाक्प्रचार अस्तित्वात आले– अर्थात यांची व्याप्तिही म्हणीसारखीच व विविधताही तशीच. असे वाक्प्रचार हेही वाङ्मयशारदेचे चिमणे नूपूरच. फक्त यात शब्दमाधुरी वा नादलय नाही, सारी गद्य सजावट, पण ती भाषेचे सौंदर्य वाढवणारीच असते हे दिसून येते.

उखाणे

उखाणे किंवा कूटप्रश्न हा वाङ्मयशारदेचा असाच आणखी एक छोटासा अलंकार. शाब्दिक कोडी सोडवण्याची वृत्ती-प्रवृत्ती लहानापासून थोरापर्यंत साऱ्यांचीच असते. मोठ्या माणसांसाठी त्यात कूटकथा, संस्कृत ऋचे, प्रहेलिका, अशी समृद्धीही आढळते– त्यातच बालांसाठी अगर ग्रामीण जनते-

साठी रचले गेलेले हे उखाणेही वैपुल्याने आढळतात– मूर्ती लहान पण कृती मोठी असं यांचंही वर्णन करावं लागेल.

उखाण्याला मूळ शब्द ' आहाणा ' असा आहे. उखाणा हाही म्हणींच्या कुळातलाच. तसेच गुण, तसेच रूप, तोच बांध्याचा अटकरपणा, खमंग शब्दांनी आशय व्यक्तवण्याची तऱ्हाही तशीच; मार्मिक वर्णने करण्यात उखाणा म्हणीला हार जात नाही. भाषेत म्हणी जशा चपखल बसून गेल्या, तद्वत् उखाणे रोजच्या दिनक्रमात आढळत नसले तरी प्राचीन काळापासून परंपरेने जनरंजनाची एक विशिष्ट बाजू त्यानीही सांभाळलेली आहेच. दुसरे, म्हणी वा वाक्प्रचार म्हणजे उपदेश करणारी मंडळी, काहीसा वृद्ध-वृत्तीचाच आश्रय करतात, बोलतात ते एखाद्या खेडवळ बाईप्रमाणे रोख-ठोक, तेथे आडपडदा नाही. उलट उखाण्याला तुमच्या वागण्याशी काही एक कर्तव्य नसते ! तुमच्या मनातील चातुर्याला जागे करून तुमचे मन रंजवणे एवढेच त्याचे कार्य व हेच त्याचे वैशिष्ट्य. हे उखाणे शिक्षका-प्रमाणे सदोदित ' उत्तर ' मागणारे ! वस्तूची एक-दोन वैशिष्ट्ये खुबिदार शब्दात किंवा जुळणाऱ्या शब्दांत सांगून माणसाच्या मनातील संशोधकाला आव्हान द्यायचे हे या उखाण्यांचे प्रमुख कार्य–व्याप्ती केवढी म्हणाल, तर अगदीच इटुकलीशी–म्हणी वा वाक्प्रचाराएवढीच. मात्र हे चार-सहा-शब्द वस्तुवर्णनपर असूनही गूढ भासणारे असेच असतात, हा उखाण्यांचा विशेष विसरू नका. उदाहरणार्थ, ' एवढासा गडू– पाहु पाहु रडू !' हा छोटा उखाणा घेऊ. शब्द तर नेमके चारच– पण त्यात अपेक्षित वस्तूचा आकार व गुणवर्णन करून एक छोटेसे यमकही साधलेले दिसते व गूढतेचे कलमही नीट सांभाळले गेले आहे. याचे उत्तर आहे ' कांदा ' व ते लक्षात येताच या चार शब्दांची रचना किती चातुर्याने करावी लागली असेल हे ध्यानी येते.

उखाण्याच्या या चिमुकल्या व्याप्तीतही त्यांची म्हणून काही विशिष्ट बोलभाषा असावी व तीही परंपरागत हे नाही का नवल ? उदाहरणार्थ, ' शेवया ' वर आधारित असलेला–

' सातासमुद्रापलीकडे राजानं केला भात–
एकेक शीत नऊ नऊ हात !'

हा उखाणा पाहा– या दोन ओळींमधेही छोटंसं जुळणारं यमक आहेच. वस्तुवर्णनातील गूढता आहे तशी विशेषताही जाता जाता सांगितलेली आहे आणि ' सातासमुद्रापलीकडे ' व ' नऊ हात एकेक शीत ' यात अतिशयोक्ती अलंकारही वापरला आहे ! म्हणीतही असा अत्युक्तीचा वापर असतो हे आपण पाहिलेच– उखाण्यातून नेहमीच या ' सातासमुद्रापलीकडे 'चा उल्लेख येतो– पूर्वी पृथ्वीवर सप्तसमुद्र होते अशी कल्पना दैवत-कथांतून अनेकवार मांडली गेली आहे. ती लोककथेनेही कितींदा तरी उचलून धरलेली आढळते. या छोट्या उखाण्यांनीही तोच संकेत उचलून धरावा याचे सूत्र उखाण्यांच्या प्राचीन कालच्या रचनेतही असेल कदाचित !

' घाटावरून येणे ' हीही सांकेतिक शब्दांची रचना अशीच. कोकणात जायला घाटातून जावे लागते त्यामुळे तिकडे प्रचारात आलेल्या उखाण्यात ' दुरून आला ' या अर्थी ' घाटावरून आला ' असा उल्लेख येतो. घाटावरून कुणी आला, आला खरा पण नुस्ता साधा नव्हे, तर काही चमत्कृतिपूर्ण वैशिष्ट्याचा कुणीतरी आला ! त्याचे वैशिष्ट्य दोन-चार विचित्र शब्दांत सांगितले गेले म्हणजे या प्रकारचे उखाणे सिद्ध होतात. उदाहरणार्थ,–

घाटावरून आला जोगी– तो सात पासोड्या भोगी (उत्तर–कांदा)
घाटावरून आल्या बाया– त्यांच्या चिंबलेल्या डोया (उत्तर–खारका)
घाटावरून आला हबशी– तो राखेत डोके खुपशी (उत्तर–वांगे)

यात त्या त्या वस्तूचे वैशिष्ट्य अगदी मोजक्या शब्दात व्यक्त केले आहे व हीच तर उखाण्यांची खुबी. ' नेमक्या शब्दांतले चमकदार गूढ' अशी त्याची व्याख्या करता येईल.

उखाण्यांचे इतरही भाषिक गुणधर्म लक्षणीय ठरतील. याचे ' उत्तर ' ओळखण्यासाठी जी माहिती द्यावी लागते तीच पुष्कळदा चमत्कृतिपूर्ण शब्दांत दिली जाते. इतकी की ऐकणाऱ्याला हे गूढ उलगडणे अशक्यप्राय वाटावे आणि ही माहिती अगदी खरीच असते हे विशेष. उदाहरणार्थ, ' दोघं भाऊ पण एकच बंडी ' हा कुटप्रश्न पहा. आठवतं का उत्तर ? नाहीच ना ? याचं उत्तर सोलाणा ऊर्फ हरबरा आहे. ओल्या हरबऱ्याच्या झाडावर, दोन दोन दाणे एकत्र असून त्यावर एकच आच्छादन नसते काय ? ' असं पाखरू बेस, त्याच्या काळजाला केस ' या विचित्र माहितीचा संदर्भ

आंबा व त्याची रेषाळ कोय यांच्याशी आहे. ' लाल छडी मैदानात खडी ' याचा रोख उसावर आहे. ' दात विचकते न् बाजारात बसते '– कोण ? तर डाळिंब ! ' हिरवं बघुणं–लाल भात ' पाहिलाय् का कधी ? नसेल तर एक छानसं कलिंगड बाजारातून आणा– बस्, तेच उत्तर. कसा काय हा फलाहार वाटतो बरे ? गूढार्थाने प्रकट झाला तरी तो स्वादिष्ट खास आहे. ' बुरख्यावर बुरखे, बत्तीस बुरखे– त्या नारीचे केस भुरके,' हे वर्णन कोणाचे बरे ? अर्थातच अनेक साले व भुरकट केसर असलेल्या मक्याच्या कणसाचे; आहेत ना ही वर्णने थोडक्यात पण यथातथ्य ? उखाण्यांची ही झाली एक रीत. ही अतिशय आटोपसर शब्दांची, तर दुसरी रीत बऱ्याच वाक्यांनी एकाच ' वस्तु'ची लक्षणे वर्णन करण्याची दिसते ! पाहायची आहे ? तर मग पुढील उखाणे पहा–

१. घडघड चाले गाडा नव्हे ।
सर सर चाले साप नव्हे ।
गळ्यात जानवं ब्राह्मण नव्हे ।
नव्हे इंद्र । नव्हे चंद्र । नव्हे जाळ्यातला मासा ।
शहाण्यानं घातला उखाणा तर मूर्खाला पडला फासा !

केवढा लांब हा उखाणा ? अन् यात मुर्खालाच केवळ नव्हे, तर बुद्धिमंतालाही फासा पडावा असा डाव दिसतो ! या ' अमूक आहे न् तमूक नाही ' पद्धत उखाण्याचे उत्तर आहे ' रहाट.'

दुसरा हा तसाच–

रंग नाही, रूप नाही । आभाळ म्हणशील काय ?
आदी नाही, अंत नाही–देव म्हणशील काय ?
विचार करतोस काय अन् जीव निघून जाय ॥

बाप रे ! हा भलताच धाक या अंत्य शब्दांनी घातला आहे खरा– पण हा उखाणा अगदीच साधा व त्याचे उत्तर ' वारा ' आहे.

याच तऱ्हेचा एक नमुना :–

काळा आहे कावळा नव्हे !
लांब आहे साप नव्हे ।
तेल लावलं हनुमान नव्हे ।
फूल वाहिलं–भगवान नव्हे ।

ह्या 'आहे आहे– नाही नाही' पद्धत उखाण्याचं उत्तर अगदीच साधं– 'केस' असं आहे.

आणखी एक लक्षात घेण्याजोगे म्हणजे व्याप्ती वाढली की ह्या रचनेतही एक प्रकारचा प्रास यमक वा नादलयीचे शब्द येतात ! अर्थात् जेथे देहच चिमुकला केवळ दोन-चार शब्दांचाच, तेथे हे काव्यगुण अपेक्षिणे कठिणच. पण नवल असे की, तेथेच ते प्रकटपणे दिसतात. उदाहरणार्थ, पुढील चिमण्या जागेतच बसलेली ही अनुप्रास–यमके पहा बरे–

दोन पायाचा पक्षी– तो कठीण फळे भक्षी (अडकित्ता)
इथ्थंच हाय, पर दिसत नाय ! (हवा)
दिल्लीला जातो–पण पाण्याला भितो (कागद)
एवढासा किडा– ही काय पिडा ? (विंचू)

आणि अशीही उदाहरणे वैपुल्याने आढळतात.

वर म्हटलेच की ह्यांचा जीवच छोटा. त्यात शब्दचमत्कृती कितीशा आढळतील ? पण तेवढ्या परिसरातही यांच्या रचनाकारांची काही शाद्विक गमती करण्याची प्रवृत्ती दिसून येते– उदाहरणार्थ,

'घरात कू, दारात कू, बाहेर कू !' हा कृषिजीवनातला एक प्रसिद्ध उखाणा पाहा. ओळखतो का ? या तीन 'कु' ची कुरकुर एक शेतकरी स्पष्ट करतोय, 'घरात बायकू, दारात रेडकू अन् भाईर तंबाकू, ही असतीयाच !

वर्णनाचा मार्मिकपणाही म्हणीएवढ्याच अगत्याने उखाण्याच्या चिमण्या पटांगणात बागडत असतो. पुढील उखाणे फक्त दिसायला छोटे, पण त्यातले वर्णन अतिशय बोलके. चार-पाच वाक्यांचे मर्म साठवलेले. 'अब्बल पेटी तब्बल पेटी । ज्याची त्याला उघडेना ।' कोणती ही पेटी म्हणाल, तर 'माणसाचं पोट.' आहे ना वर्णन मार्मिक न् खरे ? दुसरा उखाणा बघा–

'इथ्थं होती–तिथ्थं गेली !' 'कोण अशी ही बेगुमान ?' तर 'नजर' 'कोरड्या विहिरीत पडला पाचोळा– लागला झरा ओळख चतुरा !' ह्यातली पाचोळा पडताच झरा लागणारी विहीर जगात एकच आहे ती म्हणजे डोळा. बाहेरचं कुस्पट गेलं तरी ती वाहू लागलीच ! 'काळ्या रानात पांढरी वाट' कोणती बरे ? तर केसांचा भांग. 'गुलाबाचे फूल कोणाला अर्धे, कुणाला सबंध' असे कसे ? याचे उत्तर आई न् बाप. दोघांना उद्देशून एक

गुलाबाचे फूल म्हणणे व त्यातील एकजण देवाघरी गेले तर राहिलेल्याला अर्ध्या फुलाची उपमा देणे, हे दोन्ही भाव मोठे हृद्य व नाविन्यपूर्ण नव्हेत काय ?

चिमण्यांनी जशी गगनझेप घ्यावी, तद्वत् या चिमण्या उखाण्यांची भरारी. यांना कोठलेही क्षेत्र वर्ज नाही. पंचमहाभूतांपासून ते माशीचिलटांपर्यंत साऱ्यावर कूटे रचण्याची यांना जणू मुभाच मिळाली आहे. म्हणूनच काय, ' राजाचा खुर्दा मोजायला येईना ' हा चांदण्यांवरचा आणि ' अर्ध्या रात्री गाढव मेलं, साऱ्या जगाला सुतक आलं.' हा चंद्रग्रहणावरचा किंवा ' अजब तळे त्यात दोन रामफळे ' हा चंद्रसूर्यावरचा उखाणा पाहता अगर ' पाटील-बुवा पाटीलबुवा कशी काय खबर ? शेंडाबुडखा कवळामध्ये मोठं जबर ' असा ' सकाळ, मध्यान्ह व सायंकाळच्या उन्हाला ' उद्देशून उखाणा प्रकट होतो, तसाच ' एवढीशी काळुबाई देवाआधी नैवेद्य खाई ' हा नखभर माशी-वरचा उखाणा निर्माण झाला. माणसाच्या देहावरचे, सृष्ट पदार्थावरचे खाद्य पदार्थांवरून रचले गेलेले असे हे हजारो उखाणे ! किती सांगू तेवढे थोडेच.

वस्तुमात्रातल्या वैशिष्ट्यावरच नेमका प्रकाश टाकून चटकन् यथातथ्य छायाचित्र घ्यावे तसा उखाण्यांचा स्वभावगुण, त्यांची ती गूढ भाषा, त्या गूढ भाषेतील उघड प्रच्छन्न व्याजोक्ती, अतिशयोक्ती व विचित्र वर्णनांनी स्पष्ट होणारी त्यातील साधी सृष्टी यांची खुलावट, भाषेला किती प्रकारे सजवीत, नटवीत असते ! पाहिलंत ?

मी या छोट्या सर्व वाङ्मयप्रकारांना शारदेचे नूपुर म्हणते ते यासाठीच !

★

२ : उखाणेच पण दूरदेशचे !

लोकसाहित्यात एक लहानसा भाग उखाण्यांचा ऊर्फ आहाण्यांचा असतो. हे उखाणे पतीच्या नावाचे अगर कूटपद्धतीचे म्हणजे सूचक शब्दवर्णने सांगून उत्तर मागणारे असेही असतात. आज आपण विचार करणार आहोत तो या दुसऱ्या पद्धतीच्या उखाण्यांचा– म्हणजे उत्तरे अपेक्षित असणाऱ्या कोडयांचा.

प्रथम या साहित्याचा परिचय झाला तेव्हा मला वाटले की, ही कूट उखाण्यांची गंमत फक्त महाराष्ट्रापुरतीच सीमित आहे ! पण जो जो लोक-साहित्याचा अभ्यास वाढू लागला, तो तो बंगाल, पंजाब, कश्मीर वगैरे देशातही हा वाङमयप्रकार आहेसे आढळून आले. उत्तर हिंदुस्थानात 'पहेलिया' हा तर एक स्वतंत्र विभागच आहे. आणि अलीकडे तर जेव्हा इंग्लंड, फ्रान्स, रशिया, आफ्रिका इत्यादी देशांचे लोकसाहित्य वाचनात आले तेव्हा तर आश्चर्याने मी थक्कच झाले. या देशातही उखाणे आहेतच की ! फक्त त्यांची पद्धत थोडी निराळी आहे इतकेच. मला ते खूपच रंजक वाटले. त्यातले काही मी येथे दिले आहेत. अर्थात जमेल तसे त्यांचे भाषांतर मी मराठीत केले आहे. व मूळ उखाणेही कोठेकोठे दिले आहेत. असे हे वेगळ्या वाणाचे कूट प्रश्न दरेक भाषेत असतात, व ते पूर्वपरंपरेतून जीव धरून राहतात हेही यातून स्पष्ट होते !

कश्मीर

प्रथम हे कश्मीरकडचे उखाणे पहा. हे हिंदीत आहेत–

(१) एकसे दो हो गया, मित्र हो गये वैरी.
कौवेका रंग भूरा हुआ !

(एकाचे करतो दोन– शत्रू करतो मित्रांचे, कावळे बनवीतो गोरेपान– सांगा नाव तयाचे).

नाही ना ओळखू येत ? याचे उत्तर 'बुढापा' (म्हातारपण) हे आहे. 'कावळे भुरे होतात' म्हणजे केस काळे असतात ते भुरके होतात.

(२) गुलाबके फूल खिले है– कोई काट नही सकता,
चांदीके तारका कपडा बिछाया– उसपर कोई सो नही सकता !

(फुललेले गुलाब तोडायला येत नाहीत, चंदेरी गादी झोपायला येत नाही !)

हे दोन उखाणे व यांची उत्तरे तारे व बर्फ अशी आहेत. कश्मीरमधे बर्फाबद्दलचे उखाणे असणारच.

(३) पहाडीपर बैठी हुई मेंढकी, आसू बहा रही है।
(टेकडीवर बसली बेडकी, रडता रडता भुई थोडकी).

याचे 'भाताची तपेली व भाताचा कढ' असे जोड उत्तर आहे. चुलीवर भाताची हंडी ठेवली की कढ येतोच, यावर हा उखाणा आहे.

भोजपुरी

कश्मीरनंतर भोजपुरी व व्रज लोकांच्या लोकसाहित्यातले उखाणे जरा पाहू. ही भाषा इकडे उत्तर प्रदेशात सर्वत्र चालते.

(१) ओरपास घासफूस– बीचमे तबेली,
दिनमे तो भीरभार– रातमे अकेली।
(चहूकडे गवत, मधे 'तबेली' दिवसा दाटी– रात्री एकटी)
उत्तर– 'कुआँ' ऊर्फ विहीर आहे.

(२) अजापुत्रको शब्द लै, गजकौ पिछलौ अंक।
सो तरकारी लाय दे– चातुर मेरे कंथ।
(शेळीचा आवाज, हत्तीचे शेपूट। घरधनी, ती भाजी आणून द्या निमूट)
शेळीचा आवाज म्हणजे 'में' आणि हाथी (हत्ती) शब्दातला शेवटचा वा...२

२ : उखाणेच पण दूरदेशाचे !

लोकसाहित्यात एक लहानसा भाग उखाण्यांचा ऊर्फ आहाण्यांचा असतो. हे उखाणे पतीच्या नावाचे अगर कूटपद्धतीचे म्हणजे सूचक शब्दवर्णने सांगून उत्तर मागणारे असेही असतात. आज आपण विचार करणार आहोत तो या दुसऱ्या पद्धतीच्या उखाण्यांचा– म्हणजे उत्तरे अपेक्षित असणाऱ्या कोडयांचा.

प्रथम या साहित्याचा परिचय झाला तेव्हा मला वाटले की, ही कूट उखाण्यांची गंमत फक्त महाराष्ट्रापुरतीच सीमित आहे ! पण जो जो लोक-साहित्याचा अभ्यास वाढू लागला, तो तो बंगाल, पंजाब, कश्मीर वगैरे देशातही हा वाङमयप्रकार आहेसे आढळून आले. उत्तर हिंदुस्थानात 'पहेलिया' हा तर एक स्वतंत्र विभागच आहे. आणि अलीकडे तर जेव्हा इंग्लंड, फ्रान्स, रशिया, आफ्रिका इत्यादी देशांचे लोकसाहित्य वाचनात आले तेव्हा तर आश्चर्याने मी थक्कच झाले. या देशातही उखाणे आहेतच की ! फक्त त्यांची पद्धत थोडी निराळी आहे इतकेच. मला ते खूपच रंजक वाटले. त्यातले काही मी येथे दिले आहेत. अर्थात जमेल तसे त्यांचे भाषांतर मी मराठीत केले आहे. व मूळ उखाणेही कोठेकोठे दिले आहेत. असे हे वेगळ्या वाणाचे कूट प्रश्न दरेक भाषेत असतात, व ते पूर्वपरंपरेतून जीव धरून राहतात हेही यातून स्पष्ट होते !

कश्मीर

प्रथम हे कश्मीरकडचे उखाणे पहा. हे हिंदीत आहेत–

(१) एकसे दो हो गया, मित्र हो गये वैरी.
कौवेका रंग भूरा हुआ !

(एकाचे करतो दोन– शत्रू करतो मित्रांचे, कावळे बनवीतो गोरेपान– सांगा नाव तयाचे).

नाही ना ओळखू येत ? याचे उत्तर 'बुढापा' (म्हातारपण) हे आहे. 'कावळे भुरे होतात' म्हणजे केस काळे असतात ते भुरके होतात.

(२) गुलाबके फूल खिले है– कोई काट नही सकता,
चांदीके तारका कपडा बिछाया– उसपर कोई सो नही सकता !

(फुललेले गुलाब तोडायला येत नाहीत, चंदेरी गादी झोपायला येत नाही !)

हे दोन उखाणे व यांची उत्तरे तारे व बर्फ अशी आहेत. कश्मीरमधे बर्फाबद्दलचे उखाणे असणारच.

(३) पहाडीपर बैठी हुई मेंढकी, आसू बहा रही है।

(टेकडीवर बसली बेडकी, रडता रडता भुई थोडकी).

याचे 'भाताची तपेली व भाताचा कढ' असे जोड उत्तर आहे. चुलीवर भाताची हंडी ठेवली की कढ येतोच, यावर हा उखाणा आहे.

भोजपुरी

कश्मीरनंतर भोजपुरी व व्रज लोकांच्या लोकसाहित्यातले उखाणे जरा पाहू. ही भाषा इकडे उत्तर प्रदेशात सर्वत्र चालते.

(१) ओरपास घासफूस– बीचमे तबेली,
दिनमे तो भीरभार– रातमे अकेली।

(चहूकडे गवत, मधे 'तबेली' दिवसा दाटी– रात्री एकटी)

उत्तर– 'कुआँ' ऊर्फ विहीर आहे.

(२) अजापुत्रको शब्द लै, गजकौ पिछलौ अंक।
सो तरकारी लाय दे– चातुर मेरे कंथ।

(शेळीचा आवाज, हत्तीचे शेपूट। घरधनी, ती भाजी आणून द्या निमूट)

शेळीचा आवाज म्हणजे 'में' आणि हाथी (हत्ती) शब्दातला शेवटचा वा...२

भाग म्हणजे 'थी' अर्थात उत्तर मेथी ! (मेथीची भाजी).

(३) नाजुक नारी, पियासंग सोती, अंगसे अंग मिलाय
पिय बिछुडत, जानिके संग सती हो जाय
(नाजुक युवती, शेजेवर पती, पती गेला मरून, पत्नी जाई सती !)
याचे उत्तर 'दिवा व तेल' असे आहे.

(४) एक थाल, मोतियन्से भरा। सबके सिरपर औंधा धरा।
चारो ओर थाल वह फिरै। मोती उससे एक न गिरै।
(थाळी भरली मोत्यांनी केली पालथी वरती कोणी।
थाळी फिरे चोहीकडे। पण मोती एकही खाली न पडे !
(याचे उत्तर 'आकाश व चांदण्या' असे आहे.

(५) एक बागमे ऐसा हुवा। आधा बगुला आधा सुवा
(बागेत झालं नवल मोठं। अर्धा बगळा अर्धा पोपट ! !) उत्तर मुळा.

आता गुजराती, तेलगू, तमीळ इत्यादी भाषातले उखाणे पहा. या मूळ भाषातले उखाणे देण्याऐवजी मी त्यांचे मराठी रूपांतरच येथे देत आहे.

गुजराथी :

(१) काळा आहे काक नव्हे, लांब आहे साप नव्हे.
फुले वहातात महादेव नव्हे, तेल ओततात मारुती नव्हे.
(केस)

(२) रानात नेसते साडी अन् लोकात फिरते उघडी !
(सुपारी)

तमीळ :

(१) नक्षीचा गालिचा जमिनीवर अंथरला
पण गुंडाळता येत नाही कोणाला !
(रांगोळी)

(२) आमच्या परसात, साप लोंबतात !
(पडवळे)

तेलगु :

(१) मुलगा छोटा पण कपड्यांचा पेटारा मोठा !
(कांदा)

(२) शंभर डोळे पण इंद्र नव्हे, माणसाच्या खांद्यावर वसतो पण मेणा नव्हे, असा कोण ?

(कोळ्याचे जाळे)

(३) साऱ्या गावाला एकच पासोडी (आकाश)

(४) लाल पोर, दिसे घरोघर. (विस्तव)

(५) सोन्याचा महाल, रत्न लाल, महाल फोडाल तेव्हा हाती घ्याल.

(डाळिंब व त्याचे दाणे)

आसाम :

(१) एक पायाचा बगळा, नाचतो वाटोळा वाटोळा (पंखा)

(२) राजकन्या विणते शेला, घडीबिडी होत नाही, पसरत गेला.

(रस्ता)

(३) गर्जत येतो, गर्जत जातो. कारणावाचून मार खातो.

(नगारा अगर ताशा)

(४) दुहेरी ओढा, शीळ घालीत येतो, त्याला बघून जीव घाबरा होतो, जो तो पळत सुटतो. (आगगाडी)

(५) तीन डोळे आहेत, पण शंकर नव्हे, झाडावर राहतो, पण पक्षीराज नव्हे ! याच्याजवळ पाणी आहे पण मेघ नव्हे, आणि वल्कलं पांघरतो पण राम नव्हे असा कोण ? (नारळ)

(६) पांढरा साहेब, काळी टोपी घालतो. मारायला जाल तर संतापाने जळतो ! (आगपेटीतली काडी)

(७) सांग फुलपाखरा, पाहिलेस नवल काय ? डोकी तीनच पण दहा पाय ? (नांगर धरणारा माणूस व दोन बैले)

(८) गाठीगाठीचा साप रानीचा, स्वभाव सर्पटण्याचा– सात कुऱ्हाडींनी तुटेना. (सावली)

(९) गर्जत येई जगाशी लढाई, रातराने धुंडीत जाई, लोखंडी चणे खाई, असा पक्षी कोण बाई ? * (बंदूक)

---

* हे उखाणे 'फोक लिटरेचर ऑफ आसाम'मध्ये मूळ इंग्रजीत सापडतील.

हे उखाणे सगळे भारतीयच पण परप्रांतातले आहेत. व ते हिंदी आणि इंग्लिशवरू मी रूपांतरीत केले आहेत. पण मी प्रारंभी सांगितल्याप्रमाणे भारताबाहेरच्या दूरदूरच्या देशातही हे उखाणे आहेतच व त्याचे स्वरूपही पुष्कळसे भारतीय उखाण्यांप्रमाणेच दिसते आहे ! नवलपरिची त्या त्या वस्तूंची प्रमुख लक्षणे नेमकी सांगायची, कूट शब्दात वर्णन करायचे व 'ओळखा' म्हणून उखाणा घालायचा, हेच तंत्र. यात मला मिळालेले उखाणे बेडुइन अरबांचे, आफ्रिकेतील बासूटोलँड व झुलू, इंग्लंड, हवाई बेटे, इंडोनेशिया, मेक्सिको, रशिया, फ्रान्स इत्यादी ठिकाणचे आहेत. मोठे सुंदर आहेत व हे सर्व साहित्य मला त्या त्या देशाचे इंग्रजीत रूपांतर झालेले लोकवाङ्मय वाचताना हाती लागले आहे. त्याची थोडी वानगी बघू या.

फ्रान्स :

(१) घोड्याहून चपल, समुद्र करी पार. तरीही भिजत नाही, असा कोण सरदार ?

(सूर्य)

(२) वीस भाऊ आले, सारे पांढरी पगडीवाले !

(बोटे व नखे)

(३) माशाच्या दोन रांगा, त्यात उभी कोण बघा ?

(जीभ)

इंग्लड :

(१) लाल टेकडीच्या भोवती, पांढरे घोडेस्वार दिसती. कधी स्वस्थ उभे तर कधी चालती !

(दात)

(२) लाल होते माडीवर जाते, काळी होते खाली येते !

(विलायती शेगडी)

(३) घराघराभोवती फिरतो राजा, खिडकीत विसरतो पांढरा मोजा !

(बर्फ)

बेडुईन अरबी :

(१) माझी गुहा लाललाल, जिच्यात पांढऱ्या शिपायांची रांग पहाल.

(दात व तोंड)

(२) सख्खे तीन भाई, रहाती एक्या ठायी, पण एकमेकांना स्पर्श करता येत नाही.

(लोखंडी तिपाई)

(३) वरखाली, वरखाली, कुणाच्या या उलाढाली ?

(मुसळ)

(४) पांढरे दगड बसविले विहीरीच्या काठा ।
विहीरीत बसलाय लाल मुलगा छोटा ।
हज्जारदा मस्तक दिसते त्याचे ।
पण दर्शन होईना पायाचे ।
सांगा उत्तर कोड्याचे ।।

(जीभ)

हवाई बेटे :

(९) विचित्र माझा मासा–खाली डोके वर शेपूट ऐसा !

(कांदा)

(२) माझी पेटी वाटोळी,
खोलू कसा ? किल्ली पेटीतच लपली !

(अंडे)

(३) पाणी चिखलात
चिखल दगडात
दगड झाडात !

(नारळ)

आफ्रिकेच्या वन्य जमाती बासुटो, झूलू, योरूबा इ. देशचे उखाणेही लक्षणीय व मजेदार आहेत. इतकेच नव्हे, तर त्याची रचना थेट सुधारलेल्या देशातील कूटप्रश्नांसारखीच आहे हे विशेष. त्यातले काही पुढे दिले आहेत,

बासुटो :

(१) पायावाचून पळत जाई, पंखावाचून उडत जाई
नदीनाल्याला अडत नाही, कडापर्वत ओलांडून जाई
असा विचित्र कोण हा बाई ?

(आवाज)

योरूबा :

(१) सडपातळ शेलाटी, नाजुक अंगकाठी, अशी कोण युवती
खरेदीला जाई, पण बाजारात जाताच येत नाही ?
(नाव. ती पाण्यातच उभी राहते.)

झुलू :

(१) सांगा, ऐसे सैन्य कोणते ? रांग करोनी मंडपी नाचते
पांढरा वेष कमरेपर्यंत, त्यांना दिसतो शोभिवंत ! (दात)

मेक्सिको :

(१) असे कसे शरीर ? तीन हिस्से मिळाले,
पण डोकेच पळाले !
(अंगरखा)

डॉक्टर रिचर्ड डॉर्सन नावाच्या गृहस्थाने 'रीजनल फोकलोर इन् द युनायटेड स्टेट्स्' नावाचे पुस्तक लिहिले आहे, त्यात त्याने त्या त्या प्रांतातून चालणाऱ्या काही मजेदार शब्दकूटांची (उखाण्यांची) अशीच उदाहरणे दिली आहेत.

ती पुढीलप्रमाणे :

(९) एकसारखे फिरतेफिरते अन् तरीही आपले सारखे उभेच !
काय ?
(गिरणीतले जाते)

(२) मोजून मापून विकत घ्यायचं अन् मग
नेहमी लाथेनं तुडवीत रहायचं ! असं काय ?
(सतरंजी)

(३) हसत हसत जाते– पण रडत परत येते, ती कोण ?
(विहिरीत सोडलेली बादली)

(४) बसते नेहमी छपराखाली तरी आपली सदा ओली !
(जीभ)

मेक्सिकन फोकलोरमधून काही मजेदार उखाणे रिचर्डसाहेबांनी दिले आहेत ते पुढीलप्रमाणे :

(१) बर्फाहून शुभ्र, कोळशाहून काळे तोंड नसून

बोले अन् पाय नसून चाले, असे कोण ? (पत्र)

(२) रीटा रीटा ! रीटा रानात ओरडते खूप,
पण घरात बसते गुपचूप !

(कुन्हाड)

(३) एवढीशी मैना, कुणाला उचलता येईना !

(सावली)

(४) मजेदार कुन्हाड, दांडा एक पण डोकी अनेक !

(केळीचा घड)

(५) असं कसं घर ? त्याला नाही दार !

(अंडे)

(६) असा मास्तर कोणता ?
जो शिकवतो न् बोलता ?

(पुस्तक)

रशियन लोकसाहित्यकार सोकोलोव्ह याने ' रशियन फोकलोर ' नावाचा ग्रंथ लिहिला आहे व त्याचे इंग्रजी भाषांतर कॅथरिन रूथ स्मिथ हिने केले आहे. त्यात पुढील निराळचा पद्धतीचे उखाणे आले आहेत :

(१) राजाराणी, एकमेकांना बघतात नीट,
पण कधीही नाही त्यांची भेट !

(जमीन व आकाश)

(२) माळचाच्या मळचात, भिजलेले वासरू !

(जीभ)

(३) पोरगी बसते ओटचावर, उघडे तोंड उंचावर !

(तुतारी)

(४) म्हातारीच्या झोपडीला ब्रेडचा तुकडा
कुत्रा भुंकून दमला, नाही मिळत कोणाला !

(चंद्र)

(५) उभी कोण बावळट, तिचे तोंड बरबट ?

(मेणबत्ती)

असे हे परदेशी व परप्रांतीय उखाणे. कोठेही जा, तेथल्या भाषेची मूळ जडणघडण एकाच पद्धतीने झाली असावी, हे अनुमान त्या त्या देशाच्या लोक-कथांप्रमाणेच अगर म्हणींप्रमाणेच या छोट्या कूटप्रश्नातूनही प्रत्ययास येते. त्या त्या सौंदर्यवर्धित करणारेच हे भाषेतले पूर्वकालीन छोटे छोटे नमुने असतात.

★

३ : उदो उदो गे अंबाबाई !

एक धार्मिक कुलाचार म्हणून भवानीदेवीचा गोंधळ अनेक घरांतून साक्षेपाने घडवून आणला जातो.

विशेषतः लग्नकार्यानंतर तर एक अवश्य धर्मबंधन म्हणून सुधारलेल्या घराण्यांतूनहि गोंधळांचा कार्यक्रम होतांना आढळतो. अशाच काही समारंभांना हजर राहिल्यामुळे गोंधळी व त्यांचा गोंधळ इकडे लक्ष वेधले गेले. वाटले, ह्याही कलेत अनेक बाबींचा आजच्या घडीला नव्याने विचार होणे जरुरीचे आहे.

तसे पाहिले तर चारपांच लोकांचा एक संच या गोंधळास लागतो. एक तुणतुणे वाजविणारा, एक झांजा वाजविणारा आणि तबलजी. शिवाय देवीची पूजा बांधलेली असते, तेथे एक दिवटी लावलेली असते, तिला तेल घालण्यास आणखी एकजण. या सर्वांच्या सहाय्याने मुख्य गोंधळी एक गद्य-पद्यमय कथा सांगतो. बहुधा देवीच्या महात्म्याचीच ही गोष्ट असते. या देवीची पूजा सत्यनारायणाच्या पूजेप्रमाणेच केलेली असते, तसाच तांब्या, ताम्हन वगैरे. वेगळेपणाच सांगावयाचा तर एक कवड्यांची माळ तांब्याला घातलेली असते, अितकाच फरक. त्या पूजेसमोरच गोंधळी कथा सुरू करतो.

' उदो उदो गे अंबाबाई ! ' एकदम गजर उठला अन् गोंधळ सुरू झाला. मुख्य गोंधळ्याने डोळे मिटून देवीपुढे पोत पाजळले व आवाहनास चांगल्या

खणखणीत उंच स्वरांत सुरुवात केली. किती देवांना बोलावणे केले त्याने! चिंचवडचा मोरया, कोल्हापूरची अंबाबाई, चिंचणीची मायाक्का, पंढरपूरचा विठोबा अशा अनेकानेक देवांना 'आवतन' दिले. झांज खणाणून वाजूं लागली व त्या तालावर गोंधळी नाचू लागला. पायांतले घुंगूर खळ्ळ्–खळाळून त्याच्या गाण्यास साथ देऊ लागले. तबला-डग्गा गळ्यात अडकवणारा माणूस मागेपुढे होऊन ठेका धरूं लागला. रंगदेवता या भोळ्या भावाला भुलून रंगमंचावर जणू अवतीर्ण झाली. रसवंतीचा तो एक नवाच आविष्कार मी पाहिला.

गोंधळी बोलत होता. भाषा खेडूताची. ग्रामीण जनांना अगदी आपली वाटणारी. 'देवी का न्हाई येत तूं? भक्तानं दरबार क्येलाया! संभर रुपै खर्च केलं! (खूप ओरडून) आई भवानी, भक्तावर परसन्न होऊन तूं हथं याया होवं. मग? असा येळ कां करतीयास? अंबाबाओ! कशापायी राग धरलाया?'

गोंधळ्यांचा कथनप्रकार

गोंधळ्याचा सर्व कथेचा नमुना हाच. हीच भाषा. तीस वर्षांपूर्वी मीं प्रथम गोंधळ ऐकला तेव्हाच्या नि आतां ऐकला, त्याच्या भाषेंत शब्दाचाहि फरक नाही! नवें संस्करण नाही, गोंधळ्यांच्या पोषाखांतहि एखाद्या सुताचासुद्धा फरक नाही. तोच लाल डगला पेशवाओ पद्धतीचा आणि तोच मंदील. गळ्यांत तशीच कवड्यांची माळ. सारा थाट तोच. अितके जोरदार आवाहन झाले तरी देवी येईनाच! मग गोंधळ्याने देवीच्या मनधरण्या सुरू केल्या. 'भक्तासाठी तो जगजेठी' कायकाय करतो याचे देवीला बरेच दाखले दिले आणि कथेस सुरुवात केली.

त्या कथनप्रकारास कथा म्हणावे की काय, याचाच 'गोंधळ' मनांत उद्भवण्यासारखा होता! तसें पाहिले तर गोंधळास कथानक होते–निश्चित एक कथा होती ती आणि भक्तीचा महिमा हेच त्या कथेचे उद्दिष्टहि होते. पण त्यांत अितक्या कथनप्रकारांचे मिश्रण झाले होते की काय सांगावे? ती एक कथा होतीच, तरी पण या कथेला कालमर्यादा नव्हतीच बहुधा. लोककथांपैकीच एखादी पण ज्यांत भक्तीचे वर्णन असेल अशी कथा निवडण्यांत येते. गोंधळ्यांनी या सर्व कथा कोठून मिळवल्या आणि त्याला अनुसंधित कवने मूळ कोणीं रचून दिली, ही संविधानके

कोणत्या कालांत रचली हा लोकसाहित्य-दृष्टीने अेक अभ्यासविषय ठरायला हरकत नाही, अितका यांत संशोधनास वाव आहे.

या कथेंत लोककथेची सर्व सामुग्री असते. सप्तसमुद्र ओलांडून जाणारा राजपुत्र, संकटांत सापडलेली नायिका, बारा वर्षे तप करणारी मंडळी, शापाने विपरीतावस्था प्राप्त झालेल्या व्यक्ति, उःशापाच्या कांही हातच्या राखून ठेवलेल्या घटना, राजे-राण्या, सारें, येते यांत. पण प्रश्न एकच पडतो, तो म्हणजे ही कोठल्या काळची कथा ? गोंधळात पुष्कळदा, प्रथम, द्रौपदीला देवाने कोठलीं वस्त्रे पुरविली, अगर राजसूय यज्ञांत भोजनजिन्नस कोणते होते, याचे चटकदार कटाव कानी पडूं लागतात. त्यांत कृष्ण आहे. स्वर्गलोक आहे, नारदही आहेच. शिवाय शाप, उःशाप, देवदेवता ई. प्रकरणांमुळे या कथेला पौराणिकत्त्व आलेलें आहे असें मानावे, तोंवर क्षणार्धांत कथानायक 'बारा हज्जार लष्कर' घेअून रायगडावर उदेभानकडे गेल्याचा पोवाडा सुरू होतो ! तोरणा किल्ला, जिजाबाई, शिवाजीमहाराज, त्यांचे अष्टप्रधान यांचें वर्णन रंगदारपणे कवनांतून सुरू होते. जणू रंगमंच बदलतो. मुकुट, अप्सरा, देवता, ऋषींचे तपोवन, इद्राचा दरबार– सगळा देखावा अदृश्य होअून अैतिहासिक काल तेथे आपला संसार अैसपैस मांडतो! तलवारी खणाणूं लागतात. (गोंधळी एक तरवारहि अधूनमधून अुपसून दाखवीत असतो,) जिजाबाई बोलतात, 'आधी कोंडाण्याचं लग्न' असे तानाजीही ठासून सांगतो. तो बारा मावळचा मुलूख, ते मावळे लोक, शिवाजीचे घनगंभीर शब्द– एकेक मुद्दा गोंधळी रंगून सांगत असतो.

ऐकतांऐकतां पौराणिकाची सीमा सोडून श्रोत्याचे मन एकदम शिवकालांत वावरूं लागते, पण त्याला येथेहि स्थैर्य लाभत नाहीच. शिवकालांतून झटपट गोंधळी बाहेर येतो अन् परत मागे कालौघांत शिरून कृष्ण-राधेचा अनेक कथेकऱ्यांना कवींना आश्रयदाता ठरलेला चिरंतन प्रणय रसिकपणे वर्णू लागतो. तऱ्हेतऱ्हेच्या गोपी, त्यांची रूपवर्णने, तरुण कृष्णाच्या व गोपींच्या प्रेमभक्तीचा सोहळा 'गवळणींतून' कानावर पडू लागतो ! वाटते, जगदंबेच्या कथेशी या कृष्ण-लीलांचा कांही संबंध तरी आहे काय ? पण गोंधळ्याच्या हे ध्यानीमनी नसते. तो तल्लीन होऊन बोलत असतो, गौळणी म्हणत असतो. त्यातले काही प्रसंग संवादरूप होऊन खेडूतांना आकर्षित

करीत असतात. मग पौराणिकाची मोहमाया श्रोत्यावर फार वेळ घालणे उचित नाही हे जाणून गोंधळी पवित्रा बदलतो. एकदम गोकुळवृंदावन सोडून तो पुण्याच्या पेशवाईत प्रवेशतो व पेशावाईचा जामानिमा संभाळीत बोलू लागतो. रावबाजींच्या वेळच्या लावण्यातले काही चरण कानावर पडू लागतात किंवा शिंदे, होळकर, पटवर्धन सगळ्या सरदारांचा दरबार कसा भरगच्च अन् बादशाही होता याचे एक शब्दचित्र नजरेसमोर कवनातून साकार होऊ लागते. त्यात सवाई माधवरावांचे राजवर्णन प्रगट होते. परंतु येथेही गोंधळ्याचा कालप्रवास थांबत नाही ! शिवाजीचा भगवा झेंडा एकदम स्वराज्याच्या तिरंगी झेंड्यात रूपांतरित होतो. अधिवेशने, मीटिंग यांच्या वरून विनोदाची निर्मिति होते. आजच्या स्वतंत्र भारताचा उल्लेख होतो !

अशी ही 'कालातीत' कथा असल्याने त्यात विसंवादित्व फार मोठ्या प्रमाणावर निर्माण होते यात शंका नाही. कथेकरी जसे एकदा अभंग घेऊन त्याचेच वेदांतपर पूर्वरंग व कथात्मक उत्तररंग असा विभाग करतात, तशा प्रकारची एकसूत्रता यात का नसावी हा विचार दरेक गोंधळ पाहताना मनात येतो. अर्थात कथा आणि गोंधळ यात एक स्पष्ट फरक दिसतो. कथा ही संतनिर्मित वाङ्मय व संत-कथा यांवरच आधारलेली असते; तर गोंधळात कटाव, पोवाडे, गवळणी व गीते यांचा प्रामुख्याने वापर असतो. परंतु संतांचे अभंग वगैरे त्यात बहुधा नसतातच. दोन्हीही व प्रसंगनिष्ठ विनोदाने बहरतात. पण कथा विनोदी गोष्टींनी सजविलेली असते तर गोंधळातील विनोदस्थळे वेगळीच असून विशेष म्हणजे ती नाटचगुणालंकृतहि असतात. कथेंतून भक्तिरसावर व पारमार्थिक विचारांवर निरूपण असते तर गोंधळातील कथेतून पोवाडे, गवळणींतील प्रासंगिक गेय विभाग प्रसंगनिष्ठ संवादांचे आधिक्य हे वैशिष्टच जाणवते. कथेकऱ्याची कथा नागररमणीप्रमाणे सौम्यपणे सुसंस्कृत भाषेचे उपायन रसिकापुढे आणील व त्यातून ईश्वरी अनंत स्वरूपाचे भक्तिपाठ देईल तर गोंधळ हा भोळसर खेडवळासारखा जिभेला येईल ते स्पष्ट सांगेल व त्यातून जगदंबेच्याच भक्तीचे वर्णन करील ! रसवंती तीच, पण रूपभिन्नता ही अशी आहे.

कथनातील नाटच

गोंधळ्याची कथा कशीहि असो, पण या कथेला गोंधळ्यांचा मुद्राभिनय,

भिन्न पात्रे कल्पून आपसातच होणारे नाट्योचित संवाद आणि विनोदी निवेदन अशी जोड मिळालेली असते. अशी ही बोलकथा त्या दिवशी आमचा गोंधळी व त्याचे सहकारी बोलून दाखवू लागले तेव्हा गोंधळ्याचे एकेक नाट्यगुण लक्षात भरू लागले. क्षणात मुख्य गोंधळी गोपी होऊन बोले तेव्हा खरोखरच एखादी खेडूत बाई किरट्या आवाजात बोलते आहे असे वाटे; इतका आवाजात, शब्दात, इतकेच नव्हे तर अविर्भावातदेखील तो स्त्रीसुलभ वाटणारे बदल करायचा. आणि क्षणात तो कृष्णाची भाषणे वोलून दाखवायचा. ती भाषा दमदार, खड्या सुराची (वेळप्रसंगी मिशीवर ताव देवून जोरात म्हटलेली,) असायची ! इतर गोपांगनांची बोलणी त्याचे दुसरे साथकरी बोलत व एक नाट्यप्रवेश ग्रामीण भाषेत साकार होऊन या कथेत सामील होई, ऐकणारेहि बहुसंख्य ग्रामीणच ! त्याच्या तांबूस दंतपंक्ती खुषीने लकाकून उठत हे प्रवेश पाहताना, तन्मय भाविकतेने ते सजग होवून ध्यान देत. अशी कथानकातली संभाषणे प्रत्यक्ष मूर्त करण्याची रीत तमाशाच्या वगातहि असते, त्याचीच ही एक झलक म्हणता येईल. अर्थात ही भाषणे नाटकातल्याप्रमाणे पाठ केलेली नसतात. अगर तेथे कुणी प्रॉम्प्टरहि नसतो. कथानुरोधाने जमेल तसे भाषण करायचे ! त्यामुळे पुनरुक्तीचा अपरिहार्य दोष उत्पन्न होतोच. पण जर हे साथकरी चतुर व विनोदी असतील तर ही प्रसंगनिष्ठ भाषणे बरीच रंगतात. एवढेच नव्हे तर निराळ्या विनोदानेहि खुलू लागतात. हा विनोद अर्थातच उथळ व स्थूलरूप असतो पण ऐकणारे व पाहणारे गाली हसतात व पेंगणारे माना झटकून पुन्हा ताठ बसू लागतात, ऐवढे सामर्थ्य त्यात खास असते हे मान्य करावे लागेल.

गोंधळातील नर्मविनोद

आणि अशा या नर्मविनोदाची झालर गोंधळ्याच्या प्रत्येक कथापटास असतेच. त्यामुळे त्यातला कंटाळवाणेपणा नाहीसा होतो. उदाहरणार्थ, कृष्णाने गोपींची लुगडी झाडावर लपवून ठेवली हा एक पौराणिक विचित्र प्रसंग पाहा. यावर अनेक कवींनी गवळणी रचलेल्या आहेत. त्यातहि भिन्न-रूप कल्पकता आढळात आहेच. पण समजा या सर्वच गवळणी वेगवेगळ्या जातीच्या होत्या– एक परदेशी, एक कानडी, एक मुस्लिम ! मग दरएक कडवे त्याच भावार्थाचे पण भाषाभिन्नतेचाहि एक नवाच आविष्कार

प्रकटवणारे असेल की नाही ? अशी ही गवळण म्हणजे गडकऱ्यांच्या प्रसिद्ध विनोदी गोकुळच्या नात्यागोत्याचीच ! ती गोंधळात आली की हमखास विनोदाची लयलूट व्हावयाच्या खात्रीने लोक सरसावून बसलेच म्हणून समजावे. यातच स्वतः गोंधळी गोपींचे हावभाव करून गयावया करीत, कृष्णाजवळ लुगडे मागत असतो, तबला संभाळणारा ' कृष्ण ' होऊन गुर्मीची उत्तरे देत असतो व ' यशोदानंदना ! ' असे मराठी गोपीने ओरडून म्हटले व एक नखरेल गिरकी घेतली की तबल्याची जोरदार थाप देत कृष्णही (साथकरी) तिला रोखठोक नकार देतो. लोकांच्यात खसखस पिकते. धाकटी मुले तर खदाखदा हसतात.

पुढील संवाद पाहाः कानडी गवळण कानडी भाषेत आपले पातळ मागत आहे व कृष्ण नकार देत आहे हा प्रसंग, कानडी गोपी मनधरण्या करीत ' कुडु गोविंदा कुडु–' असे म्हणते आहे. कृष्ण डोळे मिचकावून म्हणतो– ' आँ ? कुडु ? कुडु का कवाड ? थंडीनं कुडुकुडु करतीस वाटतं ! (पुन्हा गोपीचे कानडी शब्द) कृष्ण म्हणतो, ' बाई, तुझं बोलणं आम्हाला समजत न्हाई. काय म्हनतीयास तू ? निस्तं गुडगुडगुडगुड म्हंजी हाय काय ? नीट बोल जरा. (हशा) काय लुगडं ? न्हाई मिळायचं, पान्याभाईर ये. न्हाई येत ? मंग बैस थंडीनं तिथंच मरत गुमान. देत न्हाई ! '

याच्या जोडीला या गृहीत भूमिकानुसार गोंधळी व तबलजीचे हावभाव! मग गोंधळांत किंवा नाट्य गोंधळांत रंग भरायला उशीर काय ? आणि विनोदाची मजल येवढ्यावरच थांबत नाही. ग्रामीण भाषेचे काहीसे औद्धत्य व रोखठोकपणा यांचेहि मिश्रण या विनोदासाठी गोंधळी सहजपणे कथेत करीत असतोच. उदाहरणार्थ– देवी जगदंबेने एका भक्ताला उत्तम बायको पाहून द्यायचे कबूल केले व त्रिभुवनात शोध लावून एक उत्कृष्ट मुलगी निवडली. ती होती एका भयंकर रानात; तेथे जा व ती मिळवून आण म्हणून सांगितले. आपल्या सुसंस्कृत लोककथाचे नायक यावर वेडेवाकडे कधीच नाही बोलायचे ! ते देवीचा आशीर्वाद घेतील अन् साहसे करायला एकदम प्रवृत्त होऊन चालू लागतील. पण हा नायक आहे ग्रामीण. राजपुत्र असला तरी त्याची मनःप्रवृत्ति त्या गोंधळ्याच्या मनोभूमिकेहून वेगळी नाही. तो देवीशी बोलू लागतो. हा संवाद पाहा–

नायक– काय देवी, बायकु आणली का ? बरूवर दिसत न्हाई ती ? का इसरलीस कुठं तरी तिला ?

देवी– आणली रं– पर...पर...

नायक– मंग ? रानात बसवून पुढं आलीयास व्हय ग अंबाबाई ? बायकु कशी हाय! नकटी न्हाई ना! काळीबेरी न्हाई ना! हा ! असली बायकु काय करायची ! मला पायजे आकाशातली बिजली– दवण्याची काडी– पाटावाची घडी ! तशी असलं तर दाव ! न्हाईतर मला नको बायकु, जा.

देवी– अरं आहे बायकु, आणलीया, त्या तिकडच्या रानात हाय. देवानं शाप दिल्याली कन्या हाय. इंद्राची बाळारानी (हे नावहि ग्रामीण चालीचे नव्हे काय ?) हिला तुझी बायकु म्हणून म्यां ठरवलीया. तू तिकडे सात समिंदर ओलांडून जा अन् आन तिला !

नायक– (संतापून) न्हाई. मला इथ्थं बायकु होवी. आठ दिस अन्न-पानी सोडून म्यां तप क्येलं तुजं. ते काय फुकाट व्हयं ! अग वा ग अंबाबाई ! म्हनं, तू जा लांब सात समिंदरपार ! काय ग अंबू ? आँ ? भक्ताची विछा अशी पुरी करतेस, व्हय ग अंबू ?

देवी– काय ? अंबू? आता काय कर्माचा भोग म्हनू का काय ह्येच्यापुढं !

– पण हा संवाद ऐकताना या भक्ताचा बोलण्याचा अतिप्रसंगी अधिकपणा कोणालाहि बोचत नाही. उलट श्रोत्यांना ही जवळीक म्हणजे तुकारामाने किंवा जनीने देवाला ज्या प्रेमाधिक्याने शिव्या दिल्या असतील त्याच प्रकारच्या सलगीची एक नवी तऱ्हा वाटते व संतोषाने त्यांच्या माना डुलूं लागताना दिसतात. उलट देवीने 'मंग तुला काय हवंय ?' म्हणून विचारताच 'आता लई येळ बोलनं झालं. चार कोप 'च्या' देशील तर घसा जरा वला तरी व्हईल !' असे गोंधळी मिस्किलपणे म्हणतो व ती प्रच्छन्न सूचना ध्यानी घेऊन त्यांना चहा घेण्यासाठी खुशाल पाच-दहा मिनिटांचा 'इंटरव्हल' घेता येतो.

चमत्कृतिपूर्ण कवने

विनोदाप्रमाणे गोंधळात रसनिष्पत्ति होण्यासाठी गोंधळ्याजवळ अनेक चमत्कृतिपूर्ण कवने असतात व ती लोकांना सहज आवडतील अशा स्थूल वर्णनाचीही असतात. उदाहरणार्थ राजपुत्राची स्वारी निघाली. बाया बघाया आल्या. गावोगावच्या बायका. सगळ्या जातींच्या, सगळ्या प्रतींच्या

होत्या. त्यात कोणकोण होत्या ? ' ऐका !' अशी प्रस्तावना करून गोंधळी एकेकीची नावनिशीवार माहिती देऊ लागतोः–

' आली लोहारीण गहिना, सुतरीण मैना, कोळ्याची चागुणा !
शेणव्याची गजी, तांबटाची सजी, परभाची जिजी
मारवाड्याची रखमी, कोमट्याची सोमी, पटवेकराची गोमी !
बामणाची वाराणशी, रंगारिण तुळशी, वाण्याची हौशी
सगळ्या आल्या धावुनी ! आल्या ग धावुनी !'

अन् मन प्रेक्षक व श्रोते उत्कंठेने ऐकू लागतात. तसेच व्यवहारात काय असावे, काय नसावे अशा अर्थाचाहि एक प्रसिद्ध फटका आहे तो गोधळ्याच्या शिलकेला असतो. तो असा चुरचुरीत की जणू झोपाळूपणाची राख झटकून वृत्ति अग्निकणाप्रमाणे फुलून उठावी– ' मित्र कसा नसावा ?' तर ' बायकात बसणार, गप्पा ठोकणार, डबऱ्यांत पाडणार नसावा !' हे ऐकताना हसू ओठांवर उमटले नाही तरच नवल !

गोंधळ्याच्या गरजा व सुधारणा

अशा या सर्व गोष्टी संभाळीत चांगला गोंधळी पूर्वीच्या नाटकाप्रमाणे पहाटे चारचार वाजेपर्यंत गोधळ चालवू शकतो. श्रोतेहि तल्लीनतेने बसून ऐकताना दिसतात. गोंधळ्याला बरी आवाजी असेल तर गोंधळात संगीतही बऱ्याच अंशी निर्माण होते पण बहुधा नित्य अति उच्च स्वरात ओरडून गाणी म्हटल्याने आवाजात चिरकेपणा येतोसे दिसून येते. साथीला पेटी असेल तर चांगलेच. कारण मग आवाज किती उंच काढावा याचा बरोबर अंदाज मिळेल, पण ती सोय वा सुधारणा अद्यापहि दिसून येत नाही. साथ असते ती गोंधळ्याचे गाणे झाकून जाईल इतकी मोठी. तबल्याचा ठण-ठणाट, झांजाचा दणदणाट या आवाजाला शह देण्यासाठी गोंधळीहि तार-स्वराने गाणे म्हणतो व त्याचे साथकरीहि इतके ओरडून गाणे म्हणताना अगजी श्रमून गेलेले दिसतात. माईकची व्यवस्था मोठमोठ्या व्याख्यानाना व गायनकार्यक्रमांना असतेच, ती या लोककलेसाठी का उपयोगिली जाऊ नये ? ही एक नवी उपयुक्त सुधारणा खेडूत व गोंधळी अमान्यच करतील काय ? ह्यामुळे आवाजावर वर्षानुवर्षे पडणारा ताण कमी होईल व साध्या गाण्यांनी साथहि मधुर व श्रवणीय होऊ शकेल.

असे हे खेडचांतून नित्य चालणारे गोंधळ. ते पाहाताना आणखीही काही विचार मनात येतात. एक तर तमाशांना जसा उर्जितकाळ आला तसा या लोकशाहीच्या काळात याही ग्रामप्रिय लोककलेला यायला कोणता प्रत्यवाय आहे ? दुसरे, सारी रात्ररात्र खेडूत जनतेला गुंगवून ठेवणारे पाठांतर गोंधळी लोक करू शकतात, पण या सहासात तास चालणाऱ्या आख्यानाला नीटशी आखणी व सुसूत्र रचना नको काय ? आणि याबाबत जाणत्या, सुशिक्षित लोकांना काही एक साह्य करता येणार नाही काय ? यातील कवने पाहिली तर–

' मग तो कार्य कराया लागला ! '
' तेथून गेला गंगेच्या काठाला '

– अशा प्रकारची साधीशी आढळतात. याहून अधिक काव्यगुणांनी व प्रतिभेने शोभणारी अशी कथानुरूप कवने कोणी शाहीर प्रवृत्तीचा आधुनिक कवि करू शकणारच नाही का ? अशा रेखीव काव्यपंक्तीमुळे गोंधळात एक नवी रंगत येणे सहज शक्य होईल. गोंधळात अनेक विनोदी गाणीहि असतात. भोजनपदार्थांची नावे, द्रौपदी वस्त्रहरणातील अनेक वस्त्राची नावे इत्यादींनी गोधळकथात चत्मकृतिजन्य आनंद निर्माण होत असतो. पण ही गरज जुन्या कटावातूनच बहुतेक गोंधळचांना आज भागवून घ्यावी लागत आहे. एका परिचित गोंधळचाने मजजवळ सर्व दागिन्यांची नावे असलेले गाणे मुद्दाम मागितले होते. अनंत फंदीच्या चंद्रावळीत ते वर्णन सापडले.

तेव्हा ते स्वीकारताना तो वृद्ध गोंधळी म्हणाला, ' काय करावं ? लई तूट पडतीया अशा गान्यांची बगा आमाला.' यावरून त्यांची नित्याची गरज ध्यानी येईल. कविजनांनी ही उणीव भरून काढायचे ठरवले त त्यांच्यावर खरोखर उपकारच होणार आहेत.

गोंधळाची व्यवस्थित कथारचना हाही एक अभ्यासविषय होण्याजोगा आहे. देवीच्या कथेची सुसूत्र मांडणी, कालानुरूप वर्णने, कथानुसंधानास जुळतीलशा विनोदकथा आणि कथेला शोभून दिसावा अशा प्रकारचा उपदेश यांची नीटनेटकी जुळणी एखाद्या ग्रामीण कथा लिहिण्यांत वाकबगार लेखकाने करून दिल्यास गोंधळातील विस्कळित कथन आटोपसर,

सुसंगत व अधिक आकर्षक होऊ शकणार नाही काय ? तमाशाचा वग लिहिणारे लोक आहेत, आजही पोवाडे रचणारे शाहीर आहेत, मग 'गोंधळ लिहून देणारे लेखक मिळणे अशक्यप्राय खात्रीने नाही. द्रव्याभावी आज ही कला उपेक्षित होत चाललेली दिसते. मुख्य गोंधळ्याचा पोषाखही जीर्णशीर्ण व फाटका दिसावा ह्याचीहि बोच मनात घर करून राहते.

ज्याप्रमाणे तमाशाने शृंगाराचा व पोवाड्याने वीररसाचा आविष्कार केला जातो त्याच मालिकेत भक्तिरसाचा प्रसार करणारी ही एक ग्रामीण जनतेची लोककला. पण तिला आज सरकारी आश्रय नाही, उत्पन्न नीट नाही ! पूर्वापार चालत आलेली लळिते, नाटके हीहि अशीच होती, पण या लोकरंजनाच्या कलामध्ये कालानुरूप अनेक सुधारणा होतहोत त्यांना आज किती आधुनिकत्व प्राप्त झाले. कथेकरीहि नव्या आकर्षक चाली, स्वातंत्र्यांतील देशवीरांची नवी कथानके व आधुनिक वाद्यांची साथ घेऊन कालाला सुसंगत कथा सांगू लागले, पण गोंधळ ही लोककला मात्र पूर्वीच्या बासनातील कपड्यांतच पूर्वरूपाने अजून वावरते आहे. कधीकाळची तीच ती कथाकवने घेऊन, कशीबशी लोकरंजनार्थ सन्मुख येत आहे. तिचा वेष जुना, कथेवर जुनेपणाची कळा, त्यांतील निवेदनातहि पुराण्या कल्पनाचा वापर अधिक. अशा स्थितीत गोंधळ म्हणजे अठरा धान्याचे कडबोळे व व्यावहारिक अर्थीहि 'गोंधळ' ठरणारा पण कुलाचाराने बांधलेला रंजनप्रकार होऊन बसला असल्यास काय आश्चर्य ? इकडे जनतेचे लक्ष वेधले जाईल व इतर कलाप्रमाणे रसवंतीच्या याही एका भिन्न आविष्काराला योग्य नियोजन, साह्य व सुधारणा यांचे भाग्य लाभेल तर– तर गोंधळाला, गोंधळी लोकाना उजागरी व प्रतिष्ठा प्राप्त होईल व शब्दार्थाप्रमाणे याचा वाच्यार्थहि 'एक लोककला' हाच राहील ! पण हे कधी घडावयाचे कोण जाणे !

★

४ : अशा लोककथा आणि अशी रंजकता

'लोककथा–!'

हा शब्द उच्चारल्यावरोबर वाचकांच्या मनांत- लोककथा ? ऊंऽ त्यांत काय ? त्या आजीबाईंच्या गोष्टी बालांनाच ठीक ! आम्हाला काय महत्त्व?' असा एक उपेक्षेचा ठसा उमटून जाताना आढळतो, तेच तर आधी मला आवर्जून सांगायचं आहे. हे केवळ बालरंजन नव्हे, तर लहानांइतकाच मोठ्यांनाही उचित ठरणारा हा एक प्राचीन वाङ्मयप्रकार होता व आहे. ही जुन्या, फार फार प्राचीन काळची लघुकथाच म्हणा ? आजच्या लघु-कथेचे जे अनेक प्रकार आहेत तसेच या कथावाङ्मयातही बोधकथा, लघुत्तम कथा, प्राणी कथा, दीर्घकथा उर्फ गाथा, रूपक कथा, चातुर्यकथा, इ. अनंत प्रकार आहेत ! आणि मानवी मनाला कथा-रंजनाची विलक्षण आवड असते, मग तो कालखंड कोणताही असेना ! पूर्वीच्या कालातही जाणत्या मंडळींना कथाश्रवणाची ओढ होती– वेड होतेच. पुराणातूनही हे उल्लेख आहेत. रामप्रभु वनवासी झाल्यावर भरत अत्यंत दुःखीकष्टी झाला, तेव्हा त्याचे मातामह कैकराज यांनी राजदरबारातले व्यवसायी कथाकथक आणवले, अशी रामायणांत हकीकत आहे. नंतर तर हा एक आर्थिक प्राप्तीचा धंदाही ठरला. तुर्कस्थानात भरबाजारात हे कथाकथक कथा सुरू करीत व येणारे जाणारे थांबून कथा ऐकत उभे राहात. इटलीच्या पेंटामेरान

नावाच्या ग्रंथांत गरोदर राणीच्या मनोरंजनार्थ कथा सांगणाऱ्या पगारी वृद्ध बायांची नेमणूक केल्याची हकीगत येते. यवन राजांनी या मंडळींना दास्तान्‌गो (दास्तान–गोष्ट) असे नाव दिले होते. आज मीही या 'दास्तानगोची भूमिका घेऊन लोककथेतल्या काही रसाळ वैशिष्ट्यांच्या गोष्टी वाचकांना सांगणार आहे.

लोककथा हा काही केवळ भारताचाच वारसा अगर परंपरा नव्हे. उलट जगांतल्या दरेक देशांत, अगदी वन्य जमातींच्या देशांतही, या कथा वैपुल्याने आढळतात. भारतीय कथासरित्सागर हचा गुणाढ्याच्या एका ग्रंथातच हजारो कथा ! इतर देशांतही यांची समृद्धी अशीच- सागर नव्हे, महासागरच ठरण्यासारखी. यातले कांही निवडक मौक्तिककण आपण आपल्या विषयाच्या दृष्टीने निवडून घेऊन त्यांचे परीक्षण व रसग्रहण करू या.

लोककथांतील व्यक्तिदर्शन

वर मी म्हटलेच की पूर्वकालाची लोककथा म्हणजे जुन्या जगाची लघुकथाच. पण एक दोन मोठे फरक या दोघींच्या स्वरूपात आहेत. लघुकथा असते भावनाप्रधान, तर लोककथा ? ती पूर्ण व्यवहारी व फक्त घटना झरझर सांगत जाणारी. उगीच मनोविश्लेषणाचा कीस काढायची लोककथेची प्रवृत्तीच नाही ! राक्षसाने अगर ड्रॅगनने पळवलेली राजकन्या फार तर डोळे टिपीत बसेल, पण पाने भरभरून स्वतःची मनस्थिती वर्णन करीत बसणार नाही कधी, उलट लघुकथा या नाजुक भावभावनांचे चित्रण करण्यातच जास्त रंगणार ! लोककथेचा शेवट ठराविकच. दुर्जनांचा नाश आणि सज्जनांना यश, हेच सांगण्याचे तिचे अंतिम ध्येय. उलट लघुकथा ? ती अनिर्बंध, मुक्त आहे संकेतापासून. ठराविक वर्णने व तोच शेवट लघुकथेला कधीच मानवत नाही ! शिवाय लोककथेची मूळ प्रकृतीच कल्पित, अद्‌भुतरम्यतेची तर, लघुकथेची पूर्ण वास्तववादाची. हा फार मोठा फरक ध्यानी घेऊन मगच लोककथेच्या इतर मजेदार देहबंधाकडे लक्ष देणे चांगले.

आधीच एक सांगून टाकते. या लोककथांत केवळ अद्‌भुतरम्यताच असते, असे मात्र नाही; तर या कथावाङ्मयातले तऱ्हेतऱ्हेच्या व्यक्तिदर्शनाचे नमुनेही लक्षणीय आहेत. मनुष्यस्वभाव हा आज आहे, तसाच प्राचीनकालीही होता. काल बदलतो, पण माणसाचा देहस्वभाव आहे तोच, हे

सत्य यांतल्या कथांतून ठायी ठायी व्यक्त झाले आहे. किती प्रकारची ही माणसे ? सुनांचा छळ करणाऱ्या कजास सासवा तेव्हाही होत्या, कामांध माणसे– निरपराध तरुणींना पळवून नेणारी– तेव्हाही होतीच ! अत्यंत लोभी धनिक, निर्दय राजे, दुष्टांच्या कारवाया व कारस्थाने सोसणारी सज्जुणी सालस माणसे, श्रमजीवी गरीब लोक, चातुर्याने मन जिंकणारे बुद्धिमंत, अलौकिक सौंदर्याच्या मूर्त प्रतिमा ठरणाऱ्या युवती अगर पोटच्या मुलासाठी स्वतःचे बलिदान करणाऱ्या आया, ही सगळी आजची माणसे त्यावेळीही जरूर या कथांत वावरत होती. अर्थात त्यांचा थाट वेगळा, पण रूप तर हेच ? विविध अशा या व्यक्तिदर्शनाने माझे मन तर या वाङ्मयाकडे अधिकच आकर्षित झाले आहे आणि महत्वाची बाब, यांत कोटलाही चमत्कार नाही ! या अगदी तुमच्या आमच्यासारख्यांच्या हकीकती, त्या केवळ बालांच्याच असू शकणार नाहीत, हे आता वाचकांच्या ध्यानी येईलच. आणि एकदा हे साम्यविरोध ध्यानी घेऊन लोककथेचे रूप पाहिले की, तिचे अगदी वेगळ्याच तऱ्हेचे विशेष आकर्षण नजरेत भरू लागते ; व कुतुहला-बरोबरच वैचित्र्याचाही आनंद होतो. उदाहरणार्थ, लघुकथा अनिर्बंध, तर लोककथा सांकेतिकतेच्या चौकटीतच राहणारी हे आपण मघाशी म्हटले, तर, या संकेताचीच गंमत पहा ना ? लोककथा म्हटली की ठराविक संकेत हे आलेच ! दरेक ठिकाणी तीन भाऊ असले की वडील दोघे भाऊ उर्मट, निष्क्रय दुर्वर्तनी असणार व धाकटा मात्र शूर, हुशार, देखणा, चतुर असणारच! किंवा तीन बहिणी असतील तर दोघी द्वाड, कुरूप, पण धाकटी मात्र गुणशाली व सुंदर असणार हे डोळे मिटून ओळखावे. तीनचा आकडाही असाच सांकेतिक ठरलेला. राजकन्येचे 'पण' तीनच ! चेटकी नायकाला कठीण कामे देणार ती तीन, कथेंत जास्त ड्रॅगन्स असतील तेही एकाहून एक चढत्या ताकदीचे पण तीनच व हत्या सर्वांना मारून नायक (धाकटा भाऊच !) हॅट ट्रिक करून विजयी होणारच. सारे ठराविकांचे राज्य. दुसरा एक संकेत असाच. दयाळू नायकनायिकांच्या वाटेत जर एकादा म्हातारा अगर म्हातारी भिकाऱ्याचे रूप घेऊन आली तर ती व्यक्ति यक्ष वा परीच असणार व ती नायकाला मदत करणार, ही अगदी दगडावरची रेघ ! तसेच गोष्टींत शेवटी ड्रॅगन मरणार व राजकन्या नायकाला मिळणारच !

लोककथेचे हे सारे सांकेतिकतेचे देहबंध आपणास लहानपणापासूनच परिचयाचे आहेत. पण, आणखी काही वेगळेच संकेत या परिशीलनात आढळले आहेत, ते मोठे कुतूहलजनक आहेत. त्यांची थोडी ओळख करून घेऊ या.

चुंबनाचे मजेदार संकेत

उदा. हा वघा एक गमतीचा संकेत. चुंबनाचा उपयोग प्रेमव्यवहारात किती व कोणता हे मी सांगत बसत नाही पण, लोककथेत चुंबन हे एक संमोहनास्त्र म्हणून वापरले जाते, हे आहे का माहीत ? एखादी देवकन्या वा जलकन्या मानवी पतीशी संसार करते व मग, कधी एकदा, पती, बरीच वर्षे अंतरलेल्या मातापितरांना भेटायला जातो आणि काय सांगावे दुर्दैव त्या बापडचा देवकन्येचे ? या पतीचं मातापित्याने प्रेमाने जरी चुंबन घेतले तरी बस् ! त्याला एकदम आपले लग्न, पत्नी, पूर्वीचे तिला मिळवण्यासाठी स्वतःचे झालेले हाल, सर्वांचे पार विस्मरण होते ! चुंबनाने विस्मरण ? हे कोठे कोणी ऐकलेले आहे काय ? पण लोककथेत ते मला वारंवार दिसले आहे. आणि एकाच देशच्या कथेत नव्हे, दूरदेशच्या कथातूनही ते आहे. नशीब की, हा संकेत कल्पित आहे व तो लोककथाविश्वातच आहे ! जर आज व्यवहारात हा खरा ठरला असता तर मग ? नकोच ती कल्पना !

लोककथेत चुंबनाचा उपयोग आणखीही एका हृद्य तऱ्हेने करून घेतलेला आढळतो. परीचेटकीच्या शापाने नायकनायिका कधी अमानवी रूपांत (जसे पशु, सर्प, इत्यादीत) कालक्रमणा करीत असतात. त्यांना पूर्वरूप प्राप्त करून देण्यास चुंबन उपयोगी पडते, हे केवढे आश्चर्य ? एका स्पॅनिश कथेतली नायिका अजगररूप झाली होती, व दुसऱ्या एका कथेत गर्दभाचे डोके शापाने प्राप्त झालेला एक राजपुत्र होता. या दोघांनाही केवळ प्रियकर वा प्रेयसीच्या चुंबनाने पूर्वरूप प्राप्त झालेले आढळते ! तर एके ठिकाणी शापाने अनेकानेक वर्षे महानिद्रेत असलेल्या राजकन्येचे चुंबन एक राजपुत्र घेतो व तत्काल ती मोहनिद्रेतून जागी होते. हाही एक वेगळाच चुंबनसंकेत ! हे संकेत विचित्र, लोकविलक्षण असले, तरी गमतीचे नव्हेत काय ? लोककथेत नायकनायिकांना मृत्यु नाही, हा आणखी एक चमत्कृतिपूर्ण संकेत. 'द स्लीपींग ब्यूटी' या ग्रिमकथेसारख्या गोष्टींत राजकन्या शंभर वर्षे चिरनिद्रेत मृतवत् पडून राहते, पण ती काळझोप

नव्हे ! काही कथांत नायकही क्वचित् मरतो पण सर्वस्वी नाही हं. चंद्रोदय होतांच रोज यातले काही नायक सजीवही होतात, तर कोणी नायकनायिका गळ्यातली जादूची माळ हरवलेली असते, ती गळ्यात घालताच, उठून बसतात. मृत्यूतून ' स्लीपींग ब्यूटी ' राजकन्या केवळ तिच्या पायातले चढाव काढतांच डोळे उघडते ! किती सोपे उपाय ! पण इतके अद्‌भुत की धन्वंतरीलाही आजवर अशक्य झालेले रोग्याचे प्राणदान सहज करणारे ! काही असो, लोककथेचा शेवट कधी दुःखान्त असतच नाही व हा केवळ एक संकेत नव्हे, तर हे लोककथेचे वैशिष्ट्यही आहे. लोककथेची प्रकृती साध्या कथेहून वेगळीच असते, हे आता वाचकांच्या लक्षात आलेच असेल ? या वेगळेपणाचेही काही वेगवेगळे मजेदार रूप आहे. ते जरा बघू. फार गम्मत आहे. पहा एकेक नमुने.

लोककथेतील अद्‌भूतरम्यता

पहिली लोककथेची अद्‌भुतरम्यता. लोककथा हे मनोरंजनाचे अगदी रामबाण साधनच म्हणा ना ? लहानांनाच काय, सगळ्या जाणत्या मंडळींनाही या लोककथा आवडायच्या, त्या त्यांतल्या अद्‌भुतरम्य चमत्कृतींनीच ! आणि एकदा श्रोत्यांनी चमत्कृतिपूर्ण अशी हिची रचना मान्य केली की, मग पहा लोककथेची ऐट ! तिच्यातल्या जड वस्तू, प्राणिमात्र, निसर्ग, व्यक्तीजीवन .... साऱ्यासाऱ्यांवर अद्‌भुताचा एक झगझगीत मुलामा चढू लागतो व झगमगणाऱ्या कांतीने ती तळपू लागते ! या अद्‌भुतरम्यतेत आणखी एक वेगळाच लक्षणीय गुण आढळतो तो म्हणजे कल्पकतेच्या विलासाचा ! होय, यांतील अद्‌भुत कल्पनाविलासाला जणु कोठलीही सीमाच नाही असे या कथांत एकेक प्रसंग वर्णिलेले आढळतात. कुठे एखादा मोठा मासा समुद्रांतून घरी आणून चिरावा तो त्याच्या पोटांतून जिवंत मूल सापडते, तर कोठे मोठा नाग लहानशा अळीएवढे रूप धारण करून एकाद्या राजकन्येच्या नाकांत लपून राहिलेला असतो, (कधीपासून कोण जाणे !) तो तिच्या मधुचंद्राच्या दिवशी ती झोपल्यावर नाकातून बाहेर पडून सळसळता साप होऊन नवऱ्याला दंश करतो व परत आपला लहान होऊन नाकांत लपून बसलेला ! किती नवलपूर्ण घटना ? कोठे भितीवरचे हंसाचे चित्र सजीव होऊन खुंटीवरची मोत्यांची माळ गिळून टाकील, तर

कोठे कोणी दिव्य अश्व अस्मानांतूनही वेगाने घोडदौड करतांना आढळतील. पशुपक्ष्यांचे हे नवलपूर्ण वैचित्र्य इतक्या परोपरीचे व विलक्षण गुणांनी नटलेले या कथांतून आढळते की त्यांची मोजदाद करणेही अशक्यप्राय ठरेल ! याच्याच जोडीला अद्‌भुत गुण असणारे जलसंचयही लोककथेच्या विलक्षणपणांत भर घालीत असतात. या जलसंचयाचे रूप, तळे, विहिरी, सरोवरे, वगैरेंचे; त्यांत स्नान केले की माणूस पक्षी होतो– फिरून एकाद्या तळ्यांत स्नान की परत माणूस !! जगांत कोठे आहेत ही तळी आज ? प्रत्यक्षांत तर मुळीच नाहीत, नसेनात ? गुलबकावलीसारख्या प्रसिद्ध कथेत व अन्य कथांतूनही जागोजाग हे तलाव तुम्हाला दिसतील.

लोककथेतील विचित्र व्यक्ती

आणि या लोककथेतले व्यक्तिजीवन ? त्यावरही अद्‌भूत रम्यतेचे निळसर धुके पसरलेलेच असणार ! लोककथेत वीटभर उंचीचे यक्ष, दिसतील तसे ताडमाड उंच राक्षसही दिसतील ! पंख असलेल्या पऱ्या, छोटी शिंगे असलेले सैतान व खराटचाच्या वाहनावरून आकाशझेपा घेणारी चेटकीण, ही पाश्चात्य कथेतली मंडळी पहा किंवा गगनसंचारी यक्षकिन्नर अप्सरा, अगर 'योगीराज' म्हणून ज्यांचे वर्णन विक्रमकथांतून केले गेले, तो अदृश्य व ज्ञानवंत वेताळ ह्या आपल्या कथांतल्या व्यक्ती पहा, सर्व, साधारण मानवांहून यांचे रूप, गुण, आकार, स्वभाव, सारेच काही भिन्न व विलक्षण दिसून येते ! पण या विलक्षणपणानेच तर या कथांना मोहक रंग चढू लागतात. हे कसे विसरता येईल ? देवदेवतांचेही कारणपरत्त्वे या कथेंत आगमन होते व त्यांतून मानवाचे कल्याण घडलेले दिसते पण त्यावरही अद्‌भुताची छाया, ही, असतेच ! हे अद्‌भुतव्यक्तीचेच चित्रण खरे, पण लोककथेच्या राज्यांतले साधे मानवही क्वचित् प्रसंगी विलक्षण गुणांनी नटलेले दिसावेत हे एक मोठेच नवल म्हणावे लागेल. पहा ना, कोणी राजपुत्र आपला बारा दिवसांत बारा वर्षांएवढा होतो ! रोज एका वर्षाएवढी वाढ ? ती कल्पनेंतच असणार ! कोणी भाग्यशाली राजकन्या रडू लागली की तिच्या अश्रुंची रत्नें होतात ! कोणी बालके जन्मतात तीच मुळी 'भाली चंद्र– सूर्य' अगर चकाकते तारे घेऊन !! फार काय जन्मजात सुवर्णदेह वा रौप्यदेह असणाऱ्या दोन आफ्रिकन मुलांचे वर्णन आफ्रिकेच्या एका लोककथेत आहे. टॉम थंब ऊर्फ अंगठचाएवढा पुत्र

'अंगठ्या,' याची व थंबोलिना उर्फ बोटाएवढी मुलगी हीही पाश्चात्य कथेतून आढळतात. माणसाच्या ठराविक आकारमानाला साफ धाब्यावर बसवून निरनिराळ्या लहान मोठ्या आकारमानाची मानवसृष्टी या लोककथांतून अवतीर्ण झालेली दिसते. उदा. 'पाच ल्यू' या चिनी कथेत एका भावाला वाटेल तेवढे उंच होता येत होते. त्याचे पाय आपले वाटेल तेवढे लांब व उंच व्हायचे व तेही त्याच्या मर्जीनुसार, हे केवढे आश्चर्य ? आपल्याही पुराणांत वालखिल्य ऋषी मूठभर उंचीचेच वर्णिलेले आहेतच. अन् केवळ आकाराच्याच अद्‌भुतपणाची ही गोष्ट नव्हे, तर काही लोकविलक्षण गुणांनीही लोककथेतले व्यक्तिजीवन मोठे वेधक व अद्‌भुतरम्य झालेले दिसेल. उदा. बसल्या जागेवरून जगातला कुठलाही देखावा पहाणारी वा पृथ्वीच्या कानाकोपऱ्यांत कुठे खुट्ट झाले की दूरदेशी सहज ऐकणारी माणसे, हीं लोककथेतच सापडायची !! आगींत बसवले तरी थंडीने काकडणारे लोक, शंभर-दोनशे माणसांचा आहार व पेये फस्त करणारे खादाड व पिदाड लोकही लोककथेत कमालीची धमाल उडवून देत आहेत, त्यांनी वैचित्र्याचे नवे लेणेच साध्या लोककथेवर चढवून तिला लोकमान्यता व रंजकता मिळवून दिली आहे !

लोककथेतील प्राणीजीवन

लोककथांतून काही विचित्र व अद्‌भुतरम्य अशा व्यक्तिजीवनाची उदाहरणे जशी वैपुल्याने मिळतात, त्याचप्रमाणे यातले प्राणीजीवनही अद्‌भुतरम्यतेने नटलेलेच ! अर्थात नेहमीचे आपण सृष्टीत पाहतो– त्याच रूपागुणांचे साधे प्राणीही यात कमी नाहीत, पण आपण येथे फक्त अतिशय अलौकिकतेने उठून दिसणाऱ्या अद्‌भुत प्राण्यांबद्दलच विचार करू या. आता ही अलौकिकता तरी एकच प्रकारची म्हणता की काय ? छे छे ! अद्‌भुतरम्यतेच्या वृक्षाला अशी एकच शाखा थोडीच असते ? अनेक प्रकारच्या शाखा त्याच्या. पहिली गोष्ट म्हणजे हे सगळे प्राणी मानवी भाषा बोलू शकतात, हे तर देवच जणू बोलून चुकला आहे ! दुसरी गोष्ट म्हणजे या प्राण्यांतील काहींना त्रिकालज्ञानही कसे कोण जाणे ! पण असते ! उदा. एका पाश्चात्य लोककथेत एका रानात रोज कुत्रे भयानक स्वर काढून रडायचे ! रोज रात्री हाच दंगा. लोक जाग्रणाने त्रासले तेथले, पण अखेर पशुपक्ष्यांची भाषा जाणणारा कुणी तरुण आला, त्याने हे रडणे ऐकले. त्या

रडण्यातून एकच विनंती वारंवार ऐकू आली त्याला– कुत्रे सांगत होते– 'मानवांनो, अरे या ओसाड जागी संपत्तीचे सात हंडे पुरले आहेत रे ! ती गाडलेली लक्ष्मी मुक्त करा, आम्ही प्रार्थना करतो ! कसे रे आमचे सांगणे समजत नाही तुम्हाला ?' पुढे या तरुणानेच ते भूमीगत द्रव्य हुडकून काढले, हे सांगणे नकोच. पुष्कळदा वाट चुकलेल्या नायकाला कोल्हा-कावळा असे क्षुद्र प्राणी रस्ता सांगतात किंवा राक्षसाने राजकन्या कुठे कशी कोंडून ठेवली हेही सांगतात. त्यांना जगातले सारे माहीतच !!

या त्रिकालज्ञानाखेरीज काही स्वतंत्र अद्‌भुतगुणही यातल्या काही प्राण्यांना लोककथेने देऊन टाकले आहेत. एखादे गाढव आपले ओरडू लागले की बद्‌बद रुपयांची नाणी कोसळताहेत तोंडातून ! अशी मालकाला संपन्न करणारी गाढवे खऱ्या जगात आज असती तर, केवढी बहार (अन् गडबड धमाल पण !!) उडाली असती ? घोडा हा प्राणी लोककथेत सर्वांत मानधन व श्रेष्ठ असा पशु कल्पिला गेला आहे. हे घोडे तर आकाशात उडू शकतात ! काही घोडे अग्न्यश्व नावाने व काही पक्षी अग्निपक्षी अगर सूर्यपक्षी नावाने लोककथेत अद्‌भुताचे लेणे मिरवीत असतात. त्यांच्या अंगातून तेज फांकत असते, घोड्याच्या तोंडून तर अग्निज्वाळा बाहेर पडतात ! अश तेजस्वी पक्ष्याचा प्रकाश अंधेऱ्या दालनालाही प्रकाशमान करू शकतो ! एखाद्या मेंढीच्या अंगावर सर्व लोकर येते ती बावनकशी सोन्याचीच ! तर एखाद्या बैलाच्या कानातून वाटेल त्या इच्छितवस्तु जसे, भोजनाचे ताट, अगर सुंदर कपडेसुद्धा बाहेर पडू शकतात. लोककथेने असे हजारो प्राणी निर्माण केले आहेत. व त्यांचे बोट धरूनच तिच्यातली अद्‌भुत-रम्यता बरीच विकसित झाली आहे, त्याबद्दल लिहावे तेवढे थोडेच ! पण नमुन्यादाखल एवढे वर्णन पुरे होईलसे वाटते !

लोककथेतील सृष्टिवैचित्र्य

आणि याच्याच जोडीला सृष्टिवैचित्र्याची भर. माणसाला वैभवाची ओढ सनातन काळापासून आहे. हे ओळखूनच लोककथेने विलक्षण वैभव व समृद्धि यांचे उपायन सिद्ध केले असावेसे वाटते. सिंदबादला हिऱ्यांची एक खोल खोल दरी सापडली. अशी की फक्त मोठे-मोठे पक्षी व सर्पच काय ते तेथे जाऊ शकतील. कोठे आहेत जगात या रत्नखचित दऱ्या ? कोणी भाग्यवान बालक हसू लागले की त्याच्या ओष्ठशिंपल्यातून मौक्तिक बाहेर

पडतात ? किती मोहक कल्पना ? पण जेवढी अद्‌भुत तेवढी मोहक, व जेवढी मोहक तेवढी अशक्यही ! वस्तूला हात लावला की सोने करू शकणारा परिसरूप राजाही कथेतच सापडायचा. एखादी साधी पोपटमैना ती काय ? पण त्यांचे मांस खाल्ले की खाणाराला रोज उशागती आपला लिंबाएवढा सोन्याचा गोळा सकाळी सापडतो ! आज या जगात असले पक्षी असते तर सोन्याची टंचाई व महर्गता उत्पन्न झालीच नसती ! काही असो, या वर्णनातही आकर्षण जरूर असते. या कथेतली दौलत डोळे दिपवणारी असते, हेही लोककथा लोकप्रिय होण्याचे एक अवश्य कारण असले पाहिजे. रंजन करताकरताच ती बोधाचे उपायन देते; तद्वत कल्पित वैभवाचीही चित्रे दाखवून ती श्रोत्याचे मन खेचून घेते, यात संदेह नाही !

वर काही थोडी उदाहरणे मी दिली. याच्याहून कितीतरी मोठ्या प्रमाणात अद्‌भुतरम्यतेचे दर्शन या कथांतून होत असते. प्राणी व मानव यांच्या अद्‌भुत रूपगुणाची झलक तर आपण पाहिलीच, पण जड वस्तूंनाही या लोककथा प्रांतात किती अद्‌भुतरम्यतेचे लेणे प्राप्त झाले आहे, पहाण्याजोगेच आहे ! व या जडवस्तूंची विविधताही तुमच्या मनात अवश्य नोंदली जाईल, इतक्या त्या बहुसंख्य आढळतात ! उदाहरणार्थ अल्लाउद्दीनचा तो जगप्रसिद्ध जादूचा दिवा ? वाचलेच असेल तुम्ही त्याबद्दल ? जरा थोडा हा दिवा कुणी घासला की, भीमकाय राक्षस वाटेल ते द्यायला हजर ! एखादी क्षुद्र लाकडाची काठी ती काय ? पण अशी गमतीची की, हलवली की बद्‌बद नाणी कोसळताहेत आपली ! कोठे केवळ एक साधा रुमाल– पण जादूचा. 'पसर, रुमाल, पसर' म्हटलं की जेवणाची ताटे वा थाळ्या ऊनऊन पदार्थ भरलेल्या प्रकट झाल्याच. इच्छाभोजन देणाऱ्या थाळ्याही कमी नाहीत ! त्यांचा प्रारंभ तर द्रौपदीला सूर्याने दिलेल्या इच्छाभोजन देणाऱ्या थाळीतच असावा असे वाटू लागते. अन्नटंचाईच्या आज घडीला ही असली तयार अन्नाची देणगी देणारी थाळी असती, तर तिचे मूल्यांकन शंभरपटीने चढले असते की नाही ! जवळजवळ प्रत्येक देशातल्या लोककथेतून असले दिव्य दिव्याचे भाईबंद, इच्छाभोजनी वस्तूचे वेगळे प्रकार आलेले तुम्हाला सापडतील ! माणसाच्या मनात नांदत असलेल्या सुप्त इच्छांचाच हा प्रकट आविष्कार म्हणा ना ? उदा. अगदी आदियुगापासूनच

माणसाला पक्ष्याप्रमाणे आकाशसंचार करायची इच्छा होती; पण ती व्यवहारात उतरणे तेव्हा तरी शक्य नव्हते. मग कल्पकतेतून त्याची साधने कथेत अवतरली. कळीने उडणारे लाकडी घोडे (इराणी कथा), वाटेल तेथे क्षणात नेणारी सतरंजी, अगर खाट (उडन खटोला), किंवा पायांत घालताच हवे तेथे आकाशमार्गे पोचवणारे चढाव, वहाणा, ही त्याची उदाहरणे ! पण या अशा गोष्टी ऐकायला कितीही सुखकारक असल्या, तरी त्यांचा उदय कल्पितांतलाच, हे विसरायचं आहे थोडंच ?

लोककथा म्हणजे विस्मृत संस्कृतीचा इतिहास

आणखीही एका दृष्टीकोनाने लोककथा फार महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. कथा म्हटली की ती तत्कालीन समाजाचे राहणीचे, लोकविचाराचे दर्शन घडवणारी आणि सामाजिक चालिरीती वा धार्मिक समजुती यांचे प्रतिबिंब दर्शवणारी ही असायचीच, या वाङ्मयीन नियमाला लोककथाही अपवाद ठरणारी नव्हे, मात्र ही जुन्याजुन्या जगाची कथा; तिच्यातून दर्शन घडेल ते अर्थातच जुन्या, विस्मृतप्राय झालेल्या संस्कृतीचेच. त्या दृष्टीने लोककथा एक प्रकारे सामाजिक क्रांतीचा इतिहास सूचित करणारीच असते ! यात अनेक चालिरीती देशोदेशच्या कथांतून उल्लेखित झालेल्या दिसतात, उदा० सख्ख्या बहिणभावांची अगर पितापुत्रीच्या लग्नाची यात वर्णने येतात, तेव्हा सुसंस्कृत मनाला धक्काच बसतो ! पण एका काळी (हा पूर्वकाल किती जुना ते सांगणेही कठीण !) हा प्रकार समाजात मान्य असल्याचे जगातील अनेक पुराणकथा सांगतात. बहुधा संस्कृतीधर्माचे नियम मानवाने तयार केले त्या पूर्वीचा हा काल असावा, असे विद्वानांनीही मत दिले आहे.

त्याचप्रमाणे या सुधारणापूर्वजीवनाच्या पहिल्या प्रगतीच्या साक्षी म्हणून अनेक लोककथांतल्या राजकन्या विस्तव मागायला चेटकीकडे जातात, किंवा मोठा बलाढ्य राजा असला तरी त्याला पत्नी हवी असते ती उत्तम सूत कातणारीच ! हे प्रसंग काय सुचवतात ? अग्नीचा शोध वा स्वतः धागे गुंफून वस्त्र तयार करणे, याच, अश्मयुगानंतरच्या मानवप्रगतीच्या इतिहासातल्या, मोठ्यात मोठ्या पहिल्या सुधारणा होत्या, त्याला अनुसरूनच हे प्रसंग नाहीत काय ? मग या गोष्टींत अद्‌भुतरम्यता आणण्यासाठी, आपोआप फिरणारे जादूचे चरके आले, लांबलांब सोन्यारुप्याचे धागे विणून

देणाऱ्या पऱ्या आल्या, प्रत्यक्ष अग्नी प्रसन्न होऊन मानवांना देणग्या देत असल्याचे प्रसंग कथेतून आले व अग्नीचेच एक रूप दिवा, ते दिवेही पवित्र किंवा जादूचे बनले. इतिहासावर कल्पिताचा साज चढला आणि देशोदेशी लोककथांतून तो चिरंजीवही झाला.

देशोदेशीच्या लोककथातील विलक्षण साम्य

आता लोककथेची आणखी काही वैशिष्ट्ये जरा पारखून निरखून पाहू या. पहिली जाणत्या श्रोत्यांच्या मनात भरणारी ठळक, बाब म्हणजे देशोदेशीच्या लोककथेत दिसणारे विलक्षण साम्य ! तेच तेच प्रसंग, त्याच घटना व तेच ते नायिकांचे पण, तसलेच राक्षस, असे वारंवार दिसू लागले की मनात विचार येतो, हे साम्य आले कसे व कोठून ? गोष्टी तर हजारो मैलांच्या अंतरावरच्या, मग ? आणि जेव्हा दूरदूरच्या पुराणकथांतूनही हे साम्यप्रसंग दिसले, तेव्हा तर मला विस्मयाचा धक्काच बसला ! एक उदाहरण देण्याजोगे आहे. आपल्याकडील अनंतव्रताच्या कथेत कौंडिण्य ऋषीला अनंताचे वेड लागले व तो त्याला हुडकण्यासाठी रानोमाळ फिरू लागला. मग त्याला वाटेत एक बैल व गाय दिसली. समोर भरपूर चारा असूनही त्यांना तो खाता येत नव्हता ! उत्कृष्ट फळांनी युक्त असा एक आम्रवृक्ष; पण एक पक्षीही तिकडे फिरकत नव्हता. आणखीही अशीच दृश्ये ! पुढे प्रत्यक्ष अनंत देव त्याला भेटला. त्याने या दृश्यांचा उलगडा केला. ती म्हणे सगळी पूर्वजन्मी माणसेच होती ! एका विद्वान ब्राह्मणाने आपली विद्या कोणालाही जन्मभर दिली नाही, तो झाला तो आम्रवृक्ष. एक श्रीमंत जोडपे. त्यांनी एक कवडीही दानधर्म केला नाही. त्यांनाही या जन्मी समृद्ध जगात उपास पडताहेत; इ. इ. ही कथा तात्त्विक रूपाची होती व अगदी थेट याच कथानकाची एक 'ख्रिस्ताची भेट' या नावाची युगोस्लावियाची कथा आढळली मला. येथेही गरीब शेतकरी ख्रिस्तालाच शोधायला निघालेला व वाटेत त्यालाही एक फलवृक्ष दिसला. तेथे एक भुकेला माणूस उभा होता. तो फळ हातात घेऊन तोंडाशी नेई की त्या फळाची राख झालीच ! नंतर दोन बैल मरेपर्यंत टक्कर घेताना दिसले व पुढे दोन कावळे एका दुर्दैवी माणसाचे डोळे फोडायला झेप घालताना त्याने पाहिले. आणि काय नवल ? पुढे ख्रिस्त या भक्ताला भेटला, तेव्हा त्यानेही थेट अनंतदेवा-

प्रमाणेच, तोच उलगडा केला– 'बाबा रे, ही सगळी मागल्या जन्मी माणसेच होती– पण करणी तसे फळ. बघ, त्या एका माणसाने इतका अधाशीपणा केला होता की, सारी आपल्या वाटणीची इस्टेट तर घेतलीच. पण इतर भावंडांच्या वाटणीचेही द्रव्य त्यानं लाटले, त्याचा या जन्मात दर घास आता राखेचाच, हे दोन वैल सख्खे भाऊ. पण मरेपर्यंत शेताच्या वाटणी-साठी झुंजत राहिले. अजूनही ते वैर चालूच ! अन् ते दोन कावळे ? ते त्याच माणसाचे आई-बाप होते– म्हतारे झालेले. यानं त्यांना पोटालाही धड दिलं नाही कधी. मरेपर्यंत हाल, वनवास फार केले. त्याचं हे फळ.'

वरील दोन कथांची रचना, प्रसंग व्यक्ति उलगडा, यांत कमालीची एकता नाही काय ? कुठे युगोस्लाविया अन् कुठे भारत ! मग यांतील मूळकथा कोणाची व अनुयायिनी कोण ? सांगणे मुष्किल आहे. असे कथातले सुटे सुटे घटक पुष्कळदा निरनिराळ्या कथातून तेच तेच आढळतात. उदा. आपली सोनसाखळीची गोष्ट ? अठ्ठावीस देशांत ती वेगवेगळ्या नावांत हिंडते आहे. असे विद्वानांनी नमूद केले आहे ! हीच नव्हे तर अशा अनेक कथा एकाच तोंडावळ्याच्या जागोजाग तुम्हालाही आढळल्या असतीलच. जणू काही एकाच नायिकेने अनेक नाटकांत भूमिका कराव्या तसे हे प्रकरण. नायिकेचे रूप तेच. फक्त भाषा, पोषाख, परिस्थिती व वातावरण वेगळे. बस् ! कोठून आले हे साम्य ? हाही एक संशोधनाचा विषय ठरला आहे. कोणी म्हणतात यांचे मूळ एकच होते. उत्तर ध्रुवाजवळ अतिप्राचीन काळी आर्यलोक राहात होते. तेव्हाच ही कथानके उत्पन्न झाली व नंतर आर्य-टोळ्या जगभर पसरल्या, तेव्हा कथाही लोकगंगेबरोबर वाहत जाऊन देशोदेशी दूर दूर स्थिरावल्या; तर काही संशोधकांचे मत असे की, साऱ्या या कथा मूळ भारतीयच व त्याही फार फार पूर्वीच्या. पण मग जुन्या व्यापारी टोळ्या अगर उंटाचे काफले, सैनिक प्रवासी, जिप्सी सारख्या भटक्या जमाती व दर्यावर्दी लोक येथे येऊन परत स्वदेशी दूर गेले, त्या बरोबर कथानकेही दूर फैलावली. असेलही तसे. कसेही असो, हे कथातले समान प्रसंग व तोचतोपणा यांचे मूळ, हे असे या महत्त्वपूर्ण सिद्धांतापर्यंत पोहोचते हे तर खरे ?

ही झाली कथानकांची एकता. पण मनुष्याच्या काही मूलभूत प्रवृत्तीचीही

एकता दर्शवणारी चित्तवेधक अशी काही उदाहरणे लोककथेत आहेत. तिकडे जरा वळू.

लोककथेत दिसणाऱ्या माणसाच्या मुलभूत प्रवृत्ती

उदाहरणार्थ, माणूस कितीही सूज्ञ असे ना ? त्याचा नशिबावर विश्वास असतो, आतांसारखाच लोककथेच्या प्राचीन निर्माणकालीही तो जरूर होताच ! या नशीबाच्या गोष्टी कितीतरी वेधक ? चीनमध्ये मृत्यूदेव व जीवनदेव नित्य बुद्धीबळे खेळतात म्हणे. त्यांत पटावरची मोहरी म्हणजे मानव ! पण त्यांची नशीबे ? ती त्या देवांच्या खेळीवरच अवलंबून. खेळातले मोहरे उडाले की इकडे तो मानव खलास ! आपल्याकडे तर चित्रगुप्ताच्या पापपुण्याचा नशीबातला हिशेब लिहूनच माणसाचं नशीब ठरवीत आहे. इस्लामी धर्मात स्वर्गात एक मोठा वृक्ष आहे त्याच्या पानापानावर मर्त्य मानवाचे नाव आहे, असे सांगितलेले आहे. हे एकेक पान सुकले, गळले की त्या माणसाचं जीवंन खलास ! ' पिकले पान ' म्हाताऱ्याना म्हणतात, ते याच अर्थी तर नव्हे ना ? व्हेनिसच्या एका कथेत मृत्यू देवतेचे एक दालन दर्शविले आहे. तेलाचे दिवे जळत होते. तेल संपले की दिवा विझे, की त्या नावाचा पृथ्वीवरच्या मनुष्याचाही जीवनदीप विझायचा ! किती विविध कल्पना ? आणि त्यात वैचित्र्यही कमी आहे काय ? या गोष्टी कल्पकतेच्या साक्षी तर आहेतच पण त्यांची तात्त्विक भूमिकाही मनाचा जरूर वेध घेणारी आहे.

अशा कल्पकतेच्याच साक्षी आपण मघा पाहिल्याच. पण या कथांतली कल्पनासुदंरता परकोटीला केव्हा जात असेल तर ती रूपककथेचे ' रूप लेऊन कथा सन्मुख येते तेव्हा ! माझे मन तर या तात्त्विक, काही शाश्वत कल्याणाच्या गोष्टी सूचित करणाऱ्या रूपक कथांनी एकदम मोहित झाले ! रूपककथा वाचकांना अपरिचित थोडीच ? प्रत्यक्ष सांगितलेली कथा वेगळी व तिच्यातून मनाला गर्भित सूचना मिळते, ती काही वेगळचाच उच्च आदेशाची, हा तर रूपककथेचा बाणा. आणि या अशा अर्थगर्भ कथा मला लोककथांच्या हजारोहजार कथांतून अगदी थोड्याच हाती लागल्या, पण थोड्या असल्या तरी त्या किती वेधक ? पहा त्यांची काही उदाहरणे–

ही राजा विक्रमाची एक गोष्ट आहे. तो बाजाराच्या दिवशी रात्री ज्या

ज्या विक्रेत्यांचा माल उरला असेल तो सगळाच्या सगळा विकत घेई; कारण परगावचे दुकानदार आपल्या उज्जयिनीतून नुकसान खाऊन परत जाऊ नयेत म्हणून. एकदा एक अवदसेची मूर्तिही त्याला अशी निरुपायाने घ्यावीच लागली. काय नवल ? ती अवदसा घरात येताच देवघरातून लक्ष्मी बाहेर बाहेर पडली. ' अवदसा (अवकळा) येईल तिथं मी कधी राहतच नाही, राजा ! ' ती म्हणाली. तिच्या पाठोपाठ दोन सुंदर मुलगे देवघरांतून निघून चालले. ते होते धैर्य व शील ! ' अवदसेच्या सान्निध्यांत आम्हीही कधी नसतो, ' ते म्हणाले. राजाने त्यांना अडवले. तो म्हणाला ' लक्ष्मीला खुशाल जाऊ द्या. पण तुम्हाला मी वाढवले, माझे आहांत तुम्ही दोघे. तुम्हाला मी जाऊ देणार नाही. ती मूर्ति घरी आणावी लागली ती राजाचे सत्त्व, कर्तव्य व शील सांभाळावे म्हणूनच. ती तर माझी कसोटी होती. ' मुलगे ' बरोबर ' म्हणाले, परत फिरले व काय आश्चर्य, लक्ष्मीही परत फिरली. ती म्हणाली ' हे माझेही दोन उजवे डावे हात ! ते इथे तर मीही इथेच ' ! अन् मग अवदसेची मूर्तीच उठून पळून गेली ! गोष्ट लहानशी पण त्यांतले तात्पर्य लहानसे नाही आणि ते सांगायला का हवे ? इराणची एक कथा घ्या. एकाला एक संतोषदेवतेची मूर्ति यात्रेत कोणा वृद्धाने दिली. मूर्ति एका बंद पेटीत होती व पेटी घरी जाईपर्यंत उघडू नकोस, असं तीन-तीनदा त्या वृद्धानं बजावलं होतं. पण नको म्हटलं की तेथे मन आधी धाव घेते. त्याचा विवेक संपला ! धीर निघेना. अखेर वाटेतच त्याने ती पेटी उघडली. संतोषदेवता केवळ बोटभर उंचीची होती; पण ती मूर्ति नव्हती तर सजीव होती ! ती उंच आकाशात उडून गेली, जाताना ती त्याला म्हणाली– ' मूर्खा उतावळचा माणसांना मी कधी भेटत नाही अन् अविचारी मूर्ख माणसांनाजवळ मी जन्मात कधीही राहतही नाही. ! समजलास ? ' ' मग कुठे राहतेस ? बोल तरी ' तो आकांताने म्हणाला. ती म्हणाली ' जिथे समाधान नांदते तेथे मी आपण होऊन जाते आन् राहते. चालले मी ' ही प्रश्नोत्तरे मानवी मनाच्या एका फार बलवान् वृत्तीवर प्रकाश पाडणारीच, बोध घ्याल तेवढा थोडा.

पण या क्षेत्रातली या प्रकाराची मला सगळ्यांत आवडलेली गोष्ट एका पक्ष्याची आहे. ह्याचं नांव सत्यपक्षी म्हणे. तो बोलका तर होताच; पण

त्याचा दरेक शब्द पूर्ण सत्य असाच असे ! एका चेटकीणीनं हा स्वर्गातून पळवला व एका भयंकर किल्ल्यात तुरुंगात ठेवला. दुष्टतेमुळे ' सत्य ' बंदिस्त झाले ! तेथे पहारे कावळघाचे आणि भयानक गिधाडांचे ठेवले. एका धीरोदत्त कथानायकाने पक्ष्याची सुटका करण्यासाठी तेथे पाऊल ठेवले, तर प्रथम कावळे ओरडू सागले ' बाबा ! मीच तो सत्यपक्षी ! ! मला ने मला ने. ' मग गिधाडे हीं विवळू लागली. ' अरे तरुणा, खरा सत्यपक्षी, तो जगांतला खरा अलौकिक, मूल्यवान पक्षी, मीच आहे. मी येतो ! ' नायकाने लक्ष दिले नाही. कोपऱ्यात एक छोटा सुंदर पक्षी गप्प होता. तोच सत्य पक्षी, हे नायकाने ओळखले. तो म्हणाला – ' हे सारे इतके ओरडताहेत. तू का रे गप्प ? ' सत्य पक्षाचे उत्तर फारच लक्षणीय आहे. तो म्हणाला–

' सत्याला कधी ओरडावे लागतच नाही ! ते आपोआप प्रकट होते आणि ते शोधून काढणारालाच सापडते. समजत नाही का तुला ? '

या सुंदर कथेला स्पष्टीकरणाची बॅटरी हवीच का ?

तर अशा या रूपककथा, रंगत कथेची, शिकवण चिरंतन शाश्वत मूल्यांची. तपशील साधा, तत्त्व एकदम उच्च कोटीचे. अशा या गोष्टी कल्पित असूनही विचारशील मनावर जे वेगळे उदात्त संस्कार घडवतात, त्यांचे मोल कोण अमान्य करील ? आणि या कथा दरेक देशांत सापडतात. हंसक्षीरन्यायाने पारख करून घेणारा वाचक वा श्रोता मात्र हवा, आणि या दृष्टीने या लोककथांकडे पाहण्याची प्रवृत्ती जनमानसात उद्‌भवली, तर सोन्याहून सवाई ठरेल. बस् आम्हाला तरी दुसरी अपेक्षा कोणती असणार या वाचून ?

(' लोककथा कल्पलता ' या लेखिकेच्या प्रबंधातून या लेखाची पुष्कळ माहिती घेतली गेली आहे.)

५ : जुनी मौलिक स्त्रीगीते

कित्येकदा आमच्या सुशिक्षित मैत्रिणीमध्ये आमच्या जुन्या आजी-पणजींच्य वेळच्या गाण्यांचा विषय निघे अन् चट्दिशी त्याबद्दलची आधुनिक स्त्रीवर्गाची उपेक्षा कपाळावर आठ्या दर्शवून किंवा भ्रुकुटिभंग करून दर्शविली जाई. कुणी म्हणायच्या, ' नको बाई त्या जुन्या काळच्या मुद्रिका अन् ती स्वयंवराची गाणी. लांबच लांब आगगाडी, त्यापेक्षा सुटसुटीत भावगीतंच बरी. '

अशा प्रसंगामुळेच या विषयाकडे माझं लक्ष वेधलं गेलं. मनात येतं की अलीकडे नाही का खंडकाव्यं लोक लिहीत ? मग ही जुनी गाणी केवळ त्यांची कडवी जास्त म्हणूनच का उपेक्षिली जावी ? स्त्रीविरचित जुनी पद्यरचना आपणाकडे फारशी नाही खरी; परंतु हे लक्षात घ्यायला हवं की, जेव्हा स्त्रियांना मुळीच शिक्षण नव्हतं, त्या पिढीतल्या स्त्रियांचीच ही रचना आहे. संस्कारानं हिऱ्याला पैलू पडतात, प्रतिभेलाही शिक्षणांचे, ज्ञानाचे पैलू पडले म्हणजे अधिकच मोल चढत असतं. परंतु हिरा मूळ स्वरूपात असला तरी काय झालं ? त्याचं तेज, मोल, कांति ही उपेक्षणीय कशी असेल ? आमच्या काही अशा जुन्या गाण्याची ही ओळख. त्यांचे रसग्रहण आपण नव्या दृष्टिकोनानं करून घेऊ.

उदाहरणार्थ, सीतास्वयंवर हे एक जुनं पद घेऊ. माझ्या आईच्या वहीत या गाण्याखाली १९०० अशी सालाची नोंद आहे. तेव्हा ते पाऊणशे

वर्षापूर्वीचं लोकप्रिय गाणं होतं, असं दिसतं. कडवी चाळीस आहेत व सात-आठ बदलत्या चाली आहेत. थोडक्यात दहावारा पदांचं हे एक खंडकाव्यच आहे म्हणा ना ?

एका विभागात स्वयंवराला राजे कोणकोण आले होते त्यांचं सीतेची सखी वर्णन करीत आहे व सीता दूर अंतरावरील ' ऋषिकुमार रघुवीरा ' वर नजर ठेवीत ' हा नको ' ' तो नव्हे ' म्हणून सांगत आहे, सखी एकंदरीत वात्रट दिसते. हल्ली सख्या जशा नव्या नवरीची किंवा उपवर मैत्रिणीची चेष्टा करतात तशीच हिची वृत्ति आढळते. हा संवाद पहा–

पैल कुसुंबी दुस्तर ल्याला ।
बाई, तो कांही नव्हे ।
पांघरला नवरंग दुशाला–?
बाई, तो कांही नव्हे ।
तोरा बहुतचि मण्यातुऱ्यांचा–
बाई, तोहि नव्हे ।
सखी– (चिडून) कोण तुझ्या मनास येतो ? सांग ग सीते ! – दाढीमिशांचा दोंदिल बोवा– ?
बाई, तो कांही नव्हे ।
नवरत्नांकित जडित मुद्यांचा– ?
बाई, तो काही नव्हे ।
रथावरचा सूर्य आला– रोहिणीपती तो चंद्र आला–

एकेकजण सखी दाखवीत होती. लाजऱ्या सीतेचा नन्नाचा पाढा चालू होता. चतुर्मुख ब्रम्हा आला होता; इंद्र, शंकर, गजवदन इत्यादी देवही आले होते स्वयंवराला. होतीच ती भुवनमोहिनी तशी. पण या सर्वांकडे तिचे लक्ष नव्हते. ते गुंतले होते ऋषिमंडळातल्या एका सुकुमार सावळ्या तरुणावर ! चतुर सखीनं हे गुपित ओळखून म्हटलं –

' हे ऋषिमंडळ दिव्य धनुर्धर– ? '

मग सीता नको म्हणते कशाला ? तीही प्रणयाचे मुग्ध रंग आतां जाणत होती. सखी पुन्हा माहिती देऊ लागली–

' मेघश्याम हा राम परात्पर ? तेव्हा न म्हणे ' नव्हे '
गिरिवर प्रभुवर हाच तुझा वर– ?
तेव्हा न म्हणे ' नव्हे ' । बाणली निजखूण अंगी, धन्य हो सीते– ! '

अन् मग सीता सखीकडे पाहत गोडशी हसली. काय, हा हृद्य भाग आपल्या कथाकाव्यांहून नीरस वाटतो ? पौराणिक प्रणयाचं हे गोड वर्णन आपल्या अद्यावत् प्रणयकथांशी अत्यंत विसंगतच आहे काय ?

याच खंडकाव्यातला दुसरा एक रंजक विभाग पहा. ते भयंकर जड व चंडप्रताप शिवधनुष्य उचलायला आधी कुणी उठेचना. प्रत्येकजण काहीतरी सबब सांगून शेजारच्या राजाकडेच ते कठीण काम लोटू लागला ! प्रधान प्रत्येक राजेश्वराला उद्देशून ' तुम्ही उठून चाप सज्ज करा ना ' म्हणून म्हणतो आहे व एकेक नादान राजा कशा हास्यास्पद सबबी सांगत आहे याचा हा मासला बघा–

' प्रधान येई भूपांजवळी, कां हो, तुम्ही उठा
चाप योजा गुणीं, तुम्हा मिळेल हो सीता ! '

आता एकेकाचं उत्तर ऐका तरी. एकानं स्पष्ट सांगितलं की आमच्या लठ्ठपणानं आम्हाला हे शक्य नाही बिलकुल !

पहिला– माज लवेना भरल्या देही ।
प्रधान– (दुसऱ्यास) का हो, तुम्ही उठा–
दुसरा– त्याहून आमुचा माज सवाई ।
प्रधान– (तिसऱ्यास) का हो, तुम्ही उठा–
तिसरा– भोवळ येते आमुचे डोईं ।
प्रधान– (चौथ्यास) का हो, तुम्ही उठा–
चवथा– पोटशुळाची बाधा भारी ।
प्रधान– (पांचव्यास) का हो, तुम्ही उठा–
पाचवा– लचक भरली आमुच्या हाता ।

(हो, दुखण्यानं उजवा हातच लचकला एकदम. काय करायचं ?)
सहाव्यानं व सातव्यानं स्पष्ट सांगितलं–

' नलगे आम्हा तुमची सीता
मानियली ती आम्ही माता । '

आणि आठव्या राजाने, 'अंगी हा फणफणला ज्वर।' अशी खुशाल लोणकढी थाप ठेवून दिली.

ही नादानपणाची उत्तरं ऐकून प्रधान थक्क झाला असेल, नाही? एकानं 'आमच्यावर का बलात्कार?' म्हणून सवाल केला अन् एकानं तर साफ 'आज आमुचा घातवार' हे उत्तर दिलं. पराक्रमशून्य राजे तेव्हाही होते म्हणायचे!

हा विनोदी भाग पाहिल्यानंतर आणखी एक व्यक्तिदर्शन पहा. त्या काळच्या देवादिकांना बंदीत टाकणारा सर्वश्रेष्ठ बलवान राजा रावणही आला होता स्वयंवराला. त्याला प्रधानानं आव्हान देताच दंड थोपटीत तो धनुष्याजवळ येऊन अहंकारानं गर्जना करीत म्हणू लागला–

रावण प्रतापी मी ऐसा। उचलिले गिरिकैलासा।
तेथे जनकाचा पण कैचा?
दारीं दिनकर कर जोडी
धावे वायु, घर झाडी
ब्रह्म होऊनिया वेडे।
वाची मजपुढे पोतडें।
खिळखिळी केली देवांची हाडें!
म्यां रावणाने।

अन् इतका मी पराक्रमी असता या क्षुद्र चापाचं काय मोठं?

'त्रिबक' धनुष्य बापुडे।
हे काय 'मशक' माझ्यापुढे।
आत्तां मोडिन कडाडें।
फेडिन साकडें॥

अशी वल्गना करीत त्यानं धनुष्य उचलायला हात घातला.

सांगा, आतांच्या काव्यात शोभणारी सरळ साधी रचना, अनुप्रास अन् अर्थवाहकता याही पंक्तींत नाही का? फार मोठ्या गूढार्थाचा यात आदेश नसेल, पण काव्याचे अंकुर नाहीत का यातले कौतुकास्पद? पुढे पहा गंमत. कोवळ्या वयाचा राजसकुमार रामचंद्र अखेर धनुष्याजवळ आला. तेव्हा सीतेचं अनुरक्त हृदय साशंक होऊन एखाद्या पाखराप्रमाणे फडफड

करू लागले. एवढं मोठं हे भयंकर धनुष्य अन् हा राजबिंडा नाजुक युवक ! तो ते कुठून सज्ज करणार ? या कल्पनेनं सीतेचे मन एवढेसे होऊन गेले. तिने कुलस्वामिनीचा धावा सुरू केला ! ह्या ओळी पहा–

'धाव, पाव, हे कालीमाते, गिरिवासिनी
तुझिया नामे घालिन सुवासिनी ।
रामा वर देई, त्रैलोक्यनिर्दालिनी ।।

'देवी ! त्रिंबक– धनुष्य फार अवजड– माझे राम कसे आहेत सांगू का ? अगदी सुकुमार–'

त्रिंबक– धनुष्य बहु थोर– ।।
राघव सुकुमार– ।।
घनश्याम हे मनोहर– ।।
कोमल शरीर ।।

असे हे श्रीरामच तुझ्या आशीर्वादानं धनुष्य उचलू देत. जेव्हा हे धनुष्य हा मेला रावण उचलील तेव्हा आई जगदंबे, माझी प्रार्थना ऐक–

जेव्हा रावण, तो, रावण तो ।
उचली कोदंडाला ।
तेव्हा यश देऊ नको त्याला ।
विजयी कर रामाला– उचलू दे चापाला ।
पाव हे काली– कालीमाते ।

साशंक नवरीच्या भावना याहून काय वेगळ्या असतात आणखी ? त्यांचं हे साध्या परंतु जिव्हाळ्याच्या भाषेतलं वर्णन मला तरी आवडलं खरं. सीतेच्या मनाची कालवाकालव होऊन तिला घेरी आली व सख्या 'काय झालं' म्हणून विचारू लागल्या. सीतेनं स्पष्ट उत्तर दिलं–

सकल सख्यांनो, तुम्ही जा जा ।
मम जनकाते सांगा ।
वृत्तान्त सर्वहि माझा ।।
मी प्रणिला राम राजा ।
त्याचीच मी प्रिय भाजा ।।

सांगा पाहू, जुन्या काळची ही 'कणिका' वाईट आहे का ? सीतेनं

वडिलांना लज्जा दूर ठेवून शेवटी निरोप पाठवला– 'हा पणच नको बाबा।'

सांडि– सांडि हा पणु।
कूर्मपृष्ठसम परम कठिण हे शिवधनु।
रघुवीर कोमल तनु।
ह्याशी चढवील कैसा गुणु?
एकबाण रघुवीर– शर, पहा–
मम हृदयी बैसला।
'राघव' मी प्रणियला॥

लांबचलांब वाटणारं आपलं जुनं सीतास्वयंवर हे असं आपलेपणानं पहावे. खंडकाव्यं म्हणायची नसतात, तर वाचायची असतात, हृदयानं ओळखायची असतात. त्याप्रमाणं या आठ-दहा पद्यांच्या मोठ्या काव्यातली काही सौंदर्यस्थळे मी दाखवली आहेत. त्यावेळी स्त्रीशिक्षण नव्हतं, हे जाणून मगच या स्त्रीरचित गाण्यांचं स्वारस्य पाहावं, म्हणजे जुन्या मधाप्रमाणं त्याची गोडी कळेल.

आता आणखी काही गीते पाहू. आईच्या जुन्या वहीत 'जोगडा' या नावाचं एक विनोदी गाणं आहे. जुन्या बायकांना काही विनोदाचं वावडं नव्हतं. कित्येक गाण्यांतून हा विनोद पहायला मिळतो. 'जोगडा' म्हणजे जोगी– श्रीशंकर. शंकरजी म्हणजे तपस्वी, जटाजूट वाढवलेले, रुद्राक्षांच्या माळा घालून, लोटाचिमटा घेऊन बसणारे स्वामी! अशांचा संसार कसा असेल? पार्वतीसारखी श्रेष्ठ नगाधिराजाची कन्या पतिगृही आल्यावर तिला सारा तो पतीचा अवतार पाहून काय वाटलं, याचं विनोदी वर्णन पाहा. पार्वती म्हणते आहे–

'कैसा कपाळी बाई, पडला जोगडा ग–'

साधं जोगीसुद्धा नाही– तर रागानं जोगडा म्हटलं आहे तिनं.

'लावुनिया राख अंगा– बैसे देऊळी ग
संसार करू गेल्या– 'कामा'सी जाळी ग।'

प्रत्यक्ष काम जाळून टाकल्यामुळे कामिनी अशी रुष्ट होणारच!

मस्तकीं शिवगंगा, 'अर्धा चंद्र' भाळीं ग।

ध्यानीं या पाहातां, अग्नीचा गोळा ग ।
भीषण-अंगावरी सर्पांच्या माळा ग ।
त्रिशूळ-डमरू हातीं, अद्‌भुत कळा ग ।

पार्वतीची तक्रार खरी नाही का ? पतीजवळ जावं, त्याच्या गळ्यात हात टाकून गुजगोष्टी कराव्या अशी या प्रेमळ पत्नीला इच्छा होई; पण गळ्यात भयंकर सर्प असायचे ! डोक्यावर पाण्याचा प्रवाह (गंगाबाईचा) ! जणु धबधब्याच्या धारेत बसूनच पति-पत्नी हितगुज करीत आहेत अशी स्थिती ! अंगाला राख, मस्तकावर जटाजूटाचा मोठा पसारा अन् त्यातून गंगेसारखी मिस्किल स्त्री सारखी डोकावून हसते आहे. का नाही पार्वतीला राग येणार ? ती म्हणते– 'एवढे राजाचे जावई अन् ह्यांचं राहणं तर पहा कसं दरिद्री आहे ते–

असोनिया ताटवाटी– करटयात जेवी ग ।
पक्वान्न सांडुनिया– भिक्षान्न भावी ग ।
कैलासीं पाहुं गेल्या घर नाही, वाडा ग ।
भूतगण जमवुनी– स्मशानात क्रीडा ग ।।

सांगा, हे ध्यान पार्वतीनं कसं 'मनोहर' मानावं ? तिची मनःस्थिती या गाण्यात उत्तम प्रकट झाली आहे. हे मिस्किल वर्णन करणारी कवयित्री भेटली असती मला, तर बरं झालं असतं.

श्रीकृष्णाची सत्यभामा म्हणजे भारी रुसणारी– पण लाडकी बायको होती. 'भामा' या गाण्यात श्रीकृष्ण रुसलेल्या पत्नीची समजूत काढताना म्हणतात–

लाडके ! लीन तुजपुढे होऊन
मर्जीचा कल पाहून
बोलतो आम्ही आपुले भिऊन ।

तरुण देखणी पत्नी रुसली की आताचे प्रियकर तरी काय दुसरं म्हणत असतील ?

'मंदोदरी' या गाण्यात अशोकवनात सीतेकडे मन वळवण्यासाठी रावणानं आपल्या प्रत्यक्ष पत्नीला मंदोदरीला– दौत्य करायला पाठवलं आहे ! त्या वेळचे संवाद किती मार्मिक रचले आहेत ! पतिव्रता मंदोदरी

पतीचं वर्णन करून सीतेचं मन वळवीत आहे. पहाना–

चौदा चौकडयांचे राज्य ।
जानकी, मी देईन तुज ।
रत्नजडीत सुमनशेजा
तू होई रावणाची भाजा ।
ऐक माझ्या वचनासी
राम-रावण एकच राशी ।
भेद नाही पंगतीशी ।।

'अग सीते, सगळे पुरुष सारखेच– रावणही रामासारखाच पराक्रमी पुरुषोत्तम आहे. लक्षात घे–'

सीता संतप्त झाली आहे. सारे पुरुष सारखेच म्हणे ! काय हे मूर्खपणाचे भाषण ? तिनं सांगितलं– 'कुठे माझे रामचंद्र अन् कुठं हा राक्षस ? काही तरी बरोबरी ? मंदोदरी, किती वेडी तू ?'

काय बोललीस वचनासी ?
काक म्हणशील कां हंसासी ?
गोटा म्हणशी मम परिसाशी ।
कांदा म्हणसी तूं रुचकर
मातीस म्हणशी तूं कापूर
रेडयाला म्हणशील कुंजर ।

रावण हा कावळा, गोटा, कांदा, माती अन् रेडा. त्याला उपमा तरी बघा कशा तुच्छ वापरल्या आहेत सीतेनं तुलना करताना ! समर्पक उपमांचं हे योजनाचातुर्य जुन्या गाण्यात आणखीही कित्येक ठिकाणी मला आढळलं आहे. मुद्रिकेच्या एका गाण्यातले सीतेचे उद्‌गार असे आहेत–

लोटले दिवस अजि साचे
उदकाविण मछलिस जैसे ।

आणि याच पद्यात मुद्रिकेशी सीता हितगुज करते त्यात लक्ष्मणाबद्दल ती म्हणते–

चौदा वर्षे झाली त्यांनी केले उपोषण
बालक माझे नाही गेले फेडाया पारणं ।
कशी दैवाची गति ? जाहले हरिण–पाडसाविण
बाई कोठे लक्षुमण ?।

धाकटचा दीराला पुत्रासमान मानून सीतेने त्याला हरिणपाडसाची उपमा दिली आहे, त्यातला वत्सलभाव स्पष्ट व हृद्य असाच आहे. अशा या उपमा या स्त्रीगीतातून वैविध्याने व वैपुल्याने आढळतात. भाषेचे दुसरेही अलंकार कमी नाहीत. मुद्रिकेतीलच शब्दरचनेचे एक सुरेख उदाहरण पहा ना–

सौमित्र-मित्र कुलदीप, चित्तसमरूपगात्र सुकुमार
काननि तिष्ठति फार ।
मजवीण वल्लभा शीण– मीच पापीण अविचारू
धाडिले मृगा मारू ।
मुद्रिके, अगोचर पथे, आलिस तूं इथे– कसे करुनि
हा प्रबल सिंधु तरुनी ।

शब्द साधे, परंतु अनुप्रास– यमक पहा, त्यातले भावदर्शन पहा. खरोखरच या शब्दसौंदर्यामुळेच मला मुद्रिका आवडूं लागली आहे.

कल्पनांची समृद्धिदेखील काही कमी नाही. एका पद्यात कल्पना आहे की यशोदा कृष्णाला लहानपणी गोष्ट सांगत आहे. एकदा रामाची संपूर्ण कथा तिनं सांगितली. कृष्ण ' हुं हुं ' म्हणत होता. परंतु ' रावणानं रामाची सीता नेली ' म्हटल्याबरोबर छोटा कृष्ण क्रुद्ध होऊन एकदम म्हणाला–

एकदा वधिला असुर, संगे घेऊनी कपी ।
कसा जन्म जाहला पाप्याचा पुनरपि ?।
मज द्या धनुष्यबाण । रावण टाकितो वधुनी ।।

चालू कृष्णावताराचा क्षणभर विसर पडून देवाला रामावतारीचा आवेश आलेला दिसतो ! हा कल्पनाविलास ' पालख ' या गाण्यात आढळला.

' योगी ' या गाण्यात ईश्वराच्या अनंत रूपांमुळं त्याला काय म्हणावं हे हे समजत नाही अशी तक्रार आहे, ती अशी :

अनंतरूपी– अनंत नामे, न कळे शेषा महिमा न ।
काय म्हणावे तरी या हरीला ? नसे कशाला ठिकाणा ।।
भूप म्हणावा तरि धर्मागृहिं उच्छिष्ट काढी पाहा कसा ।
'सख्य' जनाचा मित्र म्हणाल तर 'मातुल' वधिला शत्रु जसा ।।
उदार म्हणावा तरी बलिपुढे हात दानासी पसरिला ।
कृपण म्हणावा तरी ध्रुवाला मान्य पदावर बैसविला ।।

याच श्रीहरिची 'माया' कशी आहे तेही वर्णन आढळले :

मनुजा श्रीहरिची अद्‌भुत माया– दुर्घट समजाया
गर्भी बीजाला अंकुर फुटतो ! नवपर्णी बनतो
शाखाफलपुष्पें रस टवटवतो– मागुती मग वठतो
बाल्यतरुणपण जरा भोगुनी– देह विलया जातो
जन्ममरण संसार चुकाया– चल शरण सद्‌गुरुराया ।।

वठलेला वृक्ष अन् म्हातारपण यांचे हे साम्य दाखवून सद्‌गुरूला शरण जा आणि आत्मज्ञानाची प्राप्ति करून घ्या, हा यांतला आदेश लक्षात येईलच. जुनी विरहगीतेही बरीच आहेत. सीता अन् राम यांचा विरह, अक्रूर कृष्णाला घेऊन गेला तेव्हा गोपींना झालेला विरह, इत्यादि प्रसिद्ध आहेत. राम एके ठिकाणी म्हणतो–

वनिचे वृक्ष आणि पाषाण । मला भ्रम झाला
कवटाळित होतो त्याला ।
हे नेत्र भुकेले निशिदिन तुज पहाणारे
स्रवताती श्रमजल धारे ।
करूं काय ? सुचेना काही ।
विश्रांतिस्थल मज नाही ।
हे त्रिभुवन देइल ग्वाही ।।
हे सीते, कोमलगात्रे, अति सुकुमारी
कुठे लपलीस जनककुमारी ? ।।

आजच्या पद्यरचनेपेक्षा ही 'विराणी' कोठल्याही प्रकारे हिणकस ठरणारी नव्हे.

या गीतांइतक्याच 'गौळणी'ही स्त्रियांच्या जुन्या गाण्यांत मानाचे

स्थान घेऊन बसलेल्या दिसतात. ही स्त्रीवर्णित गौळण साधीसुधी थोडीच ? ती तर कृष्णपरमात्म्याच्या गोकुळातली गवळण ! तिचे जीवन श्रीकृष्णाच्या मुरलीने संगीतमय झालेले. ही निरनिराळचा रूपात दिसते. कधी यशोदेकडे तक्रार करील, कधी मुरली ऐकताच देहभान सुटून कुंजवनाकडेही धावेल, कधी कृष्णानं लोणी-दही चोरून खाल्ले म्हणून त्यालाही शिव्या देईल किंवा कधी प्रीतीनं जवळ घेईल व कधी तर रासक्रीडेतही दंग होऊन रमेल.

या गौळणीतून हमखास व प्रामुख्याने उल्लेख असणार तो राधेचा. ती अनुपम सौंदर्याची खाण, कृष्णप्रिया ! तिलाही कृष्णाचे भक्तीवेड लागलेले, त्याही वर्णनांचा या गौळणीतून आविष्कार झालेला दिसतो– पण भक्तीपेक्षा राधेची भावना कृष्णाशी प्रणयाचीच होती, हेच सर्व ठिकाणी आदरून व्यक्त झालेले आहे. उदा. पिचकारी नावाचे हे एक गवळण-गीत पहावे. हे रंगपंचमीच्या वेळचे गीत आहे– राधा कृष्णाला म्हणते आहे–

आज गडे वसंत खेळू चला। तुम्ही समुद्र मी शिंपला।।
तुम्ही मोहन मी बासरी– नाजुक शोभे तुमच्या करी।।
तुम्ही सुवासिक केशर– मी कस्तुरी।।

राधेचे हे किती प्रेमपूर्ण शब्द ! ह्याला वाटलं तर प्रणयशब्द म्हणा, वाटलं तर भक्तीचे बोल म्हणा– पण खरे म्हणजे हे गीत राधेची भक्तीच व्यक्त करते, कारण भक्त नामदेवाच्या एका अभंगात–

'तू वृंदावन, मी चिरी– तू तुलसी मी मंजिरी
तू चांद मी चांदणी– तू नाग मी पद्मिणी'

असे शब्द आढळतात ते भक्तीने प्रेरित झालेलेच आहेत व हे राधेचे गीत त्याहून वेगळे थोडेच ?

बालपणीच्या 'कृष्णलीला' प्रसिद्धच आहेत. छोटा कृष्ण मोठा खोडकर, गोकुळांत दंगा मांडला होता त्याने नुसता ! पण गोपी स्वपुत्राबद्दलच्या मायेने, वात्सल्यानेच या मनमोहनाच्या खोड्यांकडे पाहात,– अर्थात सर्वच नाही– कोणी भयंकर चिडून त्याला शिव्याही देत. काही सुंदर कल्पनांचा आविष्कार त्यांतूनही झालेला आढळतो. उदा. एक गोपी कृष्णालाच रागावून बजावते :–

'त्या पूतनेच्या शोषुनि ज्वाळा ।। जाहलासी असा काळा ।।'

किती झकास ? पूतनेने दुष्टपणे स्तनाग्रांना कालकूट लावले होते व नंतर तान्ह्या कृष्णाला स्तनपान दिले होते, याच्याशी या कल्पनेचा संबंध दूरान्वयाने पोहोचतो की नाही ? कृष्ण जाणता झाल्यावर 'मुरलीधर' झाला व त्याच्या मुरलीने गोपी वेडावून जाऊ लागल्या. त्यांना कामधाम सुचेना. कारण ते मुरलीवादन असे तसे थोडेच ? मुरली ऐकून जड चराचराचीही स्थिती कशी होत होती बरे ? हे एक वर्णन पहा–

ही यमुना वाहे स्थिर । मंद राहिला समीर
हालवीता धरणीधर । आत्ममस्तका ।

हे सूर ऐकून जेथे नदी वाहायची थांवते, वाराही मंद होऊन हे गीत ऐकतो, शेषही धरणीचा मस्तकावरील भार पेलीत अगदी समाधी लावून बसतो !' अशी सृष्टीचीदेखील स्थिती होत होती तिथे बापडच्या गोपींचा हे सूर ऐकून जीव उडून कुंजवनाकडे धाव घेई हे नवल थोडेच ? एक गोपी तर त्रासून वडीलधाऱ्या गोपीना अगर यशोदेलाच विनवणी करते आहे–

'याच्या हातीचा वेणु कुणी घ्याऽहो ।
वाजवुनी हरीतो हरी जीव भावोऽ ।।

दुसरी म्हणते, 'यशोदे, आमची फजिती काय विचारतेस ? ऐक जरा–'

'बोले वेल्हाळी मोहक हरीने कुंजवनामधि वाजविली मुरली ।
माझी चित्तवृत्ति मुरली ।। देहभान स्मृती मज नाही उरली ।।
पतिसुत सोडुनि धावत आले ।। भ्रांत जिवा पडली ।।
मोठा बाई टवाळ, पूतनारी ।। यशोदे ! वाजवितो मुरली ।

यावर यशोदाबापडी काय उत्तर देणार ? सगळे खरेच होते ते.

अशा या गोकुळच्या कान्ह्याच्या गाण्यांचे तऱ्हेतऱ्हेचे प्रकार या स्त्रीगीत-रचनेत आढळतात. रचनावैचित्र्य, भावदर्शन, स्त्रीसुलभ विनोदी वा उपरोधिक वर्णने, आणि रासक्रीडा करतानाची क्वचित शृंगारिक गीतेही आपले लक्ष वेधून घेण्याइतकी सरस किंवा चमत्कृतीपूर्ण रचनेची असून ती उत्कट भावनेची दर्शक ठरणारीच आहेत ! त्याची संख्या अमाप आहे, कोठवर त्याबद्दल लिहावे ?

आणखीही द्रौपदीचे धावे, चंद्रावळ, पारिजातक वगैरे पुष्कळ गाणी स्त्री-

स्थान घेऊन बसलेल्या दिसतात. ही स्त्रीवर्णित गौळण साधीसुधी थोडीच ? ती तर कृष्णपरमात्म्याच्या गोकुळातली गवळण ! तिचे जीवन श्रीकृष्णाच्या मुरलीने संगीतमय झालेले. ही निरनिराळ्या रूपात दिसते. कधी यशोदेकडे तक्रार करील, कधी मुरली ऐकताच देहभान सुटून कुंजवनाकडेही धावेल, कधी कृष्णानं लोणी-दही चोरून खाल्ले म्हणून त्यालाही शिव्या देईल किंवा कधी प्रीतीनं जवळ घेईल व कधी तर रासक्रीडेतही दंग होऊन रमेल.

या गौळणीतून हमखास व प्रामुख्याने उल्लेख असणार तो राधेचा. ती अनुपम सौंदर्याची खाण, कृष्णप्रिया ! तिलाही कृष्णाचे भक्तीवेड लागलेले, त्याही वर्णनांचा या गौळणीतून आविष्कार झालेला दिसतो– पण भक्तीपेक्षा राधेची भावना कृष्णाशी प्रणयाचीच होती, हेच सर्व ठिकाणी आदरून व्यक्त झालेले आहे. उदा. पिचकारी नावाचे हे एक गवळण-गीत पहावे. हे रंगपंचमीच्या वेळचे गीत आहे– राधा कृष्णाला म्हणते आहे–

आज गडे वसंत खेळू चला। तुम्ही समुद्र मी शिंपला।।
तुम्ही मोहन मी बासरी– नाजुक शोभे तुमच्या करी।।
तुम्ही सुवासिक केशर– मी कस्तुरी।।

राधेचे हे किती प्रेमपूर्ण शब्द ! ह्याला वाटलं तर प्रणयशब्द म्हणा, वाटलं तर भक्तीचे बोल म्हणा– पण खरे म्हणजे हे गीत राधेची भक्तीच व्यक्त करते, कारण भक्त नामदेवाच्या एका अभंगात–

'तू वृंदावन, मी चिरी– तू तुलसी मी मंजिरी
तू चांद मी चांदणी– तू नाग मी पद्मिणी'

असे शब्द आढळतात ते भक्तीने प्रेरित झालेलेच आहेत व हे राधेचे गीत त्याहून वेगळे थोडेच ?

बालपणीच्या 'कृष्णलीला' प्रसिद्धच आहेत. छोटा कृष्ण मोठा खोडकर, गोकुळांत दंगा मांडला होता त्याने नुसता ! पण गोपी स्वपुत्राबद्दलच्या मायेने, वात्सल्यानेच या मनमोहनाच्या खोड्यांकडे पाहात,– अर्थात सर्वच नाही– कोणी भयंकर चिडून त्याला शिव्याही देत. काही सुंदर कल्पनांचा आविष्कार त्यांतूनही झालेला आढळतो. उदा. एक गोपी कृष्णालाच रागावून बजावते:–

'त्या पूतनेच्या शोषुनि ज्वाळा ।। जाहलासी असा काळा ।।'

किती झकास ? पूतनेने दुष्टपणे स्तनाग्रांना कालकूट लावले होते व नंतर तान्ह्या कृष्णाला स्तनपान दिले होते, याच्याशी या कल्पनेचा संबंध दूरान्वयाने पोहोचतो की नाही ? कृष्ण जाणता झाल्यावर 'मुरलीधर' झाला व त्याच्या मुरलीने गोपी वेडावून जाऊ लागल्या. त्यांना कामधाम सुचेना. कारण ते मुरलीवादन असे तसे थोडेच ? मुरली ऐकून जड चराचराचीही स्थिती कशी होत होती बरे ? हे एक वर्णन पहा–

ही यमुना वाहे स्थिर । मंद राहिला समीर
हालवीता धरणीधर । आत्ममस्तका ।

हे सूर ऐकून जेथे नदी वाहायची थांबते, वाराही मंद होऊन हे गीत ऐकतो, शेषही धरणीचा मस्तकावरील भार पेलीत अगदी समाधी लावून बसतो !' अशी सृष्टीचीदेखील स्थिती होत होती तिथे बापडया गोपींचा हे सूर ऐकून जीव उडून कुंजवनाकडे धाव घेई हे नवल थोडेच ? एक गोपी तर त्रासून वडीलधाऱ्या गोपीना अगर यशोदेलाच विनवणी करते आहे–

'याच्या हातीचा वेणु कुणी घ्याऽहो ।
वाजवुनी हरीतो हरी जीव भावोऽ ।।

दुसरी म्हणते, 'यशोदे, आमची फजिती काय विचारतेस ? ऐक जरा–'

'बोले वेल्हाळी मोहक हरीने कुंजवनामधि वाजविली मुरली ।
माझी चित्तवृत्ति मुरली ।। देहभान स्मृती मज नाही उरली ।।
पतिसुत सोडुनि धावत आले ।। भ्रांत जिवा पडली ।।
मोठा बाई टवाळ, पूतनारी ।। यशोदे ! वाजवितो मुरली ।

यावर यशोदाबापडी काय उत्तर देणार ? सगळे खरेच होते ते.

अशा या गोकुळच्या कान्ह्याच्या गाण्यांचे तन्हेतन्हेचे प्रकार या स्त्रीगीत-रचनेत आढळतात. रचनावैचित्र्य, भावदर्शन, स्त्रीसुलभ विनोदी वा उपरोधिक वर्णने, आणि रासक्रीडा करतानाची क्वचित शृंगारिक गीतेही आपले लक्ष वेधून घेण्याइतकी सरस किंवा चमत्कृतीपूर्ण रचनेची असून ती उत्कट भावनेची दर्शक ठरणारीच आहेत ! त्याची संख्या अमाप आहे, कोठवर त्याबद्दल लिहावे ?

आणखीही द्रौपदीचे धावे, चंद्रावळ, पारिजातक वगैरे पुष्कळ गाणी स्त्री-

विरचित आहेत; परंतु ती सर्वांना परिचयाची आहेत. शिवाय कथाकीर्तनातून त्या गाण्यांची उजळणी पुष्कळदा होताना मी ऐकली आहे, तशीच गोंधळातही ही गाणी कधी कधी पुनरुज्जीवित झालेली आढळतात. अशा एका जुन्या धाव्यामधे द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळी द्रौपदीची वस्त्रे श्रीकृष्णाने किती तऱ्हांची पुरवली होती त्याचे एक सुंदर वर्णन मला पुढीलप्रमाणे आढळले–

नाशिकची ती मुगवी मिराणी– सोलापुरची, पदर फुटाणी ।।
येवल्याची ती लालचंचणी– बऱ्हाणपुरची हिरवी पैठणी ।।
सुंदर खासे नागपुराचे– जाडे दणकट मालेगावचे ।।
बहु अमोलिक बेळगावचे– लांबरुंद ते खास पुण्याचे ।।
इंदूरचे ते बहु गुलजार– बडोद्याचे उडवी बहार ।।
शालु काजळी काश्मीराचा– बुट्टेदारी जरीपदराचा ।।

आजही हे वर्णन ऐकून वाटतं की, येवल्याची ती 'चंचणी' कशी असेल? काश्मिरी काजळी शालू कसा असेल? 'मुगवी मिराणी' म्हणजे कशी साडी? काही पत्ता लागत नाही! न लागेना! ही वेगवेगळ्या तऱ्हाची वस्त्रे म्हणजे वैभवशाली भारताच्या कलाकुसरीची साक्ष देणारी स्मृतिचिन्हेच होती हे तरी खरे ना?

वस्त्रवर्णनांप्रमाणे खाद्यपदार्थांचीही वर्णने पुष्कळ आढळतात. खरे म्हणजे स्त्रीचे मन संसारी व वृत्ति तर अन्नपूर्णेचीच! तेव्हा या वर्णनात विशेषच 'स्वादिष्टपणा' भरून राहावा यात नवल नाही. उदाहरणार्थ, चंद्रावळ नावाच्या गाण्यात चंद्रावळीने राहीरूप घेऊन आलेल्या श्रीकृष्णासाठी मेजवानी केली, त्याचे वर्णन जागोजाग रचयित्रीच्या रुचिभिन्नतेने नटलेले दिसते. एक नमुना असा–

लवण लोणचे वाढुन तिखट।
शाका भाज्या वाढून नीट।।
फेण्या सांजोऱ्या आणि वळवट।
तूप गाईचे फार चोखट।।
भक्षण करूनि पुशिले ओठ।
सुगंध उदकी चुळ भरिली।

यातील 'वळवट' हा शब्द खास जुन्या काळचा असून त्याचा अर्थ वळलेल्या गव्हल्यांचा प्रकार असा आहे. नाना फडणिसांच्या 'भोजन कसे असावे' या एका आज्ञापत्रातही हा 'वळवट' शब्द आलेलाच आहे! 'रुक्मिणीचे न्हाण' नावाचे एक गाणे असेच. पूर्वी मुलीला ऋतुप्राप्ती झाली की, मखर घालीत असत, सासरी जेवणावळी होत, उत्सवसमारंभ होई, व 'न्हाणवली'ला आप्तेष्ट स्त्रिया जेवणाचे ताट वाढून नेत. अर्थात् खाद्यपदार्थांचे वर्णन गाण्यातून करायला स्त्रियांना याहून उत्तम निमित्त कोठले? पुढील 'न्हाणवली' गाण्यातली ही पक्वान्ने तर पहा–

भात पोळ्या वरणपुरी– मांडा घीवर घारी।
चिरोटे फेण्या बुंदी– दळीया मुगदळ सांजुरी॥
श्रीखंड मोदक दूध दही मधे गव्हले–।
सरळे शेवयांची– मालत्या वोटवे फणवले॥
मोहनभोग सारें, केशरीभात– कागदी वांगीभात॥
मग हलवा पुढे वाढती।

अशाच प्रकारची, तोंडाला पाणी सुटेल अशी मिष्ट वर्णने, द्रौपदीची स्थाली, राजसूययज्ञाची मेजवानी, कोणा एकाद्या पौराणिक देवतेचे डोहाळ-जेवण, यांतही वैपुल्याने दिसतात. मात्र रसिकांनी या जेवणावळीत सुंदर शब्द-पंक्ति वा भाषासौंदर्याची पान-शोभा मुळीच हुडकत बसू नये हे बरे! फक्त वर्णनक्षमतेच्या दृष्टीनेच अशा गाण्यांची रुचि त्यांनी अनुभवावी हे बरे!

या रचनेखेरीज स्त्रियांच्या माजघरातील गाण्यांचा आणखी एक फार मोठा विभाग देहावरच्या अगर अध्यात्मिक गीतांचा असतो. हा प्रांत अधिक वैचारिक व रचनासुंदर, शिवाय त्यात स्त्रीची पारमार्थिकता स्पष्ट झालेली, त्यामुळे 'गीतरूपक' या प्रकरणात त्याची मी स्वतंत्र ओळख दिलेली आहेच. पण नमुन्यादाखल एक गीत पाहू. येथे सांसारिकता व अध्यात्म यांचा मोठा मनोहर मिलाफ दिसतो व हेच तर या अशा स्त्रीरचित गीतांचे वैशिष्ट्य! उदाहरणार्थ, गृहिणीला बागेची आवड असणारच. पण हे एका अपूर्व बागेचं वर्णन जरा वाचून पहाता? ही अगदीच अनोळखी प्रांतातली बाग दिसते आहे–

विरचित आहेत; परंतु ती सर्वांना परिचयाची आहेत. शिवाय कथाकीर्तनातून त्या गाण्यांची उजळणी पुष्कळदा होताना मी ऐकली आहे, तशीच गोंधळातही ही गाणी कधी कधी पुनरुज्जीवित झालेली आढळतात. अशा एका जुन्या धाव्यामधे द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळी द्रौपदीची वस्त्रे श्रीकृष्णाने किती तऱ्हांची पुरवली होती त्याचे एक सुंदर वर्णन मला पुढीलप्रमाणे आढळले–

नाशिकची ती मुगवी मिराणी– सोलापुरची, पदर फुटाणी ।।
येवल्याची ती लालचंचणी– बऱ्हाणपुरची हिरवी पैठणी ।।
सुंदर खासे नागपुराचे– ज़ाडे दणकट मालेगावचे ।।
बहु अमोलिक बेळगावचे– लांबरुंद ते खास पुण्याचे ।।
इंदूरचे ते बहु गुलजार– बडोद्याचे उडवी बहार ।।
शालु काजळी काश्मीराचा– बुट्टेदारी जरीपदराचा ।।

आजही हे वर्णन ऐकून वाटतं की, येवल्याची ती 'चंचणी' कशी असेल? काश्मिरी काजळी शालू कसा असेल? 'मुगवी मिराणी' म्हणजे कशी साडी? काही पत्ता लागत नाही! न लागेना! ही वेगवेगळ्या तऱ्हाची वस्त्रे म्हणजे वैभवशाली भारताच्या कलाकुसरीची साक्ष देणारी स्मृतिचिन्हेच होती हे तरी खरे ना?

वस्त्रवर्णनांप्रमाणे खाद्यपदार्थांचीही वर्णने पुष्कळ आढळतात. खरे म्हणजे स्त्रीचे मन संसारी व वृत्ति तर अन्नपूर्णेचीच! तेव्हा या वर्णनात विशेषच 'स्वादिष्टपणा' भरून राहावा यात नवल नाही. उदाहरणार्थ, चंद्रावळ नावाच्या गाण्यात चंद्रावळीने राहीरूप घेऊन आलेल्या श्रीकृष्णासाठी मेजवानी केली, त्याचे वर्णन जागोजाग रचयित्रीच्या रुचिभिन्नतेने नटलेले दिसते. एक नमुना असा–

लवण लोणचे वाढुन तिखट।
शाका भाज्या वाढून नीट।।
फेण्या सांजोऱ्या आणि वळवट।
तूप गाईचे फार चोखट।।
भक्षण करूनि पुशिले ओठ।
सुगंध उदकी चुळ भरिली।

यातील 'वळवट' हा शब्द खास जुन्या काळचा असून त्याचा अर्थ वळलेल्या गव्हल्यांचा प्रकार असा आहे. नाना फडणिसांच्या 'भोजन कसे असावे' या एका आज्ञापत्रातही हा 'वळवट' शब्द आलेलाच आहे! 'रुक्मिणीचे न्हाण' नावाचे एक गाणे असेच. पूर्वी मुलीला ऋतुप्राप्ती झाली की, मखर घालीत असत, सासरी जेवणावळी होत, उत्सवसमारंभ होई, व 'न्हाणवली'ला आप्तेष्ट स्त्रिया जेवणाचे ताट वाढून नेत. अर्थात् खाद्यपदार्थांचे वर्णन गाण्यातून करायला स्त्रियांना याहून उत्तम निमित्त कोठले? पुढील 'न्हाणवली' गाण्यातली ही पक्वान्ने तर पहा–

भात पोळ्या वरणपुरी– मांडा घीवर घारी।
चिरोटे फेण्या बुंदी– दळीया मुगदळ सांजुरी॥
श्रीखंड मोदक दूध दही मधे गव्हले–।
सरळे शेवयांची– मालत्या बोटवे फणवले॥
मोहनभोग सारें, केशरीभात– कागदी वांगीभात॥
मग हलवा पुढे वाढती।

अशाच प्रकारची, तोंडाला पाणी सुटेल अशी मिष्ट वर्णने, द्रौपदीची स्थाली, राजसूययज्ञाची मेजवानी, कोणा एकाद्या पौराणिक देवतेचे डोहाळ-जेवण, यांतही वैपुल्याने दिसतात. मात्र रसिकांनी या जेवणावळीत सुंदर शब्द-पंक्ति वा भाषासौंदर्याची पान-शोभा मुळीच हुडकत बसू नये हे बरे! फक्त वर्णनक्षमतेच्या दृष्टीनेच अशा गाण्यांची रुचि त्यांनी अनुभवावी हे बरे!

या रचनेखेरीज स्त्रियांच्या माजघरातील गाण्यांचा आणखी एक फार मोठा विभाग देहावरच्या अगर अध्यात्मिक गीतांचा असतो. हा प्रांत अधिक वैचारिक व रचनासुंदर, शिवाय त्यात स्त्रीची पारमार्थिकता स्पष्ट झालेली, त्यामुळे 'गीतरूपक' या प्रकरणात त्याची मी स्वतंत्र ओळख दिलेली आहेच. पण नमुन्यादाखल एक गीत पाहू. येथे सांसारिकता व अध्यात्म यांचा मोठा मनोहर मिलाफ दिसतो व हेच तर या अशा स्त्रीरचित गीतांचे वैशिष्ट्य! उदाहरणार्थ, गृहिणीला बागेची आवड असणारच. पण हे एका अपूर्व बागेचं वर्णन जरा वाचून पहाता? ही अगदीच अनोळखी प्रांतातली बाग दिसते आहे–

गुरुरायानं नवलाभ केला।
'देह' अपूर्व बाग लाविला ॥
साडेतीन चाहूर बागशाई।
आत पेरली पंचरंगी जाई ॥
बागेमधे असे एक हृदयविहीर।
मोट विचाराची वाहे निरंतर ॥
मनपवनाचे लावुनि दोर।
तयाला भक्तीचे वळ थोर ॥

साडेतीन हात जागेत हा बाग आहे, या देहरूप बागेत पंचप्राणांची जाई फुलली आहे; इत्यादि सारेच वर्णन मनोवेधक व मुमुक्षूची आर्तता दर्शवणारे आहे.

*

मागच्या शतकात स्त्रीजीवन आकुंचित, समाजपराङ्मुख होते हे नजरेसमोर आणले की, सारीच ही गाणी पौराणिक वा भक्तिपरच का, ते समजेल. स्त्रीला तेव्हा स्वातंत्र्यही नव्हते, मग या रचनेत तरी बहुविधता, वैचित्र्य, जगाचा विशाल अनुभव यांचे दर्शन कोठून होणार? त्यामुळे सामाजिकतेच्या पायावर ही गाणी फारशी रचली गेलेली नाहीत हे खरे, पण डोळ्यासमोर नित्य असलेली कथा पुराणातून रंगणारी कथानके व ईश्वरभक्ति या दोन वैशिष्ट्यांनी ही स्त्रीगीते कशी रंगदार व उत्कट वाटतात पाहिलेत ना?

अशी ही तऱ्हेतऱ्हेची स्त्रीविरचित जुनी गाणी. त्यांचं सौंदर्य जुनाटपणाच्या नावाखाली कोंडलं गेलं आहे. पण स्त्रीच्या उत्स्फूर्त भावदर्शनाला त्यातूनच एकाकाळी योग्य व थोडाबहुत वाव मिळाला होता हेही विसरले जावे का? जाणत्या भगिनीवर्गाने आपल्या या प्राचीन स्त्रीगीतांची उपेक्षा अशीच केली तर कालप्रवाहात ही सारी मूल्यवान जुनी पानं वाहून जातील.

आणि म्हणूनच वाङ्मयदृष्ट्याही महत्त्वाची अशी ही मागच्या स्त्रीपिढीची बौद्धिक व भाविक ठेव आपण जपून ठेवायला हवी!

★

६ : जानपद उखाणे

खेडेगावात अनेक वर्षं माझं रहाणं झालं तेव्हा खरं म्हणजे ग्रामीण स्त्रीजनांशी माझी मैत्रीही जमली. त्यांच्या अनेक सोहाळचासमारंभांना मी हजर असे, पैकी एका मजेदार गोष्टीने माझा पुष्कळदा लक्षवेध केला, ती म्हणजे अजूनही खेडोपाडी उखाणे ऊर्फ आहाणे घ्यायची पद्धत आहे, व ती मोठी रंगीत व संगीतही आहे, ही होय. हे उखाणे किती तऱ्हांचे ? एक, ज्याचं उत्तर गूढ माहिती देऊन विचारलं जातं ते ओळखण्याचे उखाणे. ते आपल्याकडेही वैपुल्याने आहेत. दुसरा प्रकार म्हणजे लग्नसमारंभात रूखवतासंबंधी जे लांबचलांब उखाणे रचले जातात ते. तो साधारणपणे एक बुद्धिनिष्ठ वाग्युद्धाचाच प्रकार. वधूकडची लहानमोठी मंडळी हे उखाणे घालतात व वरपक्षाच्या उणीवा ठसकेबाजपणे त्यातून बोलून दाखवतात. वरपक्षही काही कमी थोडाच ? तीही मंडळी रोखठोक उत्तरे, अगदी त्याच प्रकारच्या 'रूखवतीय' उखाण्यात देतात व झकास रंग भरतो लग्न-सोहळ्यात ! पण आपण आज विचार करणार आहोत तो ग्रामीण स्त्रिया जे पतीच्या नावाचे उखाणे घेतात, त्याबद्दलचाच !

हा उखाण्याचा प्रकार काही, तसा वाचकांना नवासा नव्हे; कारण अजूनही पांढरपेशा सुशिक्षित वर्गात लग्नकार्य, हळदकुंकू, बारसे, अशा

प्रसंगी स्त्रियांना 'घ्या पतीचं नाव !' म्हणून आग्रह होतो, व मग त्याही नववधू, नवमाता व इतर सुवासिनी; उखाण्यात पतीचे नाव गुंफून हे उखाण्यांचे झेले सजवतात. अगदी त्याच उखाण्याचा हा धाकटा भाऊ-ग्रामीण उखाणा ! त्यांचं कूळ एक आहे, प्रकार तोच, पण आकार वेगळा; बांधा वेगळा अन् प्रकटनाची रीतही थोडी निराळी. पाहू या जरा वानगी ग्रामीण उखाण्यांची ? चला तर.

*

आजवर वाटत होतं की हा उखाणा दोनच ओळींचा असेल महाराष्ट्रीयन उखाण्यांप्रमाणे ! पण छे छे ! त्याची लांबी पुष्कळदा मारुतीच्या शेपटा-सारखी लांबतच जाते आपली ! सहज सावंताच्या नर्मदीला मी 'नाव घे' म्हटलं– तर ती नववधू मला ठसक्याने म्हणाली–

'फार किंमत पडते नावाला म्हटलं ! फुकट नाही घेणार.'

'असं ? काय द्यावं लागतं ? ऐकूं दे ?' मी विचारलं.

ती हसली अन् म्हणाली. 'ऐका तर काय द्यावं लागतं ते–

द्या नारळाची हारकी– तर नाव घेईन ।
नारळाची हारकी– किंमतीनं थोडी ।
द्या लुगड्याची घडी ! तर नाव घेईन ।
लुगड्याच्या घडीलाबी पैका थोडा ।
द्या बसाय् घोडा तर नाव घेईन ।
घोड्याची जात हालकी हालकी ।
द्या बसाय् पालखी तर नाव घेईन !
पालखी यीना माझ्या मना ।
द्या बसाय् मेणा तर नाव घेईन ।
मेण्यात ठेवा पाचशेर गव्हाची ओटी–
शंभर खाऊंच्या पानाची पट्टी–
अन् चिरी, वर खण, पिवळा फिका,–
अन् गुलाबरावाचं नाव घेते, नीट ध्येनात राखा!!

खरेच हे नाव, मोठ्या गुलाबाला जशा कितीक पाकळ्या असतात तसले परोपरीच्या वर्णनाचे. अन् त्यातून तिची ताकीद ही होतीच 'ध्येनात

राखा ! ! ' वीस वर्षं झाली, अजूनही मी ते विसरले नाही !

या नर्मदीप्रमाणेच जाधवांची नवी सून तारू मोठी चलाख दिसली. माझी ओळख झाली नव्हती म्हणून सहज विचारलं, तिच्या सासूला,
' बायजाबाई, ही नवी पोर कोण तुमची ?'

' त्ये तीच सांगल, ठसका लई हाय तिचा ! सांग ग, तोवर मी च्या तरी आणते करून. नाव बी घे ग ! ' माझी शेजारीण आत गेली तशी खुल्या दिलानं ती नवी नवरी हसली. टपोरे डोळे मिचकावून मला म्हणते– ' ऐका तर, मी कोणाची कोण ते, तेही मी नाव घेऊनच सांगते झालं ! ! कारण ते सांगायचं म्हंजी नाव घ्येया लागेलच. ' मी खूष झाले व ती बोल लागली:– ऐका हं–

' नाव घ्येती एक, बाजी कदमाची लेक ।
नाव घ्येती गहीन, जानू कदमाची बहीन ।
नाव घ्येती मी पाव्हनी,– सखाराम शिंद्याची मेव्हनी ।
नाव घ्येनारी मी गवळन– केसू जाधवाची मावळण. ।
नाव घ्येती मी हौशी, हौशी– त्या हंसाबाईची मावशी.
नाव घ्येती मौजं, दाजीसाबाची भावजं ।
नाव घ्येती वळखून– बायजाआईसाबांची सून ।
आणि, नाव घ्येती तान्ही– माज्या येशवंताची रानी ! !

वाहवा ! या एकाच उखाण्यांत बायजांच्या सुनेने तिची सगळी कुळकथा सांगून आपल्या चुणचुणीत बुद्धीची साक्ष पटवून देऊन ती घरात गेली, पायातल्या चांदीच्या तोरड्यांचा छुनूछुन् नाद दूर गेला पण मनातून गेला नाही, उलट हे ग्रामीण, पतीनामाचे उखाणे, त्याकडे माझे बारकाईने लक्ष वेधले. मला वाटायचं, हे उखाणे असे नित्यच लांबलांब असतात की काय? पण थोडीशी लांबी कमी असणारे काही उखाणेहि कानी आले. सारजेचा पती सैन्यांत भरती झाला होता, पगार बराच होता. त्याच्या बायकोनं एकदा एक घरातली गम्मत मला सांगितली. सहज पण साध्या शब्दात नव्हे, उखाण्यातच ! ती म्हणाली– ऐका तरी–

काळी चोळी कनकारा, वर मोत्यांचा झणकारा ।
खंडेराव गेलं लष्करी, तिकडुन आणली सोन्याची सरी

नंद म्हन्ती मला । सासूबाई म्हनत्यात मला मला
घरधनी म्हनत्यात...काय वं जुलूम झाला ?'
मी सरी आनलीया– माझ्या सारजा हिरकनीला ! !

आणि यावेळी पतिवद्दलच्या अभिमानानं चमकणारी सारजेची ती दृष्टी, मला अजून आठवते आहे ! कधी कधी शेतामळ्याचेहि उल्लेख या लांवट उखाण्यातून येतात. जणू ' हा ' छोटा उखाणा नव्हेच, तर एकेका गोष्टीचे वर्णनगीतच, व तेही मागल्या पिढ्यात कोणा स्त्रीने रचलेले, असेच आपण ऐकतो आहोत ! आमच्या सोनू पाटलाची गावाबाहेर चांगली शैती आहे व त्याचं झोपडंही त्या शेतामळ्याच्या दाटीत, केळीकर्दळींनी सजवलेल्या चौरंगासारखे उठून दिसते. वायकोही फटाकडी होती, मला वाटे हिला किती शेताची कामं ? कंटाळत असेल असेल बापडी, पण छे छे ! तिला आपल्या ' श्येतकरी धन्याचा ' केवढा अभिमान होता, तो तिनं मला एकदा उखाण्यांतच ऐकवला, म्हणाली :–

पाऊस पडे झिरीमिरी, मोट धरलीया चाडयावरी ।
बेणं केलं हारोहारी, पीक आलं नानापरी !
तिथं माझं शिरहरी, मळ्यात रावती कारभारी !
झाली पान्याची बरकत,
धान्याची रास भरतो हरखत
आता आना कृस्नाबाईचं पानी
अन् सोनूपाटलाचं नाव घ्येते रतनाबाई राणी !

उखाणा छानच होता, लांबट असूनही त्यात सुसंगति होती व त्यात एक सूत्र बरंच विस्तारानं सांगितलं होतं, हे पाहून मला नवल वाटले खरेच. मग लक्षात आलं की, हे असे लांब उखाणे दरेक मराठमोळा स्त्रीला बरेच येतात व त्यातही वर्णनाचे वेगवेळेपण जरूर असते. कधी सगळ्या दागिन्यांची नावे एकत्र, तर कधी सासर-माहेरच्या गावाच्या पंचक्रोशीची कल्पना देणारं ' भौगोलिक ' वर्णन (यात आसपासची गावे, नदी, खेडी, देव इ. वैशिष्ट्ये पण असतात असे दिसते.)कधी पतीच्या ऐश्वर्याचे वर्णन तर कधी सणांचे तर कधी सासरच्या मंडळीचेही शब्दचित्र अशा कित्येक तऱ्हांचे उखाणे यात असतात, उदाहरणार्थ खेडयात अजूनही अगत्यानं सगळे सणवार

होतात, त्या सणाची नावे एकत्र करून एका छोटीनं घेतलेला एक उखाणा पहा किती छान आहे तो– नागपंचमीपासून सणवर्णनाला सुरुवात आहे हं यांत– ऐकाचः–

पंचमीनं लावला डोळा । आला शेरवानी पोळा ।
पोळ्याची काढते चित्रं आली वडलांची पित्रं
पितरांची निवडते डाळं, आली घटांची माळ
माळेत ओवते जाई दिवाळीनं केली घाई
दिवाळीची लावू पणती । संकरात आली नेणती
संकरातीचं पुजते सुगड, नव्याची पुनव आली दुघड
पुनवेची घेते ओंबी शिमगा मारतोय झोंबी !
शिमग्याची काढू सोजी । पाडवा झालाय् राजी
पाडव्याची उभारते गुढी– आखिती आली लाडी

आखितीचा पूजते करा, प्रतापरावांचं नाव घेते, जरा दम धरा ! !

जरा का ? बराच दम धरावा लागला मला तिच्या धन्याचं नाव कानी येईपर्यंत ! हा उखाणा सणाची वैशिष्ट्ये सांगणारा म्हणून झकास आहे की नाही ? खरे म्हणजे वर दिले आहेत तशा लांबरूंद उखाण्यांनाच ' जानपद उखाणे ' असे नाव आहे. पण आता शहरातले व खेड्यांचे दळणवळण वाढले व सुशिक्षितपणाचे संस्कार ग्रामीण स्त्रीच्या घरातही अंकुरत चालले त्याचा एक दुश्य परिणाम म्हणजे उखाणे एवढे आगगाडीसारखे लांब न राहता छोट्या मोटारीसारखे आटपसर झालेले दिसतात. परवा सहज यादवाच्या सुंदरला मी विचारलं ' काय ग, सासरहून आलीस तर घरी कोणकोण आहेत ? सासरे काय करतात? घरधनी शेती करतात का मळा? त्यांचं नाव काय ? सांग.' सुंदरा हसून म्हणाली– ' घ्या ! समदी माहिती अन् त्येंचं नावबी होवं तुमाला ! तर एका उखान्यातच सांगते हं ! ऐका ध्यान देऊन जरा–

खजिन्याची पेटी– ततं मामंजींची चिठ्ठी ।
ताकाचा डेरा, तत्तं सासूबाईचा फेरा ।
भाकरीची बुट्टी– ततं जावाजावांची मिठी
पुतन्याची कुरी, ततं दीर दाजिबा फेऱ्या करी !

भाताचं शेत ततं नंदाबाईचं चित्त
अन् या समद्यांत, जयाजीरावांचा बंगला ! तत्तंच जीव माझा रंगला ! !

अगदी झक्कास ! घरातल्या माणसांची व पतीच्या नावाची सगळी ही अशी यमकांत गुंफूनच पुढे मांडली तिने. छान वाटली. या थोडक्याशा लांब उखाण्याचे आणखी एक मजेदार उदाहरण. एका फटाकड्या मुलीने फट्कन नाव घेतले त्यातूनही नजरेस आले, ते नाव असे होते :–

रूणझुण जात होते। खिडकीवाटे पाहात होते !
समोर कचेरी दिसती ! कचेरीला लावले मोती !
पण खरे मोती कोणचे, कोणाचे ?
सासूबाईच्या पोटचे, नंदाबाईच्या पाठचे–
पण आता नव्हेत ते तुमचे– रूपा पाटील झाले आमचे ! !

खरं म्हणजे खेडूत सासुरवासिणीला मर्यादेचे बंध किती प्रकारचे असतात ! सासूसमोर मोठ्यानं बोलायचं नाही, जोडवी वाजू द्यायची नाहीत, वडीलधाऱ्यासमोर माथ्यावरचा पदर काढायचा नाही– फार काय, पतीशी कुणा मोठ्या वडीलधाऱ्यांसमोर बोलायचं पण नाही ! असले हे बंध ओलांडून त्या चिमुरडीने हा उखाणा सासू व इतर वडील बायकासमोर ऐटीने घेतला, त्याचे कौतुक सर्वांना वाटणारच !

अशा या उखाण्यांतून दोन गोष्टी स्पष्ट होतात, एकतर पतीचं नाव फार मोलाचं, ते उगीच येता जाता घ्यायचं नाही व नसतं हीही 'गंमत' एकदोघींनी उखाण्यातूनच सांगितली– मला मोऱ्यांची यसुदी म्हणाली–

चांदीची डबी, त्यात अत्तराचा बोळा।
इश्वासरावांचं नाव हाय, शंभर रुपये तोळा ।।

अन् आमच्या तान्ही भांडेवालीनं तर मला एकदा ठणकावून बजावले–

काचेची बरणी– त्यात साकरेचा पाक।
गोविंदरावाच्या नावाला पडत्यात रुपै लाख !

अबब ! लाख रुपये ! पण अर्थात् तान्ही माझी शेजारीणच, तेव्हा मला हे लाख रुपये माफ झाले असावे ! पतिचं नाव इतकं मोलाचं तर खुद्द 'पतिराज' घरधनि, कारभारी, हे केवढ्या तोलामोलाचे वाटत असतील

पत्नीला ? त्यांचे वर्णन उखाण्यातून येते– ते मोठे हार्दिक, इतकेच नव्हे, प्रीतीचा रंग लेवून उमटते ते ! ही दुसरी महत्त्वाची गोष्ट ! आता (शहरी संस्कार घडून) ग्रामीण उखाणेही पांढरपेशा स्त्रीच्या उखाण्याप्रमाणे बरेचदा दोन दोन ओळींचे झालेले दिसतात, तशा पद्धतीचे हे काही हृद्य उखाणे पतिवर्णनाचे आहेत– पहाणार का ?

१ पैशाला वांगी चार, त्येला मसाला हिरवागार।
धनी सर्जेराव, माझं खानारं शिलेदार।

२ तीसांची साडी, विसांचा पदर।
सदा पाटील निघालं भाईर, तर समद्या नारींची गुंतली नदर !

३ जवारीचं पीक, मोतियांचे दाणे।
भरल्या शेतातून जात्यात धनी शंभुराव राणे !

आणि या पतिवर्णनात जेव्हा का पतीच्या रूपाचे स्पष्ट उल्लेख येतात, तेव्हा जणु काही प्रीतीचा गुलाबी रंगच त्यावर चढला आहेसे वाटते! खरे म्हणजे पतीचे रूप ही चार चौघात मोठ्यानं बोलायची बाब थोडीच ! छे छे, लोक काय म्हणतील ? सासू-सासरे असल्या उद्धटपणाला माफ करणार नाहीत, कारण खेड्यातली मानमर्यादा सांभाळण्याची रीत ही अशीच! पण तरीही उखाण्यात पतीच्या रूपाचे वर्णन-अगदी उघड उघड वर्णन-लाजरी सून करते तेव्हा ते कुणी आक्षिप्त मानीत नाहीत, उलट खिलाडू वृत्तीनेच तिकडे पाहिले जाते हे विशेष. हे काही पतिच्या रूपवर्णनाचे उखाणे पहावे–

१ चालणं चटकदार, बोलणं फटकदार।
वर शेमल्याची अक्कड, मानाजीराव दिसत्यात कसं फक्कड।

२ मोठ्ठंमोठ्ठं डोळं, बघण्याची न्यारी खुबी।
आंदूरावची मूर्त सदा डोळ्यासमूर उभी।

३ रुप्याचं ताट– त्यांत जिरेसाळीचा भात।
दौलूराव बसलं ज्येवाया त्यांचं गोरं गोरं हात।

कधी याहून पुढे जाऊन पतीला थोरथोर उपमा दिल्या जातात. अगदी चंद्रसूर्याच्यासुद्धा. उदा.

१ चंदनाचा पाट रुप्याचे ठसे, त्यावर रामराव बसे।
मला चंद्रावाणी दिसे अन् मी लाजल्याली बगुन चंद्रबी हसे।

भाताचं शेत ततं नंदाबाईचं चित्त
अन् या समद्यांत, जयाजीरावांचा बंगला ! तत्तंच जीव माझा रंगला ! !

अगदी झक्कास ! घरातल्या माणसांची व पतीच्या नावाची सगळी ही अशी यमकांत गुंफूनच पुढे मांडली तिने. छान वाटली. या थोडक्याशा लांब उखाण्याचे आणखी एक मजेदार उदाहरण. एका फटाकड्या मुलीने फट्कन नाव घेतले त्यातूनही नजरेस आले, ते नाव असे होते :–

रूणझुण जात होते। खिडकीवाटे पाहात होते !
समोर कचेरी दिसती ! कचेरीला लावले मोती !
पण खरे मोती कोणचे, कोणाचे ?
सासूबाईच्या पोटचे, नंदाबाईच्या पाठचे–
पण आता नव्हेत ते तुमचे– रूपा पाटील झाले आमचे ! !

खरं म्हणजे खेडूत सासुरवासिणीला मर्यादेचे बंध किती प्रकारचे असतात ! सासूसमोर मोठ्यानं बोलायचं नाही, जोडवी वाजू द्यायची नाहीत, वडीलधाऱ्यासमोर माथ्यावरचा पदर काढायचा नाही– फार काय, पतीशी कुणा मोठ्या वडीलधाऱ्यांसमोर बोलायचं पण नाही ! असले हे बंध ओलांडून त्या चिमुरडीने हा उखाणा सासू व इतर वडील बायकासमोर ऐटीने घेतला, त्याचे कौतुक सर्वांना वाटणारच !

अशा या उखाण्यांतून दोन गोष्टी स्पष्ट होतात, एकतर पतीचं नाव फार मोलाचं, ते उगीच येता जाता घ्यायचं नाही व नसतं हीही 'गंमत' एकदोघींनी उखाण्यातूनच सांगितली– मला मोऱ्यांची यसुदी म्हणाली–

चांदीची डबी, त्यात अत्तराचा बोळा।
इश्वासरावांचं नाव हाय, शंभर रुपये तोळा ।।

अन् आमच्या तान्ही भांडेवालीनं तर मला एकदा ठणकावून बजावले–

काचेची बरणी– त्यात साकरेचा पाक।
गोविंदरावाच्या नावाला पडत्यात रुपै लाख !

अबब ! लाख रुपये ! पण अर्थात् तान्ही माझी शेजारीणच, तेव्हा मला हे लाख रुपये माफ झाले असावे ! पतिचं नाव इतकं मोलाचं तर खुद्द 'पतिराज' घरधनि, कारभारी, हे केवढ्या तोलामोलाचे वाटत असतील

पत्नीला ? त्यांचे वर्णन उखाण्यातून येते– ते मोठे हार्दिक, इतकेच नव्हे, प्रीतीचा रंग लेवून उमटते ते ! ही दुसरी महत्त्वाची गोष्ट ! आता (शहरी संस्कार घडून) ग्रामीण उखाणेही पांढरपेशा स्त्रीच्या उखाण्याप्रमाणे बरेचदा दोन दोन ओळींचे झालेले दिसतात, तशा पद्धतीचे हे काही हृद्य उखाणे पतिवर्णनाचे आहेत– पहाणार का ?

१ पैशाला वांगी चार, त्येला मसाला हिरवागार।
धनी सर्जेराव, माझं खानारं शिलेदार।

२ तीसांची साडी, विसांचा पदर।
सदा पाटील निघालं भाईर, तर समद्या नारींची गुंतली नदर !

३ जवारीचं पीक, मोतियांचे दाणे।
भरल्या शेतातून जात्यात धनी शंभुराव राणे !

आणि या पतिवर्णनात जेव्हा का पतीच्या रूपाचे स्पष्ट उल्लेख येतात, तेव्हा जणु काही प्रीतीचा गुलाबी रंगच त्यावर चढला आहेसे वाटते! खरे म्हणजे पतीचे रूप ही चार चौघात मोठ्यानं बोलायची बाब थोडीच ! छे छे, लोक काय म्हणतील ? सासू-सासरे असल्या उद्धटपणाला माफ करणार नाहीत, कारण खेड्यातली मानमर्यादा सांभाळण्याची रीत ही अशीच! पण तरीही उखाण्यात पतीच्या रूपाचे वर्णन-अगदी उघड उघड वर्णन-लाजरी सून करते तेव्हा ते कुणी आक्षिप्त मानीत नाहीत, उलट खिलाडू वृत्तीनेच तिकडे पाहिले जाते हे विशेष. हे काही पतिच्या रूपवर्णनाचे उखाणे पहावे–

१ चालणं चटकदार, बोलणं फटकदार।
वर शेमल्याची अक्कड, मानाजीराव दिसत्यात कसं फक्कड।

२ मोठ्ठंमोठ्ठं डोळं, बघण्याची न्यारी खुबी।
आंदूरावची मूर्त सदा डोळ्यासमूर उभी।

३ रुप्याचं ताट– त्यांत जिरेसाळीचा भात।
दौलूराव बसलं ज्येवाया त्यांचं गोरं गोरं हात।

कधी याहून पुढे जाऊन पतीला थोरथोर उपमा दिल्या जातात. अगदी चंद्रसूर्याच्यासुद्धा. उदा.

१ चंदनाचा पाट रुप्याचे ठसे, त्यावर रामराव बसे।
मला चंद्रावाणी दिसे अन् मी लाजल्याली बगुन चंद्रबी हसे।

२ चांदीच्या थाळीत आंब्याच्या फाकी–
किसनरावच्या चेहऱ्यावर सूर्याची झ्याकी ।

एखादी सून, घरातल्या मानमर्यादा संभाळताना कसे गमतीचे प्रसंग घडून येतात याचेहो वर्णन मोठ्या चतुराईने उखाण्यातूनच करते, तोही नमुना बघण्याजोगाच. उदा–

१ गळ्यांत माळ लेवूं कशी ?
अन् सासूबाई बसल्या चुलीशी
तर रामरावांशी बोलू तरी कशी ?

२ आदघर मदघर करीत होते ताक
तिकडून आलं हंबीरराव, त्येनी धरला माझा हात
म्हनत्यात, चालचाल रानी– रंगमहालात !

३ आदघर मदघर, मदघरात हुतं हंडं,
मधल्या घरात होती परात
धनी शिरपती बसून ऱ्हायलं दारात
तर सांगा, मी कशी जाऊ घरात ।।

तर असे हे पतीनाम– त्याचा गौरव, त्याबद्दलचं प्रेम, त्याची थोरवी व पतीसंबंधात पाळायची मानमर्यादा याची ओळख आपण एवढा वेळ छान करून घेतली. आता या उखाण्यातल्या एका खास, गुणविशेषाकडे मी वळणार आहे. तो गुणविशेष आपल्याला अनोखी असला तरी जरूर वेधक आहे, ओठांवर ' एखादी तरी स्मितरेषा ' उमटवणारा तर आहेच आहे.

नेहमीच ग्रामीण भाषा म्हणजे सडेतोड अन रोखठोक बोलणं, उगीच आडपडद्यानं गुळमुळीत बोलायचं नाजूक तंत्र खेडूतांना जमणे नाही ! अर्थात हे वैशिष्ट्य मुलीबाळींच्या, स्त्रीच्या स्वभावातही असणारच, दिसणारच !

पण हा वृत्तिविशेष जेव्हा या छोटुकल्या उखाण्यातूनही प्रत्ययास येतो, तेव्हा मात्र नवल वाटते. एवढेच नव्हे; तर त्यांतून विनोदाचीही पखरण– कदाचित बालवधूंना नकळतही– होताना दिसते हे तर विशेषच ! एका सुदृढ आणि धिटुकल्या सासुरवासणीनं चटकन् उखाणा घेतलाच व सगळ्यांदेखत आम्हाला सांगून टाकलं–

समूर होता कोनाडा, त्यात होती खारीक ।
अवं, गनपतराव माझ्यापक्षांबी बारीक ! !

तर दुसरी म्हणाली–

दोनशांचा अंगरखा, त्येला शंभर रुपैचा खिसा
रंभाजीरावला न्हाई हिशोब येत, तुमी मलाच पुसा ।

तिसरीचा एक उखाणा आठवतो आहे तो असाच–

समूरच्या कोनाड्यात ठेवलं अंडं ।
म्हादबा माझ्यासंगं, बोंबलापायी भांडं ।

तर चवथीचं म्हणणं ऐका–

गेले होते परसांत, ततं होतं धलपट
लखूजीराव माझ्यापरास बी खनपट ।

हे छोट्या पोरीबाळींचे छोटे उखाणे ऐकून गंमत वाटायची व या अवखळ विनोदाने मनही कसं प्रसंन्न व्हायचं, पण त्याचवेळी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत आल्याविना राहत नसे, ती ही की या सगळ्या इटुकल्या पण धिटुकल्या नवविवाहिता ! बालविवाह अजूनही कोठेकोठे (दंड भरूनसुद्धा) खेड्यात होताना दिसतात. तेथे या मुलींचे 'घरधनी' म्हणजेही एवढा एवढालेच मुलगे. पती म्हणजे बरोबरचाच एक सवंगडी, त्याचे गुण सांगायचे तसे दोषही तक्रारीच्या सुरांत सांगितले तर कुठे बिघडते ? या बालीश वृत्तीनेच हे उखाणे अधिक आकर्षक झालेले दिसतात. एक लहानशी 'कार-भारीण' आपल्या बरोबरीच्या 'घरधन्याला' कशी धाक घालते आहे, पहा बरं जरा–

काडनी मोडनी तुरीची । खोल पायरी इहिरीची ।
सुभानराव ! चोळी आणा जरीची–।
न्हायतर भाकरी नाय मिळणार न्यारीची ।

आता या 'सुभानरावाला 'ला जरीची चोळी आणण्याचं 'भान' ठेवायलाच हवं ! अशीच, बाजारखेप पारूचे घरधनी करून आले. एकदा तर तिथे वेगळीच गंमत आली– ता पारूच्या शब्दांतच ऐकण्याजोगी आहे.

ती म्हणते–

छुन्‌छुन् छडी, जात हुते माडी.
धनी निघालं बाजारा, मी मागितली फुटाणी साडी
पर असं शंकरराव इसराळु, त्येंनी आनली बैलाची नाडी !

ऐकणाऱ्या स्त्रियांच्या गालाला खळी पडावी असाच हा प्रछन्न विनोद नाही काय ?

कधीकधी या वर्णनात, आणखी नवऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे काही विशेषही आदरून सांगितले जातात, तेही गमतीगमतीनेच. पुढील उखाणे पहा, हवे तर–

१ खंडीभर सुपारी, मोजून घ्या, मापून घ्या ।
पर शामराव, एवढा विड्यांचा नाद सोडून द्या ।
२ चांदीच्या ताटात फणसाचे गरे
चंदरराव हाईती बरे, पण मला नीट नांदवतील तवा खरे ।
३ समोरच्या कोनोडयांत लोणच्याची फोड ।
केशवरावाचं बोलनं मोठं गोड, पण लक्षन लई दोड
डोळं वटारायची लई खोड !

असे हे मजेदार उखाणे स्पष्ट स्पष्ट बोलून सांगितलेले, अर्थात यालाही एक दुसरी बाजू आहेच, ती म्हणजे बायको पुष्कळदा चांगली ठसकेबाज बोलते; वागते, तेही, उखाण्यातून व्यक्त झालेले आहेच उदा.

अल्याड शेत, पल्याड शेत, मधे वाळका गवताचा भारा ।
धनाजीराव मला चमक बांगडया भरा,
न्हाईतर दुसरी बायकू करा ।

का ? कसं आहे हे रोखठोक बोलणं ? क्षणभर मन स्तिमित होते की नाही ? या स्पष्टवक्तेपणानं मी अगदी चकित झाले. आपल्या नवऱ्याचे हे असे गुणदोष मध्यमवर्गीय स्त्री कधी असे चारचौघीत सांगेल म्हणता काय ? नावच नको. पण हा स्वभावच मुळी वेगळा !

वरील उखाणे नेणत्या मुलींनी घेतलेले. पण त्याहून स्त्रीपणाची, पत्नी-पदाची, जाण आलेल्या, प्रणयाची ओळख झालेल्या नवतरुण स्त्रियांचे उखाणे वेगळेच ! त्यातही हा ठसका व स्पष्टवक्तेपणा असतो, त्याला अधिक धार चढते. पलीकडच्या खंडेरावाला थोडा बाहेरचा नाद आहे हे सगळ्यांना

ठाऊक. त्याच्या बायकोला त्याच्या या वागण्याचा राग येणारच. तिनं चैत्रा-गौरीपुढे जमलेल्या स्त्रियांसमोर उखाणा घेतला–

वाटेवरचा हरबरा पानी जातंया झरझरा
खंडेराऊ जातात कळवंतणीच्या घरा !!
सासूबाय, तुमी नीट ताकीद करा,
न्हाईतर माझा राग न्हाई बरा !!

अन् यावर कुणीसं सहज म्हटलं– 'अग, अग, असं चारचौघांत सांगावं का ह्यो असलं, यमना ?'

यमनी त्यावर ताड्कन उसळून म्हणाली,

'मामीसाब, खरं बोलाया कुनाचं भ्या ? अन् इक्तं भाच्याचं कवतीक असलं तर असंच कराना :–

इकडुन येतो वारा, तिकडून येतो वारा ।
मधी पावसाच्या पडती धारा ।
खंडेराऊ निघालं कळवंतणीच्या घरा–
तर मामीसाब, तुमी जाऊन त्येंच्यावर अब्दागीर धरा !!

अन् यावर कुणाचाही शब्द उमटला नाही. कोण उत्तर देणार ?

याच प्रसंगी कान्होजी शिपायाची बायको जनी, हिनंही असाच ठसठशीत उखाणा घेतला–

चांदीची कुयरी, कुंकवात पडला राळा ।
आमचा कन्हूबा असा लई भोळा ।
की परनारीला येताजाता घाली डोळा ।

आता काय अधिक सांगावं ? मनात आलं, आमच्या सुशिक्षित संसारात ही बाहेरख्यालीपणाची उदाहरणं कमी नाहीत, व ही गोष्ट तेथे पत्नी जाणत नाही, असंही नाही, पण पतीवद्दल वर्णन करताना हे दपंत्यजीवनातले शल्य उखाण्यांतून प्रकट झालेले माझ्यातरी कुठे ऐकीवात नाही ! ती पत्नी पतीला देवरूप मानूनच वर्णन करील व पतीचा गौरव करणाराच उखाणा घेईल! त्या पार्श्वभूमीवर हे उखाणे अधिकच मनात ठसतात, हे तर खरे ?

तर असे हे जानपद उखाणे वा ग्रामीण उखाणे, यात पतीच्या गौरवाचे

उखाणेही भरपूर असतातच. त्यांचीही उदाहरणे वर दिलेली आहेतच. पण आणखीही यात स्पष्टवक्तेपणा, विनोद, जीवनदर्शन आणि व्यक्तिवर्णन करण्याची वेगळी तऱ्हा या गोष्टीही जरूर लक्षणीय आहेत. उखाण्यांचा प्रपंच असा विस्तृत, व विविधरंगी असा आजही खेडोपाडी सुखनैव नांदत असतो. त्याचे मूल्यमापन वाङमयीन टीकेच्या कसोटीवर करण्याऐवजी त्यातलं वैचित्र्य व रंजन हेच अधिक मोलाचं मानावं हेच उचित. आणखी एक. जनपद स्त्रीच्या नित्य जिभेवर खेळणार हे वाङमय ! त्यातली प्रसंग-निष्ठता व स्त्रीची भावशीलता, यांचे जे निसटते दर्शन घडते तेच अधिक हृद्य नाही का ?

★

७ : गीतरूपक

स्त्रीविरचित जुनी गाणी आपल्यापैकी पुष्कळांनी लहानपणी ऐकली असतील. देवळांत आरती संपल्यानंतर, पोथीपुराण आवरल्यावर, जुन्या पिढीच्या स्त्रियांनी गाणी म्हणायची पद्धत अनेक गावांतून होती, त्याला झाली पन्नास वर्षं. मुद्रिका, धांवे (द्रौपदीचे), चिंधी, गवळणी, सावित्री, माघस्नान अशी ती गाणी– त्याला फारशी गायकी नव्हती, रचनाही फारशी नीटनेटक्या शब्दांची नव्हेच. भक्तिभाव हाच त्यांचा एकमेव स्थायीभाव असायचा.

पण याच गीतांतून मला जेव्हा काहींशी वेगळ्या प्रकृतीची रचना आढळली, तेव्हा मन एकदम वेधून गेले, खडबडले, जागे झाले. अशी कोणती बरे ती अपरूप गाणी ? त्याला एक स्वतंत्र असे पारिभाषिक शब्दनामही नाहे– ' देहावरची गाणी. ' होय, देहाचेच सूक्ष्म वर्णन, पण नवकथेतले नव्हे, मुळीच नव्हे, तर वेदांतिक परिभाषेतले. अगदी देहमीलनाची वर्णनेसुद्धा या गाण्यांतून आलेली दिसतात. पण तीदेखील परमार्थाची शब्दकळा लेऊनच उतरलेली; हे नवल नव्हे काय ? होय, खरेच नवल. माजघर-स्वैंपाकघरा-पलीकडे वावर न होणाऱ्या कटुंबशील स्त्रीच्या मानसगीतातून परमार्थाची ओळख पटावी ? बरे, वेदान्त हा काही तसा सोपा व सहजगम्य विषय नव्हे, तरीहि या साध्यासुध्या स्त्रीकवयित्रींनी ' ज्ञात्याचे ते ठेवणे ' हातात घ्यावे,

प्रेमाने पाहावे, व जाणतेपणाने वर्णावे, याचे कौतुक करावे तेवढे थोडे ! त्या गीतांचीच थोडी ही ओळख– आध्यात्मिक रूपकांनी नटलेले तेच हे गीतरूपक– किंवा रूपकगीत.

*

या गीतांना प्रथम सुरुवात कशी झाली ? या गीताईचे बोल भाविक स्त्रीजनात रुजले, फुलले, बहरले, त्याचे मूळ कोठे होते ? हा एक प्रश्न अंतर्मनांत उठत होता, त्याला एका संत स्त्रीच्या रचनेतूनच उत्तर मिळाले. उदाहरणार्थ, ' जाते ' ही एक सामान्य संसारी वस्तु घरोघरी भूमीला खिळून, मांड ठोकून बसलेली. पण त्यावरही प्रतिभेचे लेणे चढलेले पुढील ओळींतून दिसेल :

सुंदर माझें जाते ग – बाई रामनाम गाते ग
जीवशिव दोन खुंटे – या जात्याला असती ग ।
कामक्रोध दाणे त्यांत– घरघर फार होते ग ।
बोधाच्या या परडीमधें– शांतिपीठ भरते ग ।

अरे वा ! हे जाते तसे काहीं सामान्य दिसत नाही, बरें का. ते पाषाण-हृदयी तर खास नव्हे, कारण जिवाशिवाचे खुंटे छातीवर पेलून धरणारे आहे ते–! त्याचे आणखी कर्तृत्व ऐका–

संचित दळण दळतांदळतां । श्रमल्या दोन्ही भुजा ग ।
चौऱ्यांशीचे फेरे फिरतां । स्थिर इथें झाले ग ।

ओहो ! यांत तर पारमार्थिकापेक्षांही विशाल, युगायुगांचाही दूरवर विचार करणारे द्रष्टचांचे मन प्रकटते आहे ?

अशी ही रचना एका स्त्रीचीच ? होय. पण ती कवयित्री सामान्य नव्हे. तिचा तसाच अधिकार आहे. कोण बरें ही अशी ? पुढील दोन ओळींत तिची ओळख पटेल.

जनी म्हणे जनार्दना– सोसेना हा जाच रे ।
धांव पाव अधोक्षजा– लावी मला हात रे ।

आतां बरोबर. ज्या दळणाला प्रत्यक्ष परमेशाची सोबत-संगत तेथे जात्याचे दगडी रूपही जाणीवेच्या फेऱ्यांनी फिरावे यांत नवल कसले ? जनाबाईने घालून दिलेली ही परमार्थगीतांची व्यवहारी शिकवण संसारी स्त्रियांनींही

पुढे अनुसरली– संसारपाश सुटल्यावर अगर प्रपंचांतून मनाने निवृत्त झाल्यानंतर अशा कल्पनांत उमाप गोडवा वाटून पुष्कळ स्त्रियांनींही अशी परमार्थपर गीते रचलेली दिसतात. यात दृष्टि विवेकाची, पण वर्णनसृष्टि आहे संसारीच ! ज्ञान वेदांताचे, पण शब्द घरगुती. रूप वैराग्याचे, पण रूपक मिळेल ते मात्र व्यवहारी गोष्टींचे. काही मजेदार नमुने पाहू या आणखी.

स्त्रीनिर्मित काव्य असो, कथा-कादंबरी असो, त्यात तिचे वैशिष्ट्ये ठळकपणे उठून दिसणारच–हा प्रत्यय या देहावरच्या गाण्यांतूनही पटतो. उदाहरणार्थ, संसारनिष्ठता हा स्त्रीचा स्वभावधर्मच– इतरांना स्वादिष्ट भोजन घालून तृप्त करणारी अन्नपूर्णा तिच्या मनीमानसी सदैव वसत असलेली– वयपरत्वे वैराग्य येते पण ते आले, मनाने मोक्षाची वाट धरली तरी वृत्तीतली अन्नपूर्णा कायम उभीच राहिलेली दिसते.

याचीच साक्ष काही अजब रूपके देतात. उदा० चहा हे दैनंदिन आवडीचे व आवश्यक असे एक आधुनिक पेय– वर्षानुवर्ष आपुलकीने चहा केला– मग मोक्षमार्गातही त्याची आठवण का नको ? भक्तिभावाने देवालाही का बरे कपभर चहा द्यायचा नाही ? या कल्पनेने एका वेदान्तभक्त स्त्रीने चहा बनवला आहे तो किती लज्जतदार आहे, पाहा तरी. ही स्त्री देवाला चहा घेण्याबद्दल प्रार्थना करते आहे–

मनमोहना– राजीवनयना, घेई थोडा चहा ।
वैराग्य शेगडी फुलवी– शुद्ध सत्त्व उदक वर ठेवी ।
मधुबोल शर्करा बरवी– झांकण मौंनाचे पहा !

आणि या चहाला एवढा मनोहर रंग कशाने आला, तेही पुढील ओळीतून स्पष्ट झाले आहे–

रज तम सत्त्व मिसळूनी– बनविला बहुही जपुनी ।
सकल प्रवृत्तीस गाळुनी– निवृत्तीस रंग येत हा !

आणि दूध होते की नाही चहासाठी ? वा, होते तर–'

रामनाम दुग्ध उकळिले– मनतरंगी ते हालविले
भक्तीचे भरले प्याले– अर्पण तुजला भावे केले !
आतां मनमोहना– घेई थोडा चहा ।।

हा असा भक्तिसुंदर चहा घेऊन ईश्वरासही नवी प्रसन्नता आल्यावाचून नाही राहणार खरीच. आणखी एक गंमत पाहा– देवाला चहा दिला, मग त्यानंतर विडा नको का ? तो नाही दिला तर अतिथिधर्माला जरूर उणेपण दिसणार. पण एक आहे, हा विडाही त्या चहाला शोभून दिसणाराच, तो काही साधासुधा नव्हे. विड्याची पाने आणून ती मऊ व ताजी राहण्यासाठी फडक्यात गुंडाळून ठेवावी लागतात. तेथपासून झाली या वैराग्यविड्याची मिजास सुरू !

शांतिवस्त्रामाजि– मृदु, पीत पाने– नागवेली ।
अहंभाव जाळुनिया केली सत्त्व चुनकळी ।
मायेची सुपारी, ऐक्य शस्त्रे फोडियली ।
ज्ञानलवंगा उपरी भावार्थ कातगोळी ।
प्रेम जायपत्री वरी– वैराग्याच्या जायफळी ।

असा हा राजस विडा किती वेगळा ! याची रंगत केवळ ओठापुरतीच राहणारी नव्हे, तर हृदयासही विवेकाचे रंग चढवण्याचे सामर्थ्य दिसते ह्याचे.

असेच, ' अधिकमासाचे महात्म्य ' नावाचे एक, देहावरचेच, पण झकासगीत आहे, तेही पाहू. मराठी वर्षगणनेत ' अधिक महिना ' (याला पुरुषोत्तम महिना ' असेही एक नाव आहे.) तीन वर्षांनी एकदा येतो. जुन्या धार्मिक स्त्रीविश्वात त्याला काही विशेष महत्त्व दिले गेले आहे. या महिन्यात नूतन जामातास तेहतीस अनरशांचे वाण सासुबाईनी द्यावयाचे असाहि एक रम्य व ' मधुर ' धर्मसंकेत असे. पण समजा, एखाद्या स्त्रीला जावईच नसेल. तर मग ? जावयाऐवजी सत्पात्र ब्राह्मणालाही हे दान दिले तरी चालते व अधिकमासाचे अधिकतर पुण्य जोडता येते असाही पर्याय होता. आजही कोठेकोठे हा धर्मसंकेत पाळला जातो. तर अशा या ' अधिक ' महिन्यावर रचले गेलेले हे ' रूपकगीत 'ही पहाण्यालायकच. समजा की घरांत शतदारिद्र्य आहे. तेथे हे तेहतीस अनरसे पैशाभावी कसे करावे ? त्याला तूप गूळ तांदुळ सगळेच लागते– ! किंवा एकादी स्त्री मनाने विरक्त झाली असेल व देवभक्तीतच रमत असेल तर ? तिलाही या खाद्यदानात कांही महत्त्व वाटणारे नाही. तर अशा ठिकाणी ' भक्तीचे

व मानसिक ' अनरसेही करता येतील व ते अवश्य करावे ' असे या गीतात सांगितले आहे. कसे करायचे हे ' पारमार्थिक ' अनरसे ? तेही या गीतात संपूर्ण पाककृती देऊन सांगितलेले दिसते, खास फार पूर्वीच्या एखाद्या ' सुगरण ' कवायित्रीने ही रचना केली आहे हेही पटवून देणारी अशीच ही रचना. पहा बरे हे गीत

अगणित श्रीहरिनामाचे तांदुळ घ्यावे, । मोहाच्या उखळी कुटावे ।।
मधुशर्करा प्रीतीची त्यां मिसळोनी– । मग भक्तीजली भिजवावे ।।
मनतरंग लावुन खसखस, त्यां थापावे । हृदयाच्या ताटी बरवे ।।
सन्मतिच्या कढइत बरवे ।
सद्विचार धृत घालावे ।
षड्रिपु काष्ठ जाळावे ।
निदिध्यास जाळ हा प्रज्वळ, लावुनि त्याला ।।
झणि तळा अनरसियाला ।। १ ।।

पाहिलेत ना किती सुंदर गीतरूपक रचले गेले आहेत ते ? ' तांदुळ आधी उच्चदर्जाचे, मनतरंग किती सूक्ष्म– जसे खसखसीचे नाजुक सूक्ष्म दाणेच. अन् ताट हृदयाचे ! हे सर्वांगीण उपमान निश्चित कौतुक करण्यासारखेच नव्हे काय ? बरे, तूप आणि तळणी ? तीही या ' परमार्थ भाषेतल्याच नामाने सजलेली ! तर अशी हे गीते किती नवलाईची वाटतात ! स्त्रीच्या-वृत्तीत सदैव जागृत असलेली संसारनिष्ठता व पाककुशलता – आणि भक्तीचा वेगळाच भाव, यांची ही मिसळण कल्पकतेची साक्ष देणारी तर वाटतेच; पण त्या उत्कृष्ट अनरशांसारखी ही मधुर अन् खुसखुशीतही आहे हे ' रसिक ' वाचकांना सांगायलाच का हवे ?

पौषाची थंड पावले थंडीचा शहारा उठवीत आली की घरोघर तिळावरही गोड काटा उठू लागतो. स्वयंपाकाबरोबर साखरेचा पाकही चुलीवर चढतो ! अर्थात् प्रपंचिकेप्रमाणे विरागिनीलाही ही हलव्याची ओढ असायचीच. पण तिचा हा हलवा जरासा वैशिष्ट्यपूर्ण आहे. साध्या डोळ्यांना दिसण्याजोगा नाही तो, पण ज्ञानचक्षूंनी दिसेल. हा हलवा कसा तयार झाला बरे ? कवयित्री म्हणते–

हृदयशेगडीमाजि कोळसे– अहंवृद्धिचे घालुन खासे
हरिचिंतन मंदाग्नी विलसे– मन कढई योग्यचि याला ।

झाली रूपकाला सुरवात. हृदयाला आजवर हृत्कमल, हृदयवीणा, हृन्मंदिर वगैरे वगैरे सारख्या राजस व लोभस उपमा वारंवार दिल्या गेल्या, पण या जळत्या शेगडीची उपमा किती ज्वलंत आहे ! अन् या शेगडीला साजेसे कोळसे पण आहेत इथे. फरक एवढाच की, हे कोळसे जळता जळत नाहीत ! असल्या या शेगडीवर पाक चढवल्यावर पुढे काय बरे ?

हरिनामाचे तीळ स्नेहांकित, भक्तिशर्करा पाकें मंडित
दृढनिश्चय– हातें हलवित ।
सन्मतिचा कांटा उठला । सुप्रेमे मुखिं घाला ।

असा हा हलवा. त्याला भावभक्तीचा रंग, आणि पारमार्थिक गोडवा असलेला कोणाला नको वाटेल ? स्त्रीचा सुग्रणपणा मोक्षप्रांतातही असा उमटून दिसतो हेच विशेष.

*

पाककुशलतेप्रमाणे स्त्रीला साहजिकच अलंकाराचेही मोठे आकर्षण पण ते या देहावरच्या गाण्यांतूनही प्रकटावे हे नवल नाही का ? हे दागिने देखील किती तऱ्हेतऱ्हेचे आहेत, पाहता ? आणि हे दिले कोणी ? तेही ऐका–

निर्गुणपुरचा सद्गुरु जो हरि, देखियला नयनी ।
जडाव कोंदण नग हे मजला, दिधलेसे त्यांनी ।।
श्रद्धा–मोती गुंफुन जाळी, मस्तकिं रेखोनी ।
समाधि मोहनमाळ दुल्लडी–झळके तन्मनी ।
शुद्धसत्त्व हा चितांग सुंदर, कंठी, शोभे फुलवेणी ।
महावाक्यांच्या पंखेबाळ्या ल्यालें मी श्रवणीं ।।

काय ? कशी काय आहे बरे ही दागिन्यांची शोभा ? हे सगळेच– चितांग, दुल्लडी, पंखेबाळ्या इत्यादि अलंकार बरेच जुन्या घडाईचे वाटतात व खरोखरच ते सव्वाशे वर्षांपूर्वीचे आहेतही. असेनात ? पण ते दागिने सुंदर आहेत आणि त्यांतून नवविधा भक्तीचे काही चमकदार पैलू दृष्टीस पडतात हे तरी मान्य आहे ना ?

अर्थात् वैराग्याचे हे रूपक केवळ दागदागिन्यांनीच अलंकृत झाले आहे

असे मात्र नव्हे. अनेक दुसरीही उपमा–उपमाने त्यांतून नजरेत भरण्याएवढी मौलिक आहेत. उदाहरणार्थ, दागिन्यांप्रमाणे कपड्यांचाही शौक स्त्रीजनाला विशेष नसतो काय ? सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी नऊ तुकड्यांची चोळी हीच ' ब्लाउज-पोलक्यांच्या जगातली ' फार मोठी व एकमेव सुधारणा होती. पण अध्यात्मिक भाषेतही ही ' चोळी ' यावी ही केवढी नवलाची गोष्ट ! आणि हे नवल वाचकांनाच नव्हे तर स्वतः रचयित्रीलाही वाटते आहे. कारण तशाच अपूर्वाईची जडणघडण आहे या चोळीची ! कवयित्री म्हणते–

काय सांगू सखे नवल ? ही श्रीगुरूची करणी
चिद्रूपाची चोळी मजला दिधली बेतोनी ।

आता ' चिद्रूप चोळी ' म्हटल्यानंतर त्याला घेतलेले रेशीम, त्याची नक्षी, सुई, कशीदा या सर्वांवरच रूपकाचे काही न्यारे, गहिरे रंग चढावे हे अगदी क्रमप्राप्तच. या चिद्रूप चोळीचे वर्णन पाहा–

पंचरंगि हें रेशिम सुंदर, केलीसे अटणी
नवविध तुकडे प्रेम–सुईनें केली उभारणी
भावकशीदा विवेक–भिंगे केलीसे जडणी
तन्मय झाले चिन्मय ऐशि ही चोळी लेवोनी
सखे ही सद्गुरुची करणी–।।

' विवेकाचे आरसे व नवविधा भक्तीचे नऊ तुकडे जडवून असली ही ' चिन्मय ' चोळी शिवून घेणे व वापरणे सामान्य काम नव्हे !

स्त्रीजन्माची सफलता कशात आहे बरे ? तिची कूस उजळावी, अपत्य व्हावे यातच, खरे ना ? परमार्थपर विचार संसारनिवृत्त स्त्रीमनात आले तरी त्यातूनही ही अपत्य स्नेहाची धारा डोगर-कडे फोडून झुळझुळणाऱ्या निर्झरिणीसारखी दृश्य होतेच. आणि मग ' देहावरचे डोहाळे ' अशा प्रकारची परमार्थ गीतेही निर्माण होतात. देहावरचे डोहाळे ! ओहो, लाक्षणिक अर्थाने खरे आणि शब्दशः पाहिले तरीहि अगदी खरे ! परमार्थात, निवृत्तिमार्गातही स्त्रीला दोहदलहरी होतात ? होतात, पण त्यांचे रूपच निराळे. एका मुमुक्षु स्त्रीला असेच अपूर्व डोहाळे लागले आहेत. त्याचे हे रम्य शब्दचित्र पाहण्यासारखे आहे. डोहाळे कसले ? तर माहेरी जाण्याचे; अन् हे माहेर कोणते, लक्षात येते का ? मोक्षाचे माहेर बरे. परमार्थात बहुधा सद्गुरूला मातृस्थान

कल्पिलेले असतेच आणि आईजवळ आपल्या इच्छा सांगायच्या नाहीत तर कुठे ?. एक स्त्री आपल्या या मातेला म्हणते–

डोहाळे पुरवी ग– माझे सद्‌गुरु आई
पुरे ग भवसासर– मजला माहेरा नेई ।
अज्ञान वांझपण माझे– हरपुनि गेलें
ज्ञानगर्भ फल माझे उदरासी आलें ।–

असले लोकविलक्षण डोहाळे लागले, मग शृंगारसाजहि तसाच नको का ? तो असा हवा–

शांति साडी, भक्ति चोळी, क्षमा शाल द्यावी
दम शम काजळ–कुंकू, मस्तकीं त्रिगुण–फुलें ल्यावीं ।
कंठी नाम–गळेसरी–हार विवेकाचे
पायीं पैंजण; वाळे-तोरड कामक्रोधाचे ।
हेंच मला देई ! डोहाळे पुरवी, सद्‌गुरु आई ।।

असे हे परमोच्च डोहाळे लागायचे एखादीलाच व ते पुरे होण्याच भाग्यही हजारांतून एखादीचेच !

डोहाळचा–सोहाळचांच्या या तपशिलात मोक्षमाहेराचे नाव निसुटते आले आहे. मग सासर कोणते ? होय, नवलाची गोष्ट अशी की, अध्यात्मिक जीवनातही स्त्रीला सासर दिसते, सासर–माहेरच्या ऊन–सावलीत सर स्त्रीत्व फुलते, वाढते, त्याचा विसर विरागी झालेल्या मनालाही पडू शकत नाही. मात्र एकचएक साम्य या सर्व दैहिक गीतांत त्यासंबंधी आहे. ते म्हणजे माहेर हे सायुज्यपद आणि सासर म्हणजे भवसागर ह्याच कल्पनेचे ! सायुज्यपदाला मूळघर, निजघर, मायघर अशी गोड गोड नावे, तर सासरला मनसोक्त शिव्याशाप (हेहि स्त्रीस्वभानुवारूपच !) हाही प्रकार आढळतो. सद्‌गुरूला आई म्हटले, मग छळणारी सासू कोणती ? तर कल्पना ! अशा या मानवी सासरी इतरही बरेच छळवादी आप्त आहेत. त्यामुळे सासुरवासाला कंटाळून आईजवळ चाललेली तक्रार पाहण्यालायक आहे. कोणकोण मंडळी आहेत सासरी ? ऐका–

सासु कल्पना फार छळीते जळो तिचे घर ।
सासरा माझा अहंकार ।

या आशा–मनिषा जावा, करिती हेळणा ।
ही तृष्णा नणंद बाई दावित खुणा ।
हा प्रपंच पति ग बाई काही बोलेना ।
काच हा मजसि सोसवेना ।

कसे सासर ऐटदार आहे नाही ? यांतून गरीब सून निसटून जाणे महा-दुस्तर अन् म्हणूनच तर तक्रार ! माहेरचेही आप्त प्रसंगविशेषी उल्लेखित झाले आहेत.

उदाहरणार्थ, परमार्थपुराला जाताना एका स्त्रीची मोठी धांदल उडालेली दिसते. पूर्वी प्रवास एकट्या–दुकट्या बायकांनी करायची सोय होती थोडीच ? मग असल्या प्रवासात सोबत ही हवीच. कोण होती सोबतीला माणसं ? अगदी माहेरचीच– पण वेगळ्या वृत्तीची होती ती– पहा ना !

जाते परमार्थपुराला– कशी जाऊं एकटी ?–
पदरी बांधुनि रामनाम बळकट ब्रह्मगांठी ।
आतां नाही म्हणत मी, जाऊं कशी एकली
मज संगे शांति–बुद्धि बहीण येते भली ।
बोधपुत्र हा संगे, धरिला मी मनगटीं
वडिल बंधु–विवेक, साथी–वहीण मी धाकटी
नाही मी एकटी–

मागे सासरच्या मंडळींचा उल्लेख आला आहे, त्या आशा–मनीषा, तृष्णा, कल्पना, अहंकार इत्यादि सासरकरांच्या तुलनेने ही माहेरची मंडळी– शांतिबुद्धि अन् विवेक इत्यादी. किती विरोधी वृत्तीची. फक्त यात लहानसा पुत्र ' बोध ' आहे तो या दोन्ही कुलांतला दुवाच म्हणायचा !

आणखी काहीशा वेगळ्या वाणाची गीते पाहू. यातला वर्णित भाव अगदी आगळाच पण मन स्तिमित करणारा दिसून येतो. उदाहरणार्थ, सुशीलता हे सद्गुणी स्त्रीचे सर्वश्रेष्ठ लेणेच. परपुरुषाचे चिंतन, स्मरण सारेच पति-व्रतेला हलाहलासारखे विषारी वाटते. पण लहान मुलाला जे नको म्हणावे ते तो हट्टाने करतो, तद्वत् या रूढ नीतीच्या लक्ष्मणरेषा मुद्दाम मोडण्याचा खोडकर चाळाहि या परमार्थविवेकात कोठे कोठे मनाने आवर्जून केलेला दिसतो. अरे ! परपुरुषसंग ? पण तो कल्पनेतलाच, शिवाय रूपकात्मक !

आणि म्हणूनच अधिक वेधक वाटणारा ! त्याची वर्णने उघड उघड आहेत, निस्संगपणाने केली आहेत व त्यांतील शृंगारभाव तर अवश्य दर्शविले आहेत तेहि निःसंकोचपणाने. उदाहरणार्थ, पुढील रचना पाहा, एक स्त्री म्हणते–

चैन पडेना उघड बोलतां नये कुणापाशीं ।
काय सांगूं सये बाई ! रतले परपुरुषाशीं ।

केवढी लज्जास्पद गोष्ट– अन् ती अशी मोकळ्या मनानं वर्णायची म्हणजे काय ? पण याहून पुढची वर्णनाची पायरी ऐकण्याजोगी आहे. ही कामोत्कट स्त्री सांगते– सखे, पुढे काय झाले ते ऐक.

संकल्पाची फेडुनि साडी झाले मी उघडी
ममता चोळी टाकुनि सखये घातलीसे फुगडी
त्रिगुण मताची वेणी उकलुन–कामचुडा फेडी
मग नेत्रीं लेइलें उन्मनींचें काजळ
त्यानें फिटून भ्रांती–दृष्टी हो सोज्वळ
मग दिसूं लागली आत्मज्योति निर्मळ
आत्मप्रकाशें पहातसे ग, त्या परपुरुषापाशीं
बोलतां नये कुणापाशीं ।।

हे तर उघड उघड देहमीलनाचे वर्णन– अर्थात् हे सांगतानाही थोडीबहुत खंत वाटतेच आहे व ती स्वतःच्या उर्मटपणाचीच आहे ! त्याचा हा प्रांजल उल्लेख पाहा–

बाई मी माणुसपणावेगळी–झाले पिसाट ।
प्रपंच न रुचे म्हणुनि धरली अशी आडवाट ।

पिसाटपणाची ही ग्वाही विवेकशील मनाला मात्र परमार्थाचीच ग्वाही देणारी दिसते ! परपुरुष ! परात्पर परमात्मा हाच तो दिव्यदेहधारी प्रियकर अन् त्याच्यासाठी ऐहिकाची आस सोडायची, देवत्वात विलीन व्हायचे, मायाममतेतून मुक्त व्हायचे– सगळीच कल्पना मनोज्ञ– खरे म्हटले तर ही विषयवर्णनाची रचना, शब्द व रूपक भलताच वेगळा भाव दाखवणारे पण आतला भाव किती वेगळा ? देहमीलनाची ती अद्वैतावस्था तशी हीसुद्धा एकप्रकारे अद्वैतावस्थाच ! पण वर्णनात केवढा फरक ! आणि स्त्रीरचित पद्यातून हे ' मीलन चित्र ' वर्णिले गेले तेही स्वतंत्रपणे नव्हेच– एकनाथांच्या

भारुडातून अगदी याच आशयाची पद्ये आहेत, त्यातूनच प्रेरणा मिळून ही गाणी प्रतिभेने साकार केली असावी असे दिसते.

या शृंगारिक भासणाऱ्या वर्णनासारखीच 'दैहिक पूजेची' गाणीहि बरीच आढळतात. तेथे भक्तिरसाचा अधिकच परिपोष झालेला दिसतो. देहपूजेत तसे पाहिले तर सगळेच भोगवादी जग तन्मय झालेले दिसते. देहासाठीच वस्त्रेप्रावरणे, गंधसुगंध, षड्रस, इत्यादि उपायने– पण ही 'देहावरची गाणी' असली तरी देखील यांतील 'दैहिकपूजा' ही वर दिलेल्या प्रकारची नाही, ती अगदीच वेगळी आहे. ही देहपूजा म्हणजे स्वतःच्या देहाची पूजा नव्हे तर देहाने केलेली परात्पराची परमात्म्याची पूजा असते, तेव्हा हे पूजोपायनहि त्याच तऱ्हेचे अगदीच आगळे. पहा–

मी देहताटी पंचप्राण ठेविले ।
आयुष्यवात, ज्ञानधृतासहित उजळिले
त्यजुनि पंचविषय, त्रिगुण षड्रिपु भले
अज्ञाना जाळुनि या कर्पुरा लाविले ।

पूर्वीच्या जुन्या बायकांत वाती करण्याचा छंद असे. त्यांत एक साडतीन हात सुताची व साडेतीनशे फेऱ्यांची 'देहवात' म्हणूनही एक प्रकार असे, त्याचीच आठवण येते. वरील 'दिव्याचे' वर्णन वाचून !

काही स्थूल व मोठ्या उपमांचाही वापर यात केला गेला आहे. उदाहरणार्थ, 'भवसागर, हा शब्द नेहमी कानावर येतो. यातून तरून जाण्यास तरी ऊर्फ नाव ही 'असलीच' हवी. भीष्म बाणशय्येवर निजल्यावर त्यांना तहान लागली होती ती बाणांनेच खेचून आणलेल्या जलधारांची– नव्हे काय ? तसाच हा प्रकार. ही नावही या दैहिक गाण्यांत आहे– साधीसुधी नव्हे. अगदी साग्रसंगीत रूपक, पाहून घ्या. नाव तयार करायला अनेक तऱ्हेची सामग्री लागते तीही सिद्ध असते इथे–

पंचतत्त्वाचे गुण पंचवीस– करुनि आकार
चौदा तत्त्वे बावन्न फळ्या– केली नाव तय्यार
वर दंभाची शिडी उभारुनि त्रिगुणाचा दोर
अहंभावाची डोलकाठी, डळमळते पाही
जिकडे मन हा वायु धावे– तिकडे नौका जाई ।

अशी ही नाव – आणि ज्या जलप्रवाहातून हिचा प्रवास व्हायचा, तो कसा आहे बरं ? भारी भारीच कठीण. यांत संकटं आहेत, नक्र आहेत, डोह आहेत, अन् भोवरे पण ! ऐकता ?

जीव शीव या दोन्ही थडी – मधें मोहपूर नगरी
संशयपाणी खोल भासते – कोण अंत करी ?
लोभ-नक्र हा चरणिं झोंबतो सोडीना मुळीही
नाव बुडवितो कसा भोवरा – मायेच्या डोही
देहनौका सागरी बुडते ! साधन करूं काई ?

अशी विलक्षण देहनौका चालवणे हे कठीण व तिची ही परमार्थाच्या विशिष्ट भाषेतली रचना कळणे त्याहूनही दुर्घट– पण कविमनांची उत्तुंग झेप दाखवण्यास ती समर्थ आहे खास.

या नौकेप्रमाणेच आणखी एक अत्याधुनिक वाहन या भवमार्गातही चालू असलेले पाहण्यात आले. ते म्हणजे आगगाडी– परमार्थमार्ग किती दूरचा ! त्यांत अग्निरथाचं साह्य मिळालं तर उत्तमच, नाही काय ? कल्पना आधुनिक पण वर्णन सनातन, असे हे रूपक विरोधाभासाने खुलणारेच– पाहा ही आगगाडी कोठली नि कशी चाललीय् ती–

सद्गुरुकृपेची आगगाडी चालली– गाडी चालली ।
चारी चाके मनोहर । बत्तीस डब्यांचा, आकार तारा
रोविल्या, रोविल्या ।।
जीव शीव दोन्ही रुळांवरुनी । चारी देहाच्या मधुनी
उन्मनि कांच तिला लावुनी, बत्ती लावली, लावली ।
फोडुनि सूक्ष्माचा घाट – चारी बोगदे कोरले त्यांत
तीनशेंसाठ सांध्यांतुनी – गाडी चालली – चालली ।।

एकदा वेदांताची ही गाडी सुरू झाली की तिचा वेग काय विचारावा ?

गाडी चाले दणा दणा – घंटा वाजे खणाखणा
मोक्षाचे, पूर्वजन्मींचे काढले तिकिट – सद्गुरु आमचे ऐसे धीट !

अन् मग स्टेशन येणारच ! गाडीचा वेग मंदावतो– उतरण्याची मोक्ष वेळा येते, गाडी थांबते– एकदम वेग आक्रसतोच–

गार्डर पोर्टर ते आले – तिकिट मास्तर धावले

त्यांनी दिला थोडा सिग्नल – गाडी थांबली थांबली– ।।

अशी ही आगगाडी पाहायला सुंदर तर आहेच, बुद्धीला जरूर ऐहिकापलीकडे नेणारी तर खरीच, पण परमार्थमार्गात यांत्रिक वाहनांनाही मज्जाव नाही हे सिद्ध करणारीही आहे ती. गार्ड, पोर्टर, तिकिट इत्यादि इंग्रजी शब्द व मोक्षमार्ग या दोहोंची सांगड जेवढी नवी तेवढी चमत्कृतिपूर्ण !

'स्मृतिचित्रे' लिहिणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक यांनी रचलेली पुढील कविता अगदी या दैहिक गाण्यांतच साजून दिसणारी आहे की नाही पाहा बरे–

आशा, मनीषा, तृष्णा, जावा या माझ्या तिघीजणी
ममता सासू करी ती माझ्या जीवाची खेळणी
हा क्रोध खाटिक– सुरा
हा निर्दय मम सासरा
नाही विसावा षड्रिपुहि गांजिती रात्रंदिनीं
तरी नच पाही विवेक पती ढुंकुनी ।।

एकंदरीत या परमार्थसंसारांतही सर्व सांकेतिक नाती अगदी ठरलेलीच दिसतात– आशा व मनीषा यांना जावांचीच उपमा कटाक्षाने वापरलेली दिसते. जावा बरोबर राहतात, नित्य सहवास असूनही प्रेमभाव असणे मात्र मुष्कीलच, हा तर गूढ अर्थ यांतून अभिप्रेत नसेल ना ? असेच आणखी एक उदाहरण पाहा– 'मानसगीतसरोवर' हे स्त्री गीतांचे पुस्तक ५०-६० वर्षांपूर्वी लोकप्रिय होते. त्याच्या कर्तीने अत्याधुनिक रूपक या परमार्थविचाराला दिले तेही वाचनीय ठरेल. नाटक आपण पूर्वीपासून पाहात आलो, पण कवयित्रीने नाटक पाहिले ते वेगळेच– ज्ञानचक्षूंनी दिसणारे. मिटल्या अंतःचक्षूंना जागृत करणारे– कसे, कोणते होते हे नाटक ? थिएटर कोणते ? सूत्रधार होते काय ? नवीच कंपनी होती वाटतं ? होय, सगळे होते, ही तर पूर्णोपमा दिसते आहे. कवयित्री म्हणते–

कंपनीकार कोण न कळे । 'काल' रात्रीचे संगीत नाटक
अति उत्तम झाले ।
हातीं म्यां कर्मतिकीट धरले– नरदेहाची रांग पाहिली

त्या खुर्चीवरी बसले !
थेटरा पाहुनि मन रमले– ' विश्वात्मक ' हे नांव पाहुनी
मन रमले ॥

यातले तिकीट, कंपनी, थिएटर इत्यादी शब्द म्हणजे कोणी आंग्ल युवती आपल्याकडच्या देवळात देवदर्शनास फ्रॉक घालून याव्या, तसे परकेसे वाटतात हे खरे; पण एवढा गौण मुद्दा बाजूस ठेवून पाहिले तर पुढील वर्णन अधिक सापेक्ष व वस्तुनिष्ठ दिसेल– पाहा, नाटक सुरू झाले, आणि जुन्या नाट्यपद्धतीस अनुसरून सूत्रधार व पारिपार्श्वकहि आले आहेत–

वाजली अहं ब्रह्मघंटा । अहंकार हा सूत्रधार तो लाविसे तंटा ॥
प्रथम ते तीन पुरुष आले । सात्त्विक राजस तामस ते ॥
ब्रह्मा विष्णु शंकर गमते । तयांनी केलि पंचभूते ।
त्यामधि ' षड्राक्षस ' होते । नवरी ' वासना ' जिकायाची
करिती खटपट ते ॥ संगे, जीव जिये भुलले–।
' काल ' रात्रीचे संगीत नाटक अतिउत्तम झाले ॥ १ ॥

अर्थात रचनेच्या दृष्टीने हे ' नाटक ' अतिउत्तम नाही, मान्य; पण त्यातले हे पूर्ण रूपक नाविन्यपूर्ण नाही काय ? शिवाय एका निराळ्या अध्यात्मिक दृष्टीने हे वर्णन करण्यातही ही मागल्या पिढीची रचयित्री यशस्विनी झाली आहे, यात संदेह नाही.

*

तर अशी ही जुनी स्त्रीगीते. रचना साधीसुधी– पण आध्यात्मिक. आणि त्यातला परमार्थाचा, पारलौकिक हिताचा दृष्टीकोन साधासुधा नव्हे. उलट या स्त्रीगीतांनी मनात कोठली तरी एक अबोध ओढ जाणवू लागते. आपले अंतिम व आत्मिक उन्नतीचे ध्येय, या साऱ्या ऐहिकापलीकडच्या एकाद्या उदात्तमनोहर नगरीत आहेसे वाटते ! त्या अबोध मार्गावरच्या वाटाड्याचे रूप घेऊन हे गीतरूपक ठायीठायी प्रकटलेले दिसते तेव्हा संसारयात्रेत रमलेल्या मनाला ' माहेरचे मूळ ' आल्याचाच भास होतो व या वाटाड्यांचे बोट धरून आपणही हा जाणीवेचा मार्ग धरावा अशी प्रबल इच्छा होते ! हे यांचे सामर्थ्य लहानसान थोडेच ?

★

८ : असे हे संगीत रंगीत रुखवत

कोठेही पहा, लग्नसमारंभ म्हटला म्हणजे वऱ्हाडी वाजंत्री, पै-पाहुणे, मेजवान्या, वधुवरांचे फोटो, आमोद प्रमोद, इत्यादीनी तो गाजत असतोच– अगदी अलीकडचे बारा तासांत होणारे ते मंगलकार्यालयातले सुटसुटीत व आखीव विवाहसमारंभ घेतले तरी त्यात उत्सव, जल्लोष, हर्षोत्कट बोलणी वगैरे वरील वऱ्हाडीजनासारखीच असणार व हौसेमौजेला भरती येणार हे ठरलेलेच.

ही झाली आजकालच्या शहरांतून मंगलकार्यालयातून होणाऱ्या विवाहाची गोष्ट; पण खेडचापाडचातून हे विवाहसमारंभ असेच त्रुटित वा सुटसुटीत झाले आहेत काय ? मुळीच नाही. तेथे मिरवणुका, बाशिंगे, हळद लागणे 'पाणी न्हाणे' वधुवरांचे स्नान व अनेक लग्नविधी, होमहवन, जेवणावळी– हे सारे पूर्वीच्या पद्धतीनुसारच अजून चालते. तुम्ही मराठमोळा विवाहांना कधी हजर राहिला असाल तर या गोड गोंधळात आणखीही एक मस्त मजेदार समारंभ मिसळलेला असतो– रुखवताची गाणी वा उखाणे म्हणण्याचा. तो तुम्हाला मोठा रोचक व ओठांत स्मित फुलवणारा असाच वाटला असेल ! असतोच तो तसा. आमच्यासारख्यांना तर हे रुखवताचे सारे साहित्य साहित्यिक दृष्टीकोनातूनही विशेष लक्षणीय व श्रवणीय वाटते ! त्यासंबंधीच आज थोडे विवेचन करावेसे मला वाटते आहे.

●

खरोखरच ग्रामीण जगात, लग्नातील 'रुखवत' हे एक मोठेच 'प्रकरण' असते, साधे नव्हे, चांगले ठसठशीत व मंडप दणाणून टाकील असे प्रभावी, आणि तेही वैपुल्याने असते, हे विशेष. त्यातही दोनतीन प्रकार. एक रुखवताच्या उखाण्यांचा.

या पुस्तकातच अन्य ठिकाणी, एका लेखात मी वधूरांचे ग्रामीण (जानपद) उखाणे (पतीचे नाव उखाण्यात सांगण्याच्या पद्धतीचे) वाचकांना परिचित करून दिलेले आहेतच, ' तसेच हेही पतीच्या नावांचे उखाणे– पण रुखवताशी संबंधित असलेले, असे असतात. रुखवत म्हणजे काय ? हे प्रथम स्पष्ट करायला हवे. हे रुखवत म्हणजे वरपक्षाकडील मंडळीसाठी वधूपक्षाच्या स्त्रीवर्गाकडून तऱ्हेतऱ्हेचे खाद्यपदार्थ, मिठाया, कलाकुसरीचे खाद्य-प्रकार व देणगीची ताटे असे दुरडच्या भरून आणले जाते व ते समारंभाने विहिणी ऊर्फ इहिनी उघडून पहातात, त्याचे वर्णन् पतीनामांत गुंफले जाते. इतकेच नव्हे तर रुखवत, कोणी कायकाय उंची प्रकारचे आणलेले आहे, यांचेही उल्लेख या उखाण्यातून असतात, कधी पंचक्रोशीतल्या गावांची नावे गुंफून ही उखाण्यांची माळ लांब केलेली असते; कधी लग्नसमारंभातील विधीचे वर्णन, तर कधी रुखवतातील पाने, विडे, कपडा, दागिने, व इतर वस्तू कुठून आणवल्या तेही वर्णन येते. अर्थात यातही जावयांची, व्याह्याची चेष्टा वगैरे असते, पण एकंदरीत हे निरुपद्रवी रुखवत– उखाणे. निव्वळ विनोद असला तर असला यात, तोही खुपणारा नव्हे तर गाली हसू आणणारच.

दुसरा प्रकार म्हणजे रुखवताची गीते. हीही वर्णनपर असतात व त्यातही उत्तम वर्णन वा व्याजोक्तिने, वक्रोक्तिने, केवळ वर्णन असे दोन प्रकार असतात. या गाण्यातली वर्णने पाहिली तर रुखवतावर फक्त खाद्यपदार्थ ठेवले जातात असं दिसत नाही तर, तऱ्हेतऱ्हेची फळे, ओटीचे सामान, खण– नारळ, हळदीकुंकू व क्वचित साड्या-चोळ्यांचीही सणगे यात समाविष्ट केलेली दिसतात. जावयाला एवढे मोठे कन्यादान केलेले, आता त्यावरची दक्षिणाही अशी घसघशीत व अतूट अशीच असायची, नव्हे काय ? तर त्याचीही रंजक पण वैभवशाली वर्णने या गाण्यातून येतात– किंवा थट्टाकुचेष्टा व टवाळी केलेलीही वर्णनगीते काही येतात. अर्थात ही थट्टा-

टवाळी, कुचेष्ट, उपहास हे सारे प्रकट करणारी गाणी दोन्हीपक्षीय करवल्या मुली, बायका वगैरे म्हणतात. या रूखवतात मिष्ट जिन्नस असतात तसे तिखटमिठाचे खमंग जिन्नसही बरोबरीने असतातच, तद्वतच ही गाणी– गोड स्तुतीची वा थोड्या सौम्य कुचेष्टेची, त्यातली गम्मत ओळखून घ्यायची, रागवायचे नाही, असा संकेत दिसतो.

तिसऱ्या प्रकारचे रुखवत– साहित्य मात्र भलतेच धारदार ! खरे म्हटले तर वरपक्ष व वधूपक्ष दोन्हीकडची मंडळी आपापसात रुखवताच्या माध्यमाने वाग्‌युद्धच करतात म्हणा ना ? वाग्‌युद्ध असे म्हटले मी, पण येथे शस्त्रेअस्त्रे फक्त शब्दांचीच असतात व भूमिका रणवैराची नसून विनोदाची असते इतकेच. एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढून निंदा, उणेदुणे हुडकून त्यावर टीकास्त्र सोडणे, किंवा वरपक्षातील व्यंगावर आधारित विनोदगर्भ उखाणे घेणे, हे सारे या तिसऱ्या प्रकारात चालते– नुसते चालते असे नव्हे तर रात्र रात्र हे 'वाग्‌युद्ध' चालते व रंगते पण !

अर्थात येथेही उखाणे असतात– चांगल्या लांब शब्दमालेचे पण वधू-वरांच्या नावाने प्रधानपुष्प मात्र यात गुंफलेले नसते तर रुखवतावरलचे उपहासपूर्ण वर्णन हेच या वात्रट उखाण्यांचे उद्दिष्ट ! बहुधा नवऱ्याची बहीण (करवली) ईहिनबाई, याही (व्याही) ननंद, यांवर हे शरसंधान असते. ते कोण ऐकून घेणार ? त्यावर उत्तरेही उखाण्यातूनच व तशाच ठसकेबाज भाषेत दिली जातात ! हे वाग्‌युद्ध खरोखरच रंजक व अगदी लोकनाट्यातल्या 'सवाल-जबाबा'ची आठवण करून देण्याएवढे खमंग खुसखुशीत शब्दात चालते ! मग वरपक्षीय लोकही प्रत्युत्तरे देतात व वधूच्या बहिणी उर्फ करवल्यांची उखाण्यातून हजेरी घेतात ! कधी कधी वर-वधूंच्या रूपागुणाची तुलनाही उखाण्यातून निंदाव्याजोक्तिने केली जाते. रोखठोक बोलणी होतात, जेवणावळीत जेवणारांचे हात थांबतात व मन उत्कटपणे ही कृतक कलहाची बोलणी ऐकू लागते ! तर असे हे रूखवत रंगीत (रंगणारे) व संगीत पण ! पहायचे का यातले काही नमुने ? पहा, हा ग्रामीण मेवामिठाईचा एकदम वेगळा नमुना, आपणास स्वादिष्ट वाटतो की नाही ते ?

●

प्रथम आपण यापैकी रुखवताचेच, पण नवऱ्याचे नाव गुंफलेले असे उखाणे बघू. रुखवताच्या दुरडचा वहुधा रुमालाखाली झाकलेल्या असतात, त्या पतीचं नाव घेऊन विहिणीनी अगर इतर वरपक्षीय स्त्रीजनांनी उघडायच्या असा एक रिवाज आहे. हेही उखाणे चांगले लांबलचकच असतात. उदा. एक वरमाय ठसक्याने नाव घेताहेत, ऐका हं–

बोलणं करतासा ठासून। पण अंगुळ न्हाई केली घासून !
बोलनं करताय् राहून राहून। पन् काम करत न्हाई जीव लाऊन !
तुम्ही आलायसा नटतथटत– पन मला न्हाई पटत।
तुम्ही आलायसा सजून। पन् मला येतीया थंडी वाजून।
मला उभं राहवेना ताठ। म्हून आमचं यादवराव आल्याती–
सोडाया रुखवताची गाठ ॥

वरमाय– विहिणीची प्रकृती नीट नसल्याचा हा उखाणा मात्र नीट-नेटका आहे की नाही ? भाषा बघितलीतना कशी रोखठोक व अधिकार-दर्शक आहे ती ? पण एके ठिकाणी हे रुखवत कसल्या कसल्या प्रकारांचं होतं याचेही सुरेख साजरे वर्णनही आढळून येते– ते हे–

'आलं आलं रुखवत मांडवाच्या दारी आत काय काय परी ?॥
'शेवया साजूक, तेलच्या नाजूक–।'
'पानाच्या पट्ट्या, खोबऱ्याच्या वाट्या।'
'गुळाचे खडे उडदाचे वडे।'
'पापड हारोहारी घारी सजुरी।'
'बुंदीबरफी सजुरी। जिरे साखर रायपुरी।'
'शेंडीसकट पाच नारळ, देठासकट पिकली केळं।'
'द्राक्ष अंजीर रामफळं, करनी केली धनसंपत्तीच्या बळं।'
'मी रुखवत उघडते खडाखडी आणि संपतरावांचं नाव घेते;
रुखवतावर ठेवा आधी चोळीपातळाची घडी।'

एकंदरीत रुखवत आणायचे त्यात पक्वान्ने, खमंग खाद्ये, फळे, ओटीचे सामान एवढेच नव्हे तर लुगडचाची सणंगेही हवीत असे दिसते अर्थात हे उखाणे सामोपचाराचेच आहेत. तसेच रुखवत अगत्याने आणल्याबद्दल

'ईनबाईची' खुपीही त्यात उमटलेली दिसते. येथे कशाला वाद नि वादळ होणार आहे ?'

मराठमोळा घरातून पुष्कळदा सख्खे भाऊबहीणच व्याहीविहीण होण्याची रीत पूर्वापार चालत आलेली आहे. कधी बहिणीच्या मुलाला भावाची मुलगी दिली जाते तर कधी भावाच्या मुलाला बहीण आपली लाडकी 'मैना' विधीपूर्वक देते. येथे तर काय व्याही, वरमाय सगळीच एका घरची नात्याची मंडळी ! तेव्हा भांडणाऐवजी हक्काची 'मागणी' वरपिता भाऊ आपल्या बहिणीजवळ करू शकतो. कोणती कोणती आहे ही मागणी ? त्याचा, पतीचे नाव गुंफून एक लांब उखाणाच बहीण घेते आहे तो हा–

'बंधु इवाही, मागतो कंठी–कडे, भावजई मागती सोन्याची चीप ।'
'कंगणी पाटलीवाणी आमच्या सोनूबाई मैनाईचं रूप ।'
मग घडीवल्या घोसवाळचा, घोसबाळचाचे फासे झाले रुंद ।'–
'इहीनीबाई मागत्यात द्या बाजुबंद ।'
'बाजूबंदाला दिलं लावून सुरेख गोंडे ।'
'पिवळचा पातळावर दंडे ।'
'इहीनीला हवी लाल साडीचोळी, हिरवा राघुरंग ।'
'या चोळीवर बसवली भिंगं । जीव होतो बगुन दंग ।'
'चोळीवरी कानडी कसुदा, काढते कुसर करून–'
'अन्, हैबत पाटलांच्या नावाचं कुंकु लावते कोरून ।'

यावरून सख्खे भाऊबहीण 'इहीनीयाही' झाले, तरी मानपान हा व्हावाच लागतो, व तो चांगला भारी व भरदार असतोच असतो हे ध्यानांत यावे ! आणि का भावजयगुजरीने तशी नन्दाबाईकडून अपेक्षा ठेवू नये ? तिचं घर 'शंभर पायऱ्यांचं,' आल्यागेल्याचं, आहे. घरी मळा शेतीवाडी आहे अन् नवरदेवही अंगठीवरच्या खड्याप्रमाणे किंवा तोळबंदी (दंडातल्या वाकी) च्या सोन्याच्या भोवऱ्याप्रमाणे तोलामोलाचा, महत्त्वाचा आहेच मुळी ! एक वरपक्षाकडील धिटुकली करवली रुखवत उघडतांना 'जावय-बापूंच्या' थाटामाटाचे वर्णन पतीनामाच्या लांब उखाण्यांतच घेतेय् पहा, ऐकता जरा ?

' काय वं जावयाचा थाट ? अंगुळीला चंदनाचा पाट । '
' धोतराला हायती जरीकाठ–अत्तराचा घमघमाट ।
' कसा नवरदेवाचा चालण्याचा झोक ? गळा सोनियाचा गोफ ।
' हातामंदी हिरेमाणकाची मुदी । शमला जरीचा उदी ।
' मांडवात लई शोभून दिसतुया, शंभरदोनशे माणसामंदी ।'
' तुम्ही रुखवत आणलंय परोपरी, तवा जावई करतील न्यारी
' –पर हवे होते रुखवतावर पेढे अन् खवा–।'
' सरजू पाटलांचं नाव घ्येते, अन् रुखवत उघडते घ्येनात ठेवा । '

काय ? आले का ध्यानात नीट हे प्रकरण ?

एकंदरीत भावजय वा नणंद, कोणीही वरमाय बनलेली असो तिचा वधू पक्षाकडून रीतीप्रमाणे योग्य आदरसत्कार हा झालाच पाहिजे, हे सर्व स्त्रीजन जाणून असतो व त्यादृष्टीने वधूकडील स्त्रिया दक्ष असतात. विहिणी नाराज होऊ नयेत म्हणून मुलीची आई व वधुपक्षाकडच्या समंजस स्त्रिया किती अगत्याने व परोपरीने सुरेख, स्वादिष्ट, रुखवत सिद्ध करतात याचे हे एक नितांतसुन्दर वर्णन पहावे. यात रुखवताच्या पदार्थांबरोबर संबंधित मंडळींचेही आपुलकीने भरलेले उल्लेख आहेत–

' रुखवत आणलं । नाजुक साखरफेण्या ।
नवरी राजकन्या । '
रुखवत आणलं । निऱ्या वाटोळ्या मालत्या ।
कोण मानाच्या चुलत्या ?
रुखवत आणलं । लांब सुतळी सेवाया ।
सुगरिणी भावजया ।
रुखवत आणलं । करंज्या लाडू बहू ।
वरमाय कोठे पाहूं ? ।
रुखवत आणलं । गोड अनारसे फार ।
कोण वरमाय थोर ?'

किती सोज्वळ वर्णनगीत आहे हे ! त्यात कुठे कुचेष्टेचा सूर सुद्धा नाही. उलट विहीणीबद्दल आदरयुक्त भाषा, त्या कशाला रागवतील या प्रेक्षणीय व नितळ रुखवतावर ?

पण या गीतांतून कधी कधी विनोदाची पखरण होते, ती, गरीब घरची मुलीकडची मंडळी विहीणींच्या रुखवतापायी जवळची सारी तुटपुंजी पुंजी संपवून टाकतात त्यावेळी. पुढील एक मजेदार गीत तसेच.येथे विहीणबाई पण 'लई मंजी लईच मागनी करनाऱ्या' भेटल्या आहेत व गरीब गृहिणीचे सारे पैसे समाप्त होताहेत, कसे ? ते विनोदी वर्णन बघावे–

आलं आलं रुखवत रुपै काढले बारा ।
ईहीन मागती हाराडेरा !
ततं एक खरचला, मंग ऱ्हायले अकरा ।
ईहीन मागती शिंगाडी बकरा–।
मंग एक खरचला ! मंग ऱ्हायले दहा ।
ईहीनबाईला चोळी केली पहा–।
ततं एक गेला–मंग ऱ्हायलं नऊ ।
इहीनीचं आलं भाऊ, त्यासाठी ध्येटलं गहूं ।
तवां एक रुपया खरचला । मंग ऱ्हायलं आठ ।
ईहीनीला घ्येतलं ज्येवाया ताट । तवा एक गेला ।
मंग ऱ्हायलं सात–इहिनीचं आलं गोत– ।
ततं एक रुपया खरचला । तवां ऱ्हायलं सा ।
इहिनीचा आला बा । ततंच एक रुपया गेला ।
मंग उरलं पांच । इहिनीला घेतला बसाया माच ।
तवा उरलं चार–इहिनीला घ्येतला हार ! ।
मंग ऱ्हायलं रुपै तीन, ईहीनीला घेतलं जीन ! ।
तवा एक खरचला–तवां ऱ्हायले दोन ।
ईहीनीची आली भन । म्हून एक खरचला– !
आता उरला योक ! इहिनीचा हुता तान्हा ल्योक ।
त्याला घ्येतलं गाठलं, बारा रुपै बारा जागी आटलं ।
अन् यामंदी तुम्हाला काय अगंद वाटलं ? ।

या गरीब, हातावरचं पोट असणाऱ्या गृहिणीने बारा रुपये असे रुखवतापायी पाखरावानी उडवून दिले तेव्हा ईहीनीबाई खूष झाल्या असतीलच

' काय वं जावयाचा थाट ? अंगुळीला चंदनाचा पाट । '
' धोतराला हायती जरीकाठ–अत्तराचा घमघमाट ।
' कसा नवरदेवाचा चालण्याचा झोक ? गळा सोनियाचा गोफ ।
' हातामंदी हिरेमाणकाची मुदी । शमला जरीचा उदी ।
' मांडवात लई शोभून दिसतुया, शंभरदोनशे माणसामंदी ।'
' तुम्ही रुखवत आणलंय परोपरी, तवा जावई करतील न्यारी
' –पर हवे होते रुखवतावर पेढे अन् खवा–।'
' सरजू पाटलांचं नाव घ्येते, अन् रुखवत उघडते घ्येनात ठेवा । '

काय ? आले का ध्यानात नीट हे प्रकरण ?

एकंदरीत भावजय वा नणंद, कोणीही वरमाय बनलेली असो तिचा वधू पक्षाकडून रीतीप्रमाणे योग्य आदरसत्कार हा झालाच पाहिजे, हे सर्व स्त्रीजन जाणून असतो व त्यादृष्टीने वधूकडील स्त्रिया दक्ष असतात. विहिणी नाराज होऊ नयेत म्हणून मुलीची आई व वधुपक्षाकडच्या समंजस स्त्रिया किती अगत्याने व परोपरीने सुरेख, स्वादिष्ट, रुखवत सिद्ध करतात याचे हे एक नितांतसुन्दर वर्णन पहावे. यात रुखवताच्या पदार्थाबरोबर संबंधित मंडळींचेही आपुलकीने भरलेले उल्लेख आहेत–

' रुखवत आणलं । नाजुक साखरफेण्या ।
नवरी राजकन्या । '
रुखवत आणलं । निऱ्या वाटोळ्या मालत्या ।
कोण मानाच्या चुलत्या ?
रुखवत आणलं । लांब सुतळी सेवाया ।
सुगरिणी भावजया ।
रुखवत आणलं । करंज्या लाडू बहू ।
वरमाय कोठे पाहूं ? ।
रुखवत आणलं । गोड अनारसे फार ।
कोण वरमाय थोर ?'

किती सोज्वळ वर्णनगीत आहे हे ! त्यात कुठे कुचेष्टेचा सूर सुद्धा नाही. उलट विहीणीबद्दल आदरयुक्त भाषा, त्या कशाला रागवतील या प्रेक्षणीय व नितळ रुखवतावर ?

पण या गीतांतून कधी कधी विनोदाची पखरण होते, ती, गरीब घरची मुलीकडची मंडळी विहीणींच्या रुखवतापायी जवळची सारी तुटपुंजी पुंजी संपवून टाकतात त्यावेळी. पुढील एक मजेदार गीत तसेच.येथे विहीणबाई पण 'लई मंजी लईच मागनी करनाऱ्या' भेटल्या आहेत व गरीब गृहिणीचे सारे पैसे समाप्त होताहेत, कसे ? ते विनोदी वर्णन बघावे–

आलं आलं रुखवत रुपै काढले बारा ।
ईहीन मागती हाराडेरा !
ततं एक खरचला, मंग न्हायले अकरा ।
ईहीन मागती शिंगाडी बकरा–।
मंग एक खरचला ! मंग न्हायले दहा ।
ईहीनबाईला चोळी केली पहा– ।
ततं एक गेला–मंग न्हायलं नऊ ।
इहीनीचं आलं भाऊ, त्यासाठी घ्येटलं गहूं ।
तवां एक रुपया खरचला । मंग न्हायलं आठ ।
ईहीनीला घ्येतलं ज्येवाया ताट । तवा एक गेला ।
मंग न्हायलं सात–इहिनीचं आलं गोत– ।
ततं एक रुपया खरचला । तवां न्हायलं सा ।
इहिनीचा आला बा । ततंच एक रुपया गेला ।
मंग उरलं पांच । इहिनीला घेतला बसाया माच ।
तवा उरलं चार–इहिनीला घ्येतला हार ! ।
मंग न्हायलं रुपै तीन, ईहीनीला घेतलं जीन ! ।
तवा एक खरचला–तवां न्हायले दोन ।
ईहीनीची आली भन । म्हून एक खरचला– !
आता उरला योक ! इहिनीचा हुता तान्हा ल्योक ।
त्याला घ्येतलं गाठलं, बारा रुपै बारा जागी आटलं ।
अन् यामंदी तुम्हाला काय अगंद वाटलं ? ।

या गरीब, हातावरचं पोट असणाऱ्या गृहिणीने बारा रुपये असे रुखवतापायी पाखरावानी उडवून दिले तेव्हा ईहीनीबाई खूष झाल्या असतीलच

यात काय शंका ?

पण नेहमीच ग्रामीण विहीणी अशा खूष होऊन, रुखवतानंतर जेवण नीटपणे करतात असे थोडेच ? मग अशा लग्नांत, भांडणाची वेळ कधी आलीच नसती ! विहिणी, मानपान करणी, यात काही चुकलेलं दिसलं की रुसतात व जेवायला उठत नाहीत ! त्यांना बोलावून नीटपणी व्याहीभोजन करणं, हे किती कठीण व काळजीचे काम होऊन बसते, हे मुलीकडच्या मंडळीनाच विचारा जरा ! काही वेळा याहून खाष्ट विहीणी भेटतात व त्या वधूमंडपांत जेवायला आल्याच, तर दरेक जिनसाला अनेक नांवे ठेवून भरमांडवात मुलीकडच्यांना टाकून बोलतात. जी जी अपूर्वाईची खाद्ये वाढायला आणावी, त्याला त्या नावे ठेवतात व अखेर साफ जेवायचे नाकारतात ! अशांची समजूत घालता घालता नवऱ्यामुलीच्या बापड्या आई-बापांची अगदी त्रेधा उडून जाते ! मुलीकडचीच एक धिटुकली वऱ्हाडीण हा प्रसंग विनोदाने वर्णन करीत आहे. ते असे–

इहिनी आल्या जेवाया । बारा पायल्याच्या केल्या शेवाया !
' पर इहिनी बसंनात ज्येवाया । काय करू ! इहिनी उठंनात जेवाया ।
' बारा पायलीच्या केल्या पोळ्या । इहीनी म्हनत्यात किती ग शिळ्या?
' बारा पायलीच्या केल्या रोट्या । इहीनी म्हनत्यात किती व मोठ्या ?
' बारा पायलीच्या केल्या वड्या । तर म्हनत्यात फारच थोड्या ! ।
' बारा पायलीचं केलं भजं । इहिनी पुसत्यात, ' शिळं ? की ताजं ? । '
' केल्या धा पायलीच्या करंज्या–इहीनी म्हनत्यात माळावरच्या बुरंज्या !
' केले धा पायलीचे उंडे । तर इहीनी म्हनत्यात ' हायती माळावरचे धोंडे ।
' बारा पायलीचा केला भात । इहीनी लावीनाती त्येला हात ।
' सांगा, काय करू ! इहिनी बसेनात ज्येवाया ! ! '

यातला अतिरंजितपणाने उत्पन्न होणारा विनोद वजा केला तरी वराच्या आईने म्हणजे विहिणीने नाही ते हट्ट करणे म्हणजे मुलीच्या आईबापांना, एक प्रकारचा केवढा मनस्ताप, हे प्रत्ययास येते. अर्थात जशास तसे, न्यायाने काही ठिकाणी मुलीची आईही इतकी वस्ताद भेटते की ती असल्या असंतुष्ट विहिणींना हजार सबबी सांगून रुखवताच्या देणग्या द्यायचेच टाळते. कसे ?

बघायचे आहे ? तेही वर्णन एका विनोदी गाण्यात आले आहे, ते असे–

'मी काय करनीची इहीन नव्हते ? करणारीच हुते–।
'अन् अजुनबी काय काय करीन म्हनतेच की ।।
'इहिन आली पावनी, करू म्हटलं रोटी। तर गहू खपलीच्या पोटी।
'करू म्हटलं भात तर तांदुळसाळी, अंबाराच्या आत !'
'विहीनीला जेवन करीन म्हटलं पोळ्याचं–।'
'तर पानी आटलंय् तळ्याचं अन् रेडकू मेलंय् कोळ्याचं।'
'मी काय करनीची इहीन न्हवते कीं करनारी न्हवते ?' ।। १ ।।
'इहीनीबाई आली पावनी, घेऊ म्हटलं छानसं लुगडं।'
'तर चाट्याचं दुकानच व्हवतं उघडं।'
'इहीनीची भरू म्हटलं ओटी, तर वाण्याकडे न्हवती खोबऱ्याची वाटी।'
मी काय करनीची इहीन नव्हते की करनारी व्हवते ?' ।। २ ।।
'इहीनीला घालीन म्हटलं कांकनं–।'
'तर कासाराला आलंय् दुखनं।'
'मी काय करनीची इहीन न्हवते की करनारी न्हवते ? ।। ३ ।।
'इहीनीला घ्याव्या म्हटलं छानशा चपला बाजारी।'
'तर चांभार पडलाय आजारी–।'
'इहीनीला करू म्हटलं सोन्याचं गोट। तर सोनाराचंच मोडलंय् बोट ।। ४ ।।
'मी काय करनीची इहीन नव्हते ? करनारीच हुते की–'
'अन् अजुनबी काय काय करीन म्हनतेच की।'

पाहिलंत, कशा हुलकावण्या देऊन विहीणींना देणग्या देण्यात नन्नाचा पाढा म्हटला जातो ते ? वरमाय तशीच ठसक्याची असली तर या कुचेष्टेच्या शब्दांनी तिथे कलह पेटतो व लग्नघर गरजू लागते हा भाग वेगळा.

वराकडच्या विहिणीची निंदा करणारी व तिचे तुच्छतेने व्यक्तिदर्शन घडवणारी, पण विनोदी गाणीही बरीच आढळतात, त्यांचेही मूळ, विहीणबाईना कितीही द्या, काहीही द्या, त्या खूष म्हणून होत नाहीत, या कटु

अनुभवातच असावे !

इहिनबाईची व्यक्तिगत विनोदी वर्णने पुष्कळच. उदा :–

इहिनबाईचा उपास आहे हं, तर त्यांच्या आहाराचे हे एक मिस्कील वर्णनगीत पहाण्याजोगे आहे–

शिवरात्रीचं पारणं । करते जिवाच्या कारणं–
नऊ नारळ– वत्तीस केळं । द्राक्ष अंजीर सीताफळं ।
काशी भोपळा । इहिनीनं फराळ केला ।
वळंबळं खाल्ली पोतंभर भगर । पोटभर खारका ।
मग इहीन गेली मळ्याला । उसाच्या रसाचा रांजण पेली ।
ततं एक गुळाची ढेप खाल्ली । चार पायली खाल्ले शेंगदाणे ।
मणाच्या भाजल्या राजगिऱ्याच्या लाह्या– तरी म्हनतीया–
'जाता इवाहीदादा तुम्ही खजुरीचं पोतं आनाया ?
की मी बसू धपाटे खाया ?'

यातली अतिशयोक्ती विनोदाने ऐकणाराला हसायला लावणारी; शेवट तर फारच मजेशीर. इतके सगळे उपासाचे पदार्थ खाऊनही इहीनबाईचं पोट भरलं नाही, ती 'धपाटे' म्हणजे एक प्रकारची थालीपीठे (ही उपासाचीही असतात.) खावी काय ? या विचारात आहे.

अर्थात विनोदाने का होईना, पण जिचा असा प्रचंड आहार वर्णित झाला ती वरमाय (इहीन) प्रकृतीनंही भल्या प्रशस्त बांध्याची व देहाची असणारच– (असते असे नव्हे, पण तसे गृहीत धरून कुचेष्टेची गाणी रचली गेली आहेत) येथे सर्व शरसंधान इहीनबाईच्या 'मस्त' प्रकृतीवर आहे व हे वर्णन उपहासशब्दांनी व्यक्त झाले आहे. हे गीत मुलीकडच्या गोतांतील कुणी चावट वऱ्हाडीण मोठ्याने म्हणते आहे हं, तेव्हा हुश्शार, ऐका जरासं–

'इवाही म्हने माझी इहीन रोडावली ।'
'घेतले बारा खन, त्याची केली चोळी ।'
'माझ्या इहीनीच्या अंगाला तंगच झाली' ॥ १ ॥
'सोळा हात साडा– त्यावर बारा हात नाडा ।'
'पर इहीनीच्या कमरेला झाला येकच वेढा !' ॥ २ ॥

संबंध २७०२ २७५९

बारा बैलांचा जुंपला गाडा–
पर इहीनबाई बसल्या– तोंडी तुरला गाडयाचा लावी ॥ ३ ॥
आणि तरी इवाहि म्हन– [illegible] !।

असली निंदाव्यंजनेने भरलेली गाणी ऐकून स्थूल प्रकृती 'इहीनीच्या भिवया रोषाने चढल्या नाहीत तरच नवल ! । अर्थात्, असले शब्द थट्टेचे असले तरी ते त्रस्त मनाचे द्योतकच ठरणारे नाहीत काय ? आणि मग या त्रासातून की काय, विहीणीब्याह्यांचे असेच आणखीही उपहासगर्भ उपरोधपूर्ण वर्णन करायची मुलीकडच्यांना जणू स्फूर्ती येते. मग जेवणावळी पक्वान्नांनी सजतात व बोलण्यांनीही ! अशा प्रकारची ही गाणी व परस्परांना जाब–साल विचारणारे उपरोधिक उखाणे, यांना दोन्ही बाजूंनी सुरुवात होते. दोन तट पडतात– माहेरकर स्त्रिया व सासरकर स्त्रिया, प्रश्न व उत्तरे झडू लागतात. एकीमेकींना उद्देशून खोचक बोलणी, उखाणे सुरू होतात. त्यातली वर्णने बहुधा अतिरंजित व भाव बहुतांशी कुचेष्टेचाच असतो– जणु मार्मिक व यथातथ्य प्रश्नोत्तरांचा तो एक बौद्धिक खेळच. मात्र त्यांत मूळ हेतू केवळ विनोद व मनोरंजन, चेष्टा हाच एकच एक असल्याने हे असले उखाणे मनात ठेवून घेऊन कुणी रुष्ट होत नाही. जणू तोही खेळीमेळीच्या लग्नसमारंभातला एक अटळ व गमतीचा विधिच समजला जातो. मुलीकडच्या फटाकडच्या पोरी भराभर उखाणे घालतात– वरपक्षीय स्त्रियाही वाक्पटुच ! त्या काय म्हणून ऐकून घेतील ? त्याही उत्तराला प्रत्युत्तर योग्य ते ठेवून देतात– अन् यालाच मी वाग्युद्ध म्हटले आहे. पुढील नमुना पहा–

'मांडवाच्या दारी रुखवत साखरेच्या पाकाचं ।
हळूच बसा ईनबाई, लुगडं हाय लोकाचं ॥'
'आलं आलं रुखवत, त्यावर हुती चंची ।
भाडयाचं दागिनं घातलेली इहीन कोनची ?'

वारे वा ! हा आरोप कोण घेणार सोसून ? फटकन् ईनबाईकडच्या एका फटाकडचा करवलीचं उत्तर येतं–

आलं आलं रुखवत त्यावर हुतं दावं ।
आमच्या ईनीचं दागिनं घरचं कां दारचं, तुम्हाला काय ठावं ?

परत करवली म्हणते–

आलं आलं रुखवत, त्यात हुता खवा !
ईनबाईचं लुगडं धुतलं कवा ? तर ।
पानपतची लढाई झाली, तवा ! !
मग या चावट करवलीला विहीणबाईची वन्हाडीण बजावून देते–
आलं आलं रुखवत, त्यावर हुती पहार ।
नवऱ्याच्या बापानं तुमची मूठ केलीय चांगली गार– ।
तवां आता उगंच बोलू नका फार ! ।

अर्थात ती करवली गप्पच होते व' हे काय आक्रीत ऐकलंया ?' म्हणते. मग दुसरी एकादी मुलीकडची स्त्री भांडू लागते–

आलं आलं रुखवत, त्यावर ठेवला आकडा ।
जावई हाय फाकडा पन ईहीनीचा डोळा वाकडा ।।
किंवा– आलं आलं रुखवत, त्यांत हुती हिरवी नोट ।
ईन म्हन्तीया, साडीचोळी नको, मला द्या विजार न् कोट ।

आता तर सगळेच वन्हाड खुदुखुदु हसू लागलेले दिसते, डुईवरून पदर घेणाऱ्या मर्यादशील मराठमोळा सासूबाईची ही मागणी ऐकून ! ! मग वराकडच्यांचंही शरसंधान सुरू होतं– एक वराकडची खमंग वन्हाडीण म्हणते– अहाहा ! एवढं गाजतंय रुखवत खरं, पण काय, आहे काय त्यांत फतऱ्या ? अवं–

आलं आलं रुखवत, गल्लोगल्ली मिरवती ।
ईहीनी उघडून बघत्यात तर अर्धीच चपाती ! !

लगेच तिकडची एक फट्कळ बाई प्रत्युत्तर देते–

आलं आलं रुखवत शेल्यानं, झाकतमाकत– ।
अवं, अर्ध्या पोळी पायी, तुम्ही का बसलाय ठोकत ?।।

मग वराकडची मंडळी मुलीच्या आईवर घसरतात–

आलं आलं रुखवत, त्यात हुता मका ! ।
नवरीची आई बघतीया टकामका ।
अवं, कुनी तिला एक कानवला तरी टाका ! ।'

किंवा– ' ईन आली मांडवाच्या दारी, हाती तुपाची झारी !

' कुनाला वाढीना पोटभर, रिकामीच येरझारी ! !'

नाही तर मग नवरीच्या बहिण-भावाकडे या टवाळीचा रोख वळतो–

' आलं आलं रुखवत, त्यात हुती हरबऱ्याची डाळ ।
रुखवत भरनारी कुरोली. एक नंबरची नाटकसाळ ।
' आलं आलं रुखवत, खण होता पारवा ।'
' नवरीचा भाऊ म्हन्तोय, आद्दी माझंच लगीन ठरवा !'
' आलं आलं रुखवत त्यात साखरेचे पुडे–
नवरीचा भाऊ आपल्या लग्नासाठी कुढे, त्याला बोलवा पुढे !।
' आलं आलं रुखवत–त्यावर ठेवली सुई ।
नवरीच्या कुरोलीची टोपल्याएवढी डुई ।।

अन् मग खुद्द वधूवर तरी या टीकास्त्रांतून व विनोदाच्या तोफखान्यांतून वाचतील म्हणता काय ? नाव नको ! हे उखाणे त्या दृष्टीने पाहण्याजोगे आहेत. वधूपक्षाकडून उखाणा–

' आलं आलं रुखवत, त्यात हुतं मटार ।
नवरा मागतोय पांच हजारांची मोटार ! ।।

लगेच वरपक्षीय उत्तर–

' आलं आलं रुखवत, त्यात हुती तांदुळाची गोण ।
आम्ही देतोय मोटार ! पण चालवणार कोण ?

मग आणखी एक मुलीकडची स्त्री बजावून देते–

समूर होता कोनाडा, त्यात हुती लेखनी–
नवऱ्यापरीस आमची नवरीच लई द्येखनी !।'

पहा पहा ! आता हे तोऱ्याचं बोलणं वराकडच्या स्त्रिया बऱ्या ऐकून घेतील ? लगेच खमंग उत्तर येतं–

' आलं आलं रुखवत त्याच्या केल्या परोपरी ।
नवरी दिसतीया बरी, पर नीट नांदेल तवा खरी ! ।'

अशी नवऱ्यामुलीचीच गोष्ट निघाल्यावर वधूकडील एक ठमकाई म्हणते–

' आलं आलं रूखवत त्यांत हुतं घंगाळ ।
ईनबाई, आमच्या मुलीचा नीट करा संभाळ– ।।

' न्हाई तर आमच्या परडयांतला म्हसोबा हाय वंगाळ ।

अर्थातच युद्ध रंगात आले की दोन्हीं पक्षांचे वीर बेभान होतात व लढतात तसेच काहीसे होऊन या प्रश्नोत्तरास वैयक्तिक, शारीरिक व्यंगावर आधारित असे उखाणेही घेतले जातात उदा०–

आलं आलं रुखवत, त्यात होता ऊस ।
' आमची ईहीन जशी काळी घूस । '
' आलं आलं रुखवत, त्यांत होता अंड्याचा बलक ।'
' नवऱ्यामुलानं केसाला लावलाय काळा कलप–।'

मग चिडून तिकडुन वरपक्षाकडून, तट्कन उत्तर येतं–

असं का ? मग तुमची नवरी पण जशास तशीच आहे की ! –
' आलं आलं रुखवत, त्यात हुती मोडाची चवळी । '
' नवरीला बसवलीय् कालच दातांची कवळी ।'

अशाप्रकारे उखाणे घातले की दोन्ही पक्षी राग येणारच ! शारीरीक व्यंगावर आधारित असलेली बोलणी– तीही खोटी– ऐकून घेणेही कठीण होते ! विहिणींचा राग चढतो, व्याह्यांनींही कपाळाला शंभर आठ्या पाडलेल्या ! नवरा फणफण् करणारसं दिसतं ! मग मात्र दोन्हीकडची समजूतदार मंडळी पुढे येतात, मध्यस्थी करतात. होय, उगीचच राईचा पर्वत होऊन ह्या खोट्या खोट्या भांडणापायी वितुष्ट यायला नको दोन घराण्यात ! लग्नातल्या रूखवतांतली तीव्र बोलणी जेवणाचे हात धुता-धुताच मनातून पार धुवून टाकायला हवीत, हे खरं पण इक्त वंगाळ काय म्हन बोलावं जी ? मुलीकडची वडीलधारी मंडळी मग सांगतात– ' मंडळी थांबा– बस् ! '

' आला आला रुखवत गाडीच्या हेलाचा ।
आहाणा घालू नका येडाबागडा, सोईरा हाय
राजाच्या तोलाचा
आलं आलं रुखवत, त्यात ठेवला हलवा–
वऱ्हाड आनलं तसंच, चांगलेपणी घालवा ! '

बिचारी नवरीपण आता मर्यादेच्या अवगुंठनांतून डोकावीत म्हणते–

आलं आलं रुखवत, त्यावर वेल जाईचा ।

' कडू आहाणा नका घालू । रुखवत माझ्या आईचा ।

व वरपक्षाकडील कोणीतरी समजुतीने सांगते

' आलं आलं रूखवत– त्यात हुता लव्हाळा '

' वाकडं तिकडं नका बोलू, दोन्हीकडं आहे जिव्हाळा ।'

मग कुणीतरी खोटा पोक्तपणाचा आव आणून सांगते–

' आमचं काय वं ? पर नवरानवरीचच ज्यादा बोलनं चाललंय मघाधरनं ते वाईच ऐका की–!' नवरी म्हन्तीया–

' आलं आलं रुखवत ! जिन्नस हैती खायाचं पियाचं '

नवरी नवऱ्याला म्हन्तीया– आता वेगळं कधी न्हायाचं ?'

अन् नवरा सांगतोय्–

' आलं आलं रुखवत त्यात हायती गहू !'

नवरा नवरीला म्हणतोय, आपण उद्याच वेगळं राहू !'

ते बिचारे वधूवर ! वर हसतो, वधू लाजून खाली मान घालते व तिच्या ओठातून गहिरे स्मित डोकावू लागते. सर्वांचेच चेहरे हसरे होतात, प्रसन्न दिसतात. बोलूनचालून गमतीचे भांडण तेही रीतिरिवाज म्हणून रचलेले, नाटकच एक विनोदी जणू ! त्यांचा रागलोभ कुणी मनात ठेवतं थोडंच ?

एकंदरीत संकेत हा की हे भांडण, हा कृतककलह केवळ घटकाभरचं विनोदी रंजन, त्यातून गंभीर अर्थ काढायचा नसतो ! तरीपण वधूचे आई-वडील विनवून, हात जोडून वरमाय व वरपक्षीय लोक यांना म्हणतात,

' आलं आलं रुखवत त्यात हुत्या कळचा ।'

' कळचा गेल्या वाळून, आमची मुलगी आजकिंदी होती खेळून '

' इहिनबाई आता घ्यावं तिला सांभाळून !'

' आलं आलं रुखवत, त्यात आणली काफी '

' ईनीबाई, काय चुकलंमाकलं असलं, तर करा माफी ।'

बस्. मग आनंदात समारंभ पार पडतो.

*

तर असे हे रंगीत व संगीत रुखवत. यातले पतीनामाचे उखाणे, रुखवताचे उखाणे व रुखवतवर्णनाची गीते हे साहित्य आजही खेड्यापाड्यातून

वैपुल्याने व अतूट असे मिळते, ते संकलितही केले जात आहे. या रचनेला लोकसाहित्यात भावप्रकटनाच्या दृष्टीनेच अधिक महत्त्व द्यावे लागेल, शिवाय ते अस्सल ग्रामीण भाषेचे दर्शक आहे, हेहि विशेष ! विहिणबाईच्या मेजवानीत यांनी एक वेगळाच खमंगपणा येतो व लग्नसमारंभात विनोदाचे हसरे कारंजेही मधून मधून निर्माण होते हे कोण अमान्य करील ?

★

९ : लोकसाहित्यांतील विनोद

लोकसाहित्याचे लोककथा, उखाणे, ओव्या, लोकगीते हे जसे एकाहून एकेक समृद्ध विभाग आहे त,तसा त्यांतील विनोदी वाङमयाचाही एक स्वतंत्र प्रांत कल्पावा लागेल, इतकी त्याची समृद्धि मला आढळून आली. खेडचांतले लोकसाहित्य जमवतांना पुष्कळदां अशी काही गमतीची सामग्री मिळायची; की सांगणाऱ्यांचेही दांत मजेने लकाकू लागत सांगतासांगता, नि ऐकणाऱ्या मलाही हसू येई. आणि ही विनोदाची छटा ज्याप्रमाणे लोककथांवर झळकत असे, त्याचप्रमाणे स्त्री निर्मित लोकगीतांतूनही हिची गोडशी लुडबूड एखाद्या अवखळ पोरीप्रमाणेच चाललेली आढळून येई. कितीक ओव्यांतून, चार ओळींच्या चिमण्याशा मर्यादेतही, गालाला खळी पाडणारा हास्यरस निर्माण झालेला मी ऐकत असे तेव्हा किती आश्चर्य नि कौतुक वाटे मनाला ! वाटते, प्रतिभेची ही गमतीची विनोदी वेषभूषा खेडवळ असली तरीही खास चित्त-वेधक ठरणारी आहे. पडदा पाळणाऱ्या युवतींचे सौंदर्य कुणाच्या चट्दिशी नजरेस पडत नाही खरे, पण ते नसतेच असे नव्हे. उलट कित्येकदा प्रवासांत तर असा अनुभव येतो की, बुरखा सहज मागे उलटून टाकताच आपल्या रसरशीत चेहऱ्याने पहाणाराला स्तिमित करणारी एकादी सुंदरा, कोमलांगी युवती दृष्टीस पडते. साहित्यसुंदरीची खेडवळ वेषभूषाही अशीच ! परंतु या साध्याबाध्या वेषाआड दडलेले तिचे सौंदर्य सामान्य नाही, तर चित्तचोर

ठरणारे आहे उलट !

आपण पहातो, आज दरेक बोलपटांत, प्रत्येक नाटकांत, अनेक कथा-कादंबऱ्यांत, काव्यांत विनोदाला मानाचे स्थान देण्यात आले आहे. विनोद, गंभीर वातावरणामुळे मनावर पडणारा ताण कमी करू शकतो, वृत्ति समतोल ठेवू शकतो. विनोदाच्या सान्निध्यात मानसकळचा प्रफुल्ल करण्याचे अजब सामर्थ्य असते आणि म्हणूनच विनोदी विभागासाठी दैनिकांत नि साप्ताहिकांतदेखील मानाचे 'पान' राखून ठेवलेले आढळून येते, नाटकाच्या पहिल्या मानाच्या खुर्च्या जशा मानकऱ्यांसाठी राखीव असतात, त्याप्रमाणे विनोदाचे स्थान वाङ्मय-गृहात एखाद्या मानकऱ्यासारखे राखीव आढळते.

आणि याचेच थोडेसे वेगळे परंतु तितक्याच महत्त्वाचे रूप लोक-साहित्याच्या दरेक दालनात पहावयाला मिळते. मनुष्यस्वभाव घेतला तर तो शहरातल्या माणसाचा काय नि खेड्यातल्या लोकांचा काय, इथूनतिथून सारखाच की नाही ? मानवी स्वभावालाच विनोद प्रिय आहे, त्यामुळेच लोककथांतून हजारो जावयांच्या मूर्खपणाचे, गमतीचे विनोदी प्रसंग रंगले गेले आहेत. लोकगीतांतही कितीक विडंबने, कितीक हास्यके, कितीतरी उपरोधमिश्र जमती-गमतीची लयलूट बघायला मिळते. त्याचीच काही उदाहरणे रसिकांपुढे ठेवावीशी वाटतात.

लोकसाहित्याचाच एक छोटा विभाग म्हणजे भाषेत पूर्वापार चालत आलेल्या म्हणी व रूढ झालेले वाक्प्रचार यांचा. ग्रामीण व शहरी, दोन्ही बोलभाषेत हे दोन्ही प्रकार इतके रुळून गेले आहेत, की बस् बस् ! म्हणी बहुधा स्त्रीजनाच्या तोंडी अधिक असतात. यांची संख्या उमापच आढळते. लोकरीतीवर, मानवी स्वभावाच्या विचित्र छटांवर, आणि संसारात वा जीवनात नेहमी येणाऱ्या अनुभवांवर, या छोट्या म्हणी आधारित असतात, त्यांतही विनोदी म्हणी आढळून याव्या हे विशेषच नव्हे काय ? उदाहरणार्थ पुढील म्हणी पहाव्या–

१ अग माझी ऊ ! सर्व गोत तू !

२ आधी सूनसून– मग फुणफुण !

३ उतावळा नवरा गुडघ्याला गाशिंग !

४ 'भटोभटो, लग्न करा'– तर म्हणे तुम्हीच बायको व्हा !

वरील मासलेवाईक म्हणी लग्नाबद्दलच दिसतात, त्यावर निराळे फारसे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. फक्त पहिली, नवविवाहित पती, पत्नीला काय म्हणतो त्याबद्दल आहे व दुसरी, सासू नव्या सूनेबद्दल कसा विचार करते ह्याबद्दलची– अन् दोन्ही म्हणींनी सूचित केलेली दृश्ये व्यवहारात नित्य दिसणारीच !

आणखीही काही नमुनेदार म्हणी पाहू या. निरनिराळ्या स्वभावाची माणसे आपण व्यवहारात पाहातोच, त्यांतल्या काही स्वभावविशेषांवर या म्हणी, विनोदी आवरणातून उत्तम प्रकाश पाडणाऱ्या आहेत. उदा.–

१ घरात न्हाई दाणा– अन् मला कळीचं दातवन आणा !

२ घरात न्हाई अडका, बाजारात जायचा धूमधडका !

३ दमडीचा सौदा, अन् येरझारा चौदा !

४ अडक्याची बोहनी, बारा रुपयांचा गोंधळ !

पाहिलंत ? या सर्व म्हणी बाजारविषयक असूनही कशा विनोदाने मनुष्यस्वभाव स्पष्ट करणाऱ्या आहेत त्या ? खालील काही म्हणीही तशाच उपरोधगर्भ विनोदाने नटलेल्या–

१ पाटलाची सून– बटकीचे गुण !

२ चुली झाल्या दोन– तुम्ही आम्ही कोण ?

३ दुखणं जोरावर, पथ्य शेरावर !

४ शाब्बास रे वाघा– तुझी चुलीपुढे जागा !

५ नाकापत्तुर पदर अन् वेशीपत्तुर नजर !

६ जोडचानं हाणा पण मला पाटील म्हणा ! !

७ अडाण्याचा आला गाडा– वाटेवरची शेते काढा !

या सर्व मजेदार म्हणींबद्दल आणखी लिहायला नकोच. त्यांचा अर्थ, त्यांतून सुचवले जाणारे विनोदी स्वभावाचे वा वर्तनाचे सत्यसृष्टीतले नमुने, तुम्हाला या म्हणी वाचतावाचताच आठवू लागतील, अशी समर्थता व स्पष्टता आहे या म्हणींत.

या म्हणींचाच मोठा भाऊ शोभणारा प्रकार म्हणजे आपल्या बोल-भाषेत रूढ झालेले वाक्प्रचार. हे कधीकधी लहानशा वाक्यात असतील तर कधी पाच-सात चटकदार वाक्यांतही एकत्र असतील, ह्यातही विनोद

आढळतो. त्याचे काही नमुने येथे पाहू.

खेडोपाडी काही वाक्यसमूह– विनोदी वाणाचे– असे उच्चारले जातात, अर्थात् तेही लोकस्वभावाचे विश्लेषण करणारेच. त्यातले जरा अधिक व्याप्तीचे असे काही वाक्यसमूह येथे विचारात घेतले आहेत. हे गद्यात असूनही यमक साधण्याची यांत खटपट दिसून येते, तो प्रकार कदाचित नाविन्याने वाचकांना अधिक रुचणारा ठरावा.

उदा. एके ठिकाणी, मी एका म्हाताऱ्या खाष्ट सासूबाईंशी त्यांच्या क्षेमकुशलाची वार्ता करीत होते. मी सहज त्यांना कसे काय चालले आहे ?' म्हणून प्रश्न केला. त्यांनी रागाने उत्तर केले.

' अहो, आमचे काय विचारता ? आम्ही फार वाईट माणसं ! ' अहो आम्ही सासू, सासू म्हणजे पिसू, ज्याला त्याला डसू, ज्याच्या त्याच्यावर रुसू, भुतावाणी दिसू ! आम्ही डोळ्यातलं कुसू, सगळ्या लोकांत झालं हसू, अशा आम्ही सासू, काही नका पुसू !

अन् मग मी चकित तर झालेच पण ओठातले हसू लपवताना मला पुरेवाट झाली ! दुसरा एक प्रसंग असाच. पुष्कळदा खेडेगावातल्या सुना लहान वयाच्या पोरी असतात (अजूनही !) जुन्या पद्धतीच्या व मराठ-मोळी घरातून मानमर्यादा पाळण्याचेही तंत्र पुष्कळच. ते सर्व ह्या मुलीना पाळावे लागते, म्हणून, एका छोटुल्या सासुरवासणीला ' सासरी सगळ्यांना अगदी क्षुल्लक किंवा लहानसे कुणी जरी तेथे असले तरी त्याला ' अहो जाहो ' करूनच बोलायचं असतं. हे लक्षात ठेव !' म्हणून माहेरून येताना उपदेश दिला गेला होता. सून एका पहाटे उठून सासरी अंगणात सडा घालायला लागली तर अंगणात एक कुत्रे बसलेले ! त्याला हाकलायचे ते एकेरी शब्दांनी थोडेच ' हड् ' म्हणायचे ? सासरचे कुत्रे आहे ना ? मग तिचे विनोदी शब्द अगर वाक्य ऐकाच जरा–

ती नम्रपणे कुत्र्यास उद्देशून म्हणते– ' अहो उठा, हडाना ! ' अहो हडा ! मी घालते सडा, पाणी फेकते भडभडा, तुमच्या अंगावर उडेल शितोंडा, मग सासुबाई बोलतील मला फडाफडा म्हणून तुम्ही अंगणातून हडा ! '

असली ही वाक्ये खेडेगावी स्त्रीसमाजात पुष्कळदा म्हटली गेलेली कानी

यतात व वक्त्या श्रोत्या स्त्रियांच्या ओठात ' एकादी तरी स्मितरेषा ' उठवून जातातच. पुढील श्रीमंत पण महाकंजुष गृहिणीचे वर्णनही अशाच पद्धतीचे. या गृहिणीने सणावाराचे गोडधोड एकदा केले तर त्यात किती गोष्टी साधल्या एक़ाच वेळेस, त्याचे हे वर्णन :– ' सणांत सण, डोहाळतुलीला खण, नवऱ्या-मुलीला केळवण, बाळंतिणीला पाठवलं जेवण, न्हाणवलीला दिलं वाढून,'[1] अन् उरलंसुरलं मोलकरणीना दिलं काढून ! '

थोडक्या शब्दांत पण विनोदी तऱ्हेने सांगितलेले हे स्वभावविशेष नोंद करण्यासारखे आहेत.

*

लोकसाहित्यातील विनोदी प्रकरात उखाणे उर्फ आहाणे हाही विनोदाची परिपोष करणारा एक विभाग आहे. हे उखाणे तीन-चार प्रकारांचे असतात

१) पतीचे नाव मैत्रिनींना सांगतांना त्या भोवती यमकयुक्त शब्दपंक्ती रचून सांगण्याचा प्रकार. हे ग्रामीण व शहरी अशा दोन भिन्न तऱ्हेते असतात.

२) रुखवताच्या वेळी वर–वधू, दोहो पक्षातल्या वऱ्हाडणी एकमेकींना विनोदी उपरोधिक वा सरळ उखाणे घालतात, ते रुखवताचे उखाणे.

३) मुलीबाळीत झिम्मा फुगडया, पिंगा वगैरे देशी महाराष्ट्रीय खेळ पूर्वपरंपरेने चालत आहेत, त्या खेळांना छोटया छोटया नादमय, सयमक व ठेक्याच्या शब्दरचनेची-गद्यगीतासारखी-साथ असते, तो प्रकार ' खेळाचे उखाणे. '

पैकी पहिल्या[2] व दुसऱ्या[3] प्रकाराच्या उखाण्यांबद्दल, मी दोन विस्तृत लेख स्वतंत्र लिहिलेले, याच पुस्तकांत, अत्यत्र आहेत. त्यात विनोदी उखाण्यांची उदाहरणेही आली आहेतच, ती पाहिली की विनोदी वाङमयाचा हा काहीसा अनोखी पणा लोकप्रिय प्रकार खेडयापाडयातून आजतागायत किती उत्साहाने जोपासला जात आहे, याची कल्पना येईलच.

---

१) खेडेगावात पूर्वी न्हणवली मखरात बसवत. तिला आणि शेजारच्या बाळंतिणीला ' ताट ' वाढून देण्याची गृहिणीची पद्धत होती.

२) जानपद उखाणे.

३) असे ही संगीत रंगीत रुखवत.

तेव्हा त्याची पुनरुक्ती न कळता तिसऱ्या प्रकारात येणाऱ्या विनोदी उखाण्यांचा विचार करणे योग्य. वर उदधृत केलेले मुलीचे खेळ, त्यातल्या लहान लहान पद्यमय शब्दसाथीने खूपच रंगतात व ह्यांतही बालसुलभ विनोदाची पखरण आढळते तीही गमतीची असते. आज ह्या खेळांचे महत्त्व अनेक विदेशी खेळापुढे उणावलेले (निदान शहरात तरी जास्तच प्रमाणात) दिसते. अर्थात खेळच मागे पडत चालले, तर, त्या खेळांची साथ करणारे छोटेमोठे उखाणे वा गद्यगीते सर्वांना माहीत असण्याची शक्यता कमीच. पण खेडोपाडी अजूनही हे खेळ हौसेने खेळले जातात, व त्यावेळी जोडीदारीणीला मजेदार उखाणे घातले जातात. पैकी विनोदी उखाण्यांची ही काही उदाहरणे नमुनेदार ठरतील :–

अ) फुगड्या घालता घालतां म्हटले जाणारे :–

१) फुगडी फू बाई, फुगडी फू !
माझी लुगडी धू, सई लुगडी धू !

२) पाटा बाई पाटा, चटणी वाटा
एवढ्याशा ठकीचा ठमकाराचा मोठा.

३) पैशाची वांगी साडेतीन मण–साडेतीन मण !
माझ्याशी फुगडी खेळतं बूटबैगण !

४) चिपाड बाई चिपाड रानोमाळी चिपाड.
दादानं वायको केली आपल्याहून धिप्पाड !

५) दारी हुती केळ, तिला दिला धपाटा
बाबासाबांची सून हाय् लवंगी फटाका.

इत्यादी इत्यादी. बहुधा या उखाण्यातला सारा रोख मैत्रिणीला वहिनीला वगैरे चिडवण्याचा असतो, ही रचना बालसुलभ असते व विनोद उथळ असून तो शारीरीन व्यंगावर वा स्वभाववैशिष्ट्यावर आधारीत असतो, त्यामुळे तो मूलीच्या अल्लडवयालाच शोभून दिसणारा आहे.

झिम्मा हा खेळ फुगडी इतकाच कन्याप्रिय. हा टिपऱ्यांच्या अगर नुस्त्या टाळ्यांच्याही साथीने मुली खेळतात. यालाही चुटकेवजा छोट्या लयबद्ध गीतांची वा कवनांची साथ असते व विशेष गोष्ट ही की, या कवनातही विनोद विखुरलेला आढळतो. फुगडीत जसे विनोदाचे शरसंधान मैत्रिणी

वहिनीवर, तसे झिम्मा-पिंगा या खेळातला विनोदाचा मारा बहुधा मामावर असलेला आढळतो. उदा–

'पिंगाबाई पिंगा, चवळीच्या शेंगा–
चवळीच्या शेंगाना दाणाच नाही–
मामाच्या लेकीला नाकच नाही !!

किंवा, झिम्यापैकी एका प्रकारांत म्हटले जाणारे हे विनोदी गद्य पहावे–

किस्बाई किस, दोडका किस।
माझ्यानं दोडका किसवेना।
मामाला बायको करवेना !।
मामानं बायको केली मुंबई शहराला नेली !
खांद्यावर घेऊं की डोक्यावर घेऊं ?

अशी ही, नव्या बायकोचे लाड करणाऱ्या– पण आपला आवडत्या मामावरची गीते. त्यातला हा प्रच्छन्न विनोद, खेळ पहाणाऱ्या वडीलधाऱ्यांनाही कौतुकाने हसवणाराच !

मुलींच्या खेळातच त्यांचे हादगा, भोंडला व भुलाबाई, यांचे वार्षिक उत्सव गृहीत धरणे बरे. हादगा भोडला हा अनुक्रमे सोळा व दहा दिवस व भुलाबाई एक महिनाभर बसवतात. मुली टिपऱ्यांच्या तालावर फेराची गाणी म्हणतात. गाण्यांची मूळ रचना कोणी केली कोण जाणे, ती पूर्वापार चालत आलेली आहेत, एवढे खरे. आपल्या विषयानुरोधाने पहाता, यांतही काही विनोदी, गाणी आढळली, ती पाहू. या उत्सवाच्या कांही गाण्यामधून मुलींच्या सासरकरांवद्दल रोष प्रकट झाला आहे, पण तो रोषाने नव्हे, तर चेष्टेच्या, टवाळीच्या, अगर उपहासगर्भ विनोदाच्या आवरणांतून ! उदाहरणार्थ यातले सासरकराचे हे वर्णन पहावे. हे प्रश्नोत्तररूप आहे व तरीही गेय आहे:–

सासू कशी ? सासू कशी ?
टिचकन् मारायची पिसू जशी, पिसू जशी।
सासरा कसा ? सासरा कसा ?
रहाटाचा कासरा जसा ! कासरा जसा।

दीर कसा ? दीर कसा ?
खराटचाचा हीर जसा! हीर जसा ।
नणंद कशी नणंद कशी ?
भाताची कणगी जशी । कणगी जशी ।
अन् पती कसे ? पती कसे ?
देव्हाऱ्यातले देव जसे, देव जसे ।।

सासरकरांच्या कंजुषपणाचेही वर्णन हादग्याच्या आणखी एका गाण्यातून मोठचा विनोदी तऱ्हेने प्रकटलेले आहे ते असे–

दमडीचं तेल आणलं ।
सासुबाईचं न्हाणं झालं ।।
वन्संबाईची वेणी झाली ।
मामंजीची दाढी झाली !।
उरलेलं तेल झाकुन ठेवलं ।
लांडोरीचा पाय लागून सांडून गेलं ।
वेशीपर्यंत ओगळ गेला– त्यांत हत्ती वाहून गेला !!

किती अतिशयोक्तिचे व उपरोधपूर्ण वर्णन आहे हे ! आणि सासरच्या मंडळींबद्दल सरोष चेष्टेची वर्णने जशी या गाण्यांतून प्रकट झाली आहेत तद्वत् माहेरबद्दलच्या उमाप आपुलकीचीही गाणी पुष्कळ आढळतात, त्यांत चेष्टा नाही, तर उलट आदर व सन्मान, हेच व्यक्त होते. याबद्दलचे एकच उदाहरण पाहिले तरी पुरे. उदा. ही सासुरवासीण पोर एकदा आजारी झाली आहे, असा प्रसंग. मग सासरचा वैद्य आला, त्याच्या औषधाने गुण पडेना, तेव्हा मग माहेरचा वैद्य आणला गेला, दोन्ही वैद्यच, पण एक सासरचा तर दुसरा माहेरचा, म्हणजे जमीन अस्मानचा फरक होता त्यांच्यात ! कसे दिसले बरे ते त्या मुलीला? अगदीच वेगवेगळे. सासरचा वैद्य अगदी हास्यास्पद दिसत होता ! ते वर्णन पहावे. काही ओळी अशाः–

माझ्या सासरचा वैद्य आला ।
त्याला बसायला लंगड घोडं ।
त्याचं धोतर फाटकं-तुटकं !।
त्याच्या पायांत तुटका जोडा ।

त्याच्या हातात जळकं लाकूड ।
त्याच्या कपाळी शेणाचा टिळा ।
दिसतो कसा ? रंकावाणी ।।

उलट माहेरचा वैद्य ? तो कसा आहे बरे ? वा ! तो तर माहेरचा माणूस तो कसा रद्दी असणार ? त्याचे वर्णन कशा गहिऱ्या शब्दात केलं आहे, वरील वर्णनाशी तोलून पहाण्यालायकच आहे–

माझ्या माहेरचा वैद्य आला
त्याला बसायला निळा घोडा
त्याचं धोतर रेशीमकाठी !
त्याच्या पायांत पुणेरी जोडा
त्याच्या मुखांत रंगला विडा !
त्यच्या कपाळी केशरी टिळा !
त्याच्या हातात रंगीत रुमाल ¡
दिसतो कसा– राजावाणी ! !

पूर्वी मुली पोरवयांतच सासरी-जावयच्या, तेव्हा तेव्हाचा सासुरवासही कडक तऱ्हेचा असायचा, तो सोसणाऱ्या मुलींच्या मनात सासरकरांबद्दल रागरोष असणे साहजिकच, व त्याच मनोभूमिकेतून ही अशी त्यांच्या चेष्टेची वा उपहास व्यक्त करणारी गीते रचली गेली असावीसे दिसते. मात्र ऐकणाऱ्या वडीलधाऱ्या स्त्रिया गालातल्या गालात हसून, या गाण्यातील विनोदी वर्णनाचे कौतुकच करतात, कारण 'सासुरवास 'ही पूर्वी त्यांनी अनुभवलेलीच स्थिती असते ना ?

स्त्रीनिर्मित ओवीगीते हाही लोकसाहित्यातला एक महत्त्वाचा विभाग आहे मात्र त्यात विनोदाच्या छटा अल्पस्वल्प प्रमाणांत आढळतात; खरे म्हटले तर, ही गीते बहूधा कौटुंबिक भावभांवनावर, वा कृषिजीवनावर आधारित असतात; अर्थात् त्यांत प्रीती जिव्हाळा, स्त्रीमनाची कातरता, किवा त्यांचा मत्सर, तसेच वत्सलता, सहृदयता, इत्यादी भाव अधिकांशाने प्रकट झालेले असतात. त्या मानाने विनोद अगदीच कमी आढळतो. पण तो असतो व तोही बहुधा आपल्या परिसरातल्या परिचित मंडळींच्या स्वभावाचे एकेक नमुने ओव्यातून सहज वर्णनात येतात त्यातूनच जास्त उमटून पडून

रसिकांचे मन वेधून घेतो. पुढील काही ओव्या त्या दृष्टीने पहाण्याजोग्या ठरतील:–

उदाहरणार्थ– एकादे हौशी पतिराज लाडक्या पत्नीची हौस पुरवून पहातात, पण 'करायला गेलो एक अन् झालं भलतंच' या म्हणीप्रमाणे परिस्थिती वेगळीच होते ! त्याचं हे वर्णन–

हौशानं हौस केली, राणी ममईला नेली।
कोळशाची पाटी, तिच्या डोईवरी दिली ! ॥

किंवा विहीणबाईंच्या 'सुगरण'पणाचा हा निर्देश पहावा–

ल्येकाचं लगीन, इहिनीबाई हायती लई सुगरिनी'
बारीक तांदुळाचा भात, क्येलाया खीरीवाणी !

तसेच एकदा जवान पती आपल्या 'नाजुकनार' पत्नीचे येता-जाता कौतुक करीत असतो. आणि सदा जीव खालीवर करतो त्यातली 'गंमत' सांगणारी एक ओवी–

पोटभर खातापितां, नारीला येतं हीव।
हौशा भरताराचा, घाबरा होतो जीव ! ॥

खेड्यापाड्यातले लोक पूर्वी सर्रास दोन-दोन बायका करायचे. दोन बायकांच्या नवऱ्याची दयनीय स्थिती, इसापनीतिपासून कथाविश्वांत, नाटक कादंबऱ्यांतून आजवर वर्णित झालेली आहेच, त्यालाही ओवीगीते अपवाद नाहीत. 'त्यांची' हकीकत पुढील विनोदी ओव्यातून स्पष्ट झाली आहे:–

पाण्यापावसाची आभाळाला आली खारी।
हौशाला दोन नारी– पलंग टाकीतो बाहेरी ! ॥
एका बायकोचा कंथ– जेवी मजेत तूप-भात।
दोन बायकांचा कंथ– त्याची भांडणात सरे रात ! ॥
दोन बायकांचा पती, भारी हौस या गड्याला।
घरी मिळेना ऊन पाणी, करी अंघूळ ओढ्याला।

याच उदाहरणांचा दुसरा प्रकार म्हणजे 'म्होतुर' लावण्याची तऱ्हा. म्होतुर म्हणजे विधवेशी लग्न. नांदती बायको घरी असूनही, म्होतुराची तयारी रंगेल वा रगेल पती करू लागतो, तेव्हा, ही गोष्ट प्रथम पत्नीला किती सलणारी व किती राग आणणारी कथा व व्यथा ? पण या

रागावरही मात करून ही गोष्ट उपरोधउपहासाने एकादी गृहिणी मैत्रिणींना सांगताना आढळते. अभावितपणेच विनोद निर्माण होत असतो, उदा०

दळन दळते, गहु हरभऱ्याचं !
अवं ! म्होतुर माज्या कारभाऱ्याचं !!

या ओवीप्रमाणेच अत्यंत कुरूप नवऱ्यावर विनोदगर्भ टीका स्पष्टतेने करणाऱ्याहि काही ओव्या आढळतात ! खरे म्हणजे पती कसाही असो, त्याच्या कर्तृत्वाचं, रूपाचं, भरदार बांध्याचं वर्णन या ओव्यातून एरवी फार जिव्हाळ्यानं गौरवाने केले जाते, पण काही स्त्रियांनी याला अपवादात्मक ओव्याही रचलेल्या आढळाव्या हे नाही का नवल ? यापैकीच ही उदाहरणे. खोडकर स्वभावाची पत्नी म्हणते.

माज्या महालाच्या दारी जोडा वाजे चुणुचुणु– !
सासू आत्याबाई, तुमचं वांदर आलं जणु !!

किंवा :–

मावळन सासूबाई, तुमचा कुसवा सुंदर
पैदा केलं माझ्यासाठी– दिल्लीचं वांदर !!

अर्थात अशी ही उदाहरणे फारच अल्प असतात हे मान्य करायला हवे.

●

लोकसाहित्यातच स्त्रीनिर्मित गेय गीतांचा अंतर्भाव होतो. ही 'माजघरातील स्त्रीगीते' म्हणजे मागल्या पिढीच्या स्त्रियांनी रचलेली व स्त्रीसमुदायांत समारंभप्रसंगी वा सणावारी गायली जाणारी गीते. तीही मौखिक-परंपरेने आजवर चालत आली आहेत. ही बहुधा पौराणिक प्रसंगावर आधारित असतात, भक्तिभावाने रचलेली दिसतात. भक्ती श्रद्धा, यांत खरेतर विनोदाला स्थान फारसे नसतेच, तरीही, काही गाण्यांतून, हाताबोटांवर मोजण्याएवढेच शेलके विनोदाचे नमुने आढळून येतात, उदाहरणार्थ– या देवादिकांच्या गाण्यातच 'पार्वतीचा संसार' नावाचे एक गीत शंभर वर्षांपूर्वीचे आहे, त्यात राजकन्या पार्वती आपलं वैभवशाली माहेर सोडून सासरघरी प्रथमच आली, श्रीशंकराचे घर म्हणजे संन्याशाची कुटी ! तेथे पाऊल ठेवतांच पार्वतीला घर कसे दिसले ? याचे वर्णन विनोदी पद्धतीने केलेले आहे, ते असे।–

घरभरणीचे पहिले दिवशी, घरात पाहूं आली–।
फुटकी पाळी, फुटकीच मडकी, फुटकी दगडी थाळी ॥
कंथा काठी, विभूत, भोपळा, घर हे 'चंद्रमौळी' ॥१॥
भांग तमाखू– लोटा, घोटा, यांचा मोठा साठा
विशाल पाटा, वरी वरवंटा, दारी नंदी मोठा
अहा कटकटा ! दैव दृष्टा ! जन हे करिती चेष्टा ॥२॥

अशा या गाण्याचे अखेरीस पार्वतीला शिवाने त्रैलोक्यसुंदर महालात रहायला नेल्याचे वर्णन आले आहे व त्यामुळे विरोधाने पहिल्या दोन कडव्यातला विनोद अधिकच गहिरा झालासा वाटतो.

अति खादाड माणसे हा वाङ्मयांत व व्यवहारांत, नेहमीच चेष्टाविषय बनलेला दिसतो. यासंबंधीचे एक विनोदगीत निर्जला 'एकादशी' या नावाचे आहे. 'एकादशी अन् दुप्पट खाशी' अशी विनोदी म्हण आहेच, तसेच यातले वर्णन ! वस्तुतः एकादशी म्हणजे कडकडीत उपवासाचा दिवस ! कोणीतर निर्जला एकादशी करतात, म्हणजे अन्न तर घेत नाहीतच पण त्या दिवशी पाणीही पीत नाहीत. अशा एका निर्जला एकादशीच्या हट्टा उपासाचे हे वर्णन पहावे– उपास करणारी स्त्रीच हे सांगतेय्–

कडकडीत निर्जला । एकादशी आहे मला ॥ध्रु॥
वऱ्यांचा साखरभात, बदामाचा शिरा त्यात–
केशराचा वास द्यावा, वेलदोडे थंडाईला ! ॥१॥
करी खारकेची खीर, दाणे कुटुनी लाडु कर ।
पेढे-बर्फी पावशेर, हलवाई देऊन गेला ! ॥२॥
शिंगाडयाची दशमी करी, बटाटयाची भाजी बरी ।
थालीपीठ तव्यावरी, उशीर फार झाला ॥३॥
आलें-आवळचाची वडी, तळी रताळ्याच्या फोडी
थोडा मोरावळा वाढा, नाही तर पित्त होई मला ! ॥४॥

का ? कसा आहे हा 'उपवासाचा' चमचमीत बेत ? सुमारे ६०–७० वर्षांपूर्वी चहाचा प्रवेश महाराष्ट्रात घरोघर झाला होता, तो एक नवे पेय म्हणूनच. त्याच्या नवलाईवरही एक जुने स्त्रीगीत त्याकाळी कांही स्त्रिया म्हणत असत, तेही विनोदी भूमिकेतूनच रचले गेले आहेसे दिसते. ते असे–

मोहिले चहाच्या पायी । मन वेडे झाले बाई ।।ध्रु।।
चित्तास करी संतुष्ट । देहाचे हरितो कष्ट ।
भूलोकी अमृत श्रेष्ठ, त्यापरीस दुसरे नाही ।।१।।
मैत्रिणी बसा या येती । जरि चहां न केला पुढती
' अशी साखर कितीशी सरती ? । रिति तिला नकळे ' वदती
तो एक चहाचा पेला । दृढ करितो मित्रत्त्वाला
अनुभव हा बहुतेकाला । लटिके न वदे मी काही ।

रचना निश्चित स्त्रीची व साधीसुधीच, पण वर्णन विनोदी आहे.

माजघरातल्या स्त्रीगीतांत विनोदी गाणी एकंदरीत कमीच पण त्यातलेच काही लक्षणीय नमुने वर दिलेले आहेत. या खेरीज सीतास्वयंवरास आलेले चमत्कारिक प्रकृतीचे एकेक राजे व शिवधनुष्य उचलताना त्यानी प्रकृतीच्या सांगितलेल्या हास्यास्पद सबबी, किंवा एका ' मुरली ' नावाच्या गाण्यांत ' मुरली ' ऐकताच गोपीनी ' भाळी ल्याळी काजळ, डोळी भरी कुंकुम, पदिं माखी कस्तुरी ' इत्यादि उलट-सुलट शृंगार घाईने केला ते वर्णन, किंवा पार्वतीने शंकराचे विनोदी व विरोधी सखीजवळ गमतीने केले आहे, त्यातही परिस्थितिजन्य विनोदाच्या काही छटा मधुन-मधुन अवश्य आढळतात, त्या सुंदर साडीवरच्या नाजूक वेलपत्तीसारख्या आकर्षक वाटणाऱ्या आहेत. '[१]

*

लोकसाहित्यांतील गद्यप्रांतातही विनोदाचे उद्यान बहरलेले असतेच; उदा. लहानमोठे विनोदी चुटके (ज्याला हास्यके अगर हास्यकथा असे नाव आजकाल रूढ झाले आहे, ते) लहानांपासून थोरांपर्यंत मित्रमंडळींत सांगितले जातात; पण त्यांतही ग्रामीण जगांतली हास्यके मोठी मजेदार ठरणारीच. नमुन्यादाखल असा एक चुटका इथे दिला आहे–

' एक खेडूत आपल्या बालमित्राकडे शहरांत भेटायला गेला होता, बालमित्र श्रीमंत झालेला होता, सुरेख दगडी घर त्याने बांधले होते. फरशीचा व्हरांडा होता व एक मोठा उग्र कुत्राही तेथे दाराशी होता. खेडूत मित्राकडे

(१ ही सर्व उदाहरणे याच पुस्तकांत ' स्त्रीची मौलिक गीते, यांत मी दिलेली आहेतच.)

लक्ष जाताच कुत्रा जोरात भुंकू लागला व त्याच्या अंगावर धावून येऊ लागला तशी गावकरी मित्राने मोठ्याने मित्राला हाक मारली. मित्र धावत आला व त्याने कुत्र्याला एका खोलीत बंद केले. व आपल्या बालमित्राचे स्वागत केले. पण गावकरी मित्र उद्‌गारला– 'काय तुम्ही शहरी मानसं चमत्कारीक वं ? इथं दगडं बांधून ठिवता सोप्यात अन् कुत्र्याला मोकळं ठिवता? मंग लई ब्येस !'

पण आजकाल अशी मजेदार हास्यके वा चुटके यांचेही संग्रह अनेक प्रसिद्ध होत आहेत, तेव्हा त्याबद्दल विवेचनाची आवश्यकता नाही. यापेक्षाही लोकांचे विशेष आवडते वाङ्मय म्हणजे खेडोपाडी सर्रास सांगितल्या जाणाऱ्या लहानमोठ्या लोककथा. कुठेही पहा, विनोदी कथा ऐकायला श्रोत्यांना फार आवडतात म्हणूनच की काय, अनेक कथांतून या विनोदाचे उपायन रसिकांना सादर केलेले दिसते. त्यातही कांही भिन्न प्रकार आहेतच. उदाहरणार्थ– अज्ञानी, भोळसर, अगर बावळट जावयांच्या कथा ! या कथा आकाराने अगदी छोट्या, पण त्यांची संख्या मात्र खूपच मोठी आढळते. खरे म्हणजे या बालांना अगर कुमारांना प्रिय व्हाव्यात अशा विनोदी कथा, पण त्या बालांबरोबर वृध्दांच्याही गालात हसू उमटवणाऱ्या दिसतात. पहा ना, या जावई कथेतले जावई किती विक्षिप्तराव असतात एकेक, ते ! यातले कुणी जावई आपले 'दिवसा जेवणाचेवेळी भूक नाही !' म्हणून प्रतिष्ठितपणे सांगायचे, पण रात्रीतून जबरदस्त भूक लागल्याने, सासुरवाडीच्या सैंपांकघरात जाऊन मिळेल ते चोरून खाणारे असतात. तर कोणी अगदी सांगितल्या शब्दाचे व सासुरवाडी वाटेल ते बोलून फजिती करून घेणारे ! अर्थात एक ध्यानात घ्यायला हवे, कीं पूर्वी बालविवाह होते, अर्थात हे जावईही त्या मुलीहून जराशी मोठी मुले असेच असत, व सासुरवाडीला जाताना या पंधरासोळा वर्षाच्या मुलाला त्याची आई वा पालक, 'असे असे बोलावे' असे शिकवूनच पाठवीत असत! त्या पोपटपंचीतूनच जावयाचे अज्ञान वा, असमंजसपणा उघड होत असायचा ! उदाहरणार्थ एक जावईकथा पाहूया–

एक जावई पहिल्यांदाच सासुरवाडीस निघाला, बराच भोळसर, बाजार-भावांची, किंवा व्यवहाराची माहिती जवळजवळ नाही, असा. त्याच्या

आईला फार चिंता पडली, कसं होईल याचं त्या परक्या घरी ? तिने म्हटले–' मुला, तुला सासुरवाडचे लोक खूप प्रश्न विचारतील, बाजारभाव तर लोक नेहमीच विचारीत असतात भेट झाली की. काय सांगशील ? '

' काय सांगूं ? तूच सांग. मला कुठे ठाऊक आहेत बाजारभाव ?'

' अरे, मग तुझा अडाणीपणा कळेल कीं त्यांना. असं कर त्यांनी काही वस्तुंचा भाव विचारला की तूही तेथल्या त्या जिनसांचा भाव विचार अन त्यांत थोडं मागे पुढे किंवा कमी जास्त करून सांग. हे बघ, त्यांनी तांदुळ कसे शेर ? म्हटलं, की, तू म्हण, ' इथे कसे आहेत ?' ' चार आणे ' असं उत्तर आले तर तू म्हण- आमच्याकडे स्वस्त आहेत– दोन आण शेर !' नाहीतर आमचकडे महाग आहेत तांदुळ, पाच आणे शेर ! असं सांगायचं. समजलं ना ?' ' छान समजलं.' जावई म्हणाला व गेला सासुरवाडी.

तेथे बाजारभावांचा प्रश्न निघालाच व हे ' हुशार ' जावई आधी तेथल्या जिनसांचा भाव विचारून त्यांची बेरीज वा वजाबाकी करून उत्तर देऊ लागले ! चलाख मंडळीच्या हे लगेच ध्यानात आले, येणारच. सांगितलेली पोपटपंची चतुर माणसाला उमजतेच, मग तो माणूस शहरी असो वा, खेडूत असो ! तेथल्या एका धूर्त लबाड कुमाराने हे ओळखून प्रश्न केला–

' जावईबापू ! आपल्याकडे केशराचा काय भाव ? कसे मिळते ?'

' इथे कसे विकतात ?'

' महाग आहे. रुपयाला शेरभर ! तिथे ?'

' अबब ! किती महागाई इथे ? आमच्याकडे तर आठ आणे शेर मिळते केशर.'

आणि हे उत्तर ऐकताच सर्व मंडळी खूप हसली ! अशी जावयाची फजिती झाली कीं, काय सांगावे ?

अर्थात हा केवळ बोलण्याचाच वेडेपणा हा जावई करतो असं नाही. कोणी मठ्ठ असतात, कोणी दुबळे, कोणी अडाणी तर कोणी आडमुठे. अशाच निवडक जावयांच्या ह्या हास्यकथा निर्माण झाल्या आहेत. अशांच्या कथा शेकोटीजवळ बसून खेड्यांतला कथक वृद्ध सांगतो व श्रोतमंडळीत हास्याची खसखस पिकत असते.

खरे तर, ऐकणाऱ्या लोकातला प्रत्येकजण 'जावई' झालेला तरी असतो, अगर होणार तरी असतोच, पण तरीही अर्धवट बुद्धिच्या जावयाच्या या फजितीकथा ऐकण्याचा मोह आबालवृद्धांना असावा, ही नाही का गम्मत ?

ह्या छोट्या छोट्या विनोदी लोककथाप्रमाणेच कुमारवयाला रुचणाऱ्या बऱ्याच मोठ्या व्याप्तिच्या परीकथाध्येही विनोदाचे कोवळे प्रसन्न ऊन आढळून येते. संपूर्ण विनोदी लोककथांचे प्रमाण यांत एकंदरीत कमीच वाटते, पण लोककथा परिकथा, अद्‌भुतरम्यकथा, यात अधूनमधून प्रसंगनिष्ठ विनोदाची पुष्कळ उदाहरणे मिळतात, शिवाय अतिशयोक्ती हाही प्रकार 'विनोदपरिवाराचाच एक सदस्य असतो, त्याचाही अवलंब केल्याने कथांतून अभावितपणे विनोदनिर्मिती होते, त्याचेहि नमुने कमी नाहीत ! उदा. अतिशयोक्तिपूर्ण वर्णनाचा हा एक प्रसंग पहावा:–

या लोककथेत काही अदभुत फळे वर्णिली आहेत, एका फळाचा गुण असा की ते खाल्ल्यावर त्या खाणाराचे 'नाक' आपले लांबत जायचे ! ते कोठपर्यंत ? कांही विचारूच नका ! एका 'नाक' या अद्‌भुत कथेत नायिका एक राजकन्या होती, तिने फसवून लुबाडले होते म्हणून कथेतल्या नायकाने चिडून हे असले फळ तिला खायला दिले, असा प्रसंग आहे. अर्थातच राजकन्येचे नाक लांबू लागले ! किती ? येथेच तर विनोदाची खरी गम्मत पहाण्याजोगी आहे. एका कथेत हे नाक इतके लांबले की एक दासी सतत ते (नाक) खांद्यावर घेऊन संभाळीत राजकन्येपुढे चालू लागली, तर दुसऱ्या या कथेच्या अशाच पर्यायांत राजकन्येचे नाक महालाच्या खिडकीबाहेर पडून सापाप्रमाणे वळवळत बागेच्या रस्त्यावर गेले व तेथे चालणारे लोक घाबरून 'ते' ओलांडून जपून चालू लागले, असे वर्णन आहे ! हे वर्णन वाचून त्या नाकेल्या राजकन्येची कीव येण्याऐवजी गमतीने हसू येण्याचीच शक्यता जास्त ! या असल्या रूप बदलणाऱ्या फळांचाच एक वेगळा प्रकार म्हणजे, ते खाल्ल्यावर खाणाऱ्याचे नाक लांब व्हायचे नाही, पण त्याचे सरळ गाढवात रूपांतर व्हायचे ! एका अशाच प्रकारच्या लोककथेत नायकाने या फसव्या, लबाड व चोरट्या राजकन्येला हे फळ झोपताना खायला दिले, व सकाळी ती चक्क गाढव बनली की ! पण खरी

मजा पुढील वर्णनात दिसते–

'सकाळी एक दासी ऊन पाणी, तस्त वगैरे घेऊन आली, व 'तोंड धुवायला पाणी आणले आहे, उठावे सरकार!' म्हणून म्हणणार तो काय! राजकन्या तेथे नाही. उलट एक गलिच्छ गाढव राजमहालात उभे! 'काय? राजकन्येच्या महालात एक गाढव? मेल्या, चल निघ इथून! लाज नाही वाटत इथे उभे राहायला?' इत्यादी शिव्या गाढवाला देत तिने काठीचे रट्टे मारीत त्याला बाहेर काढले!' आणि हे वर्णन ऐकतांना बाल व कुमार श्रोते खदखदून हसतात हे अनेकदा पाहण्यातही येते!

ही नर्म विनोदाची छटा या कथांतून पुष्कळदा अशा कथांतून समयोचित वर्णनातून उमटते, याचे आणखी एकादुसरे उदाहरण सांगण्याजोगे आहे– उदाहरणार्थ 'निळा पोपट' या एका परीकथेत, एक दुष्ट जादूगार असतो, त्याने राजकन्येला मागणी घालायला निघालेल्या एका राजस देखण्या राजपुत्रावर रागावून त्याचे ते सुंदर रूप एका घोड्याच्या रद्दी व आडदांड मोतद्दाराला दिलेले आहे असा प्रसंग आहे. आता राजाचे रूप त्या घोडेवाल्याला दिले गेले खरे, पण त्या राजपुत्राचा स्वभाव, सवयी, सद्गुण इत्यादि सगळे बदलून त्या मोतद्दाराला देण्याची शक्ती त्या जादूगाराच्या जादूत नव्हती, त्यामुळे रूप राजाचे पण सवयी रानवटाच्या असे मोतद्दारसाहेब राजधानीत राजमहालात उतरले येऊन. मग काय विचारावे! त्याने खायला घोड्याचे किंवा रेड्याचे मांस मागितले! मग तो झोपला, व प्रचंड स्वरांत घोरू लागला– ते त्याचे घोरणे इतके मोठमोठ्या आवाजाचे, की ती सगळी राजधानी त्याबरोबर भूकंप झाल्याप्रमाणे हादरत होती!!'

वरील व्यक्तिवैशिष्ट्यावर आधारलेल्या विनोदाचे आणखीही एक-दोन छोटे नमुने वाचकांपुढे मांडण्याजोगे ठरतील... उदा. एका नाजूक राजकन्येचे वर्णन एका लोककथेत अतिशयोक्तिपूर्ण आले आहे; राजकन्येचा नाजुकपणा किती? तर 'शंभर गुलाब फुलाएवढेच' तिचे वजन होते? अगर फक्त पाच फुलांनीच तिची 'तुला' रोज होत असे, असेही या गोष्टीच्या दुसऱ्या एका पर्यायात सांगितले गेले आहे. मनात येते, ही पाच 'फुले' केळफुले तर नसतील ना? अति खादाडपणा हेच वैशिष्ट्य असलेल्या एका अद्भुत माणसाच्या बोलण्यातूनही 'सहा सोबती' या कथेत असाच

एक अभावित विनोद निर्माण होताना आढळतो. एका राजाने शंभर माणसांचे तयार अन्न एका खोलीत ठेवून, 'ते, एकट्याने एका वेळी खाऊन फस्त केल्यास' बक्षीस लावले होते. हे खादाडराव या खोलीत आनंदाने शिरले– व आपल्या सोबत्यांना त्यांनी विनवून सांगितले–

'अरे, तुम्ही सारे बाहेर जा. माझ्या जेवणाला दृष्ट लागते !' या शब्दांनी कोणास हसू येणार नाही ?' कुक्कुटमणी' नावाच्या एका लोककथेत एक अद्‌भुत इच्छामणी आहे, जे मागावे ते देणारा हा दिव्य मणी नायकाजवळून कुणीतरी चोरून नेला व तो उंदीर राज्यातल्या दोन उंदरांनी सापडून दिला ! मग नायकाने देवाला प्रार्थना केली :– 'देवा, हे सद्‌गुणी उंदीर पिंजऱ्यात कधीही न सापडोत. यांना मांजराची दृष्ट कधीही न लागू दे आणि यांच्या मुखात कोणी, विषारी गोळ्या घालून विघ्न न आणोत !' हा प्रासंगिक आणि शाब्दिक विनोद वाचकांना अगर श्रोत्यांना मनास येतो, व गमतीने हसू येते. अशी ही उदाहरणे अशा लोककथांतून आढळतात, पण ती वैपुल्याने नसतात, त्यांची संख्या हाताबोटावर मोजण्याइतकीच.

●

तर असा हा लोकसाहित्यातील विनोदाचा प्रांत, ग्रामीण विश्वांत अधिकांशाने विकसित झालेला आढळतो त्याचा थोडासा परिचय, रसिक साहित्य प्रेमी मंडळींना करून देण्यापुरतीच काही थोडी उदाहरणे मी या ठिकाणी उद्‌धृत केली आहेत; पण लोकसाहित्याच्या सर्व प्रकारांत मिळून ही उदाहरणे वैपुल्याने आढळतील हे सांगायलाच का हवे ?


REFBK-0022702

सांरेता प्रकाशन । वरदा बुक्स
'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

आमची लोकसाहित्यविषयक प्रकाशने.

सौ. मालती दांडेकर

- वाङ्मयशारदेचे नुपूर
- देशविदेशच्या परिकथा (दहा भाग)

दुर्गा भागवत

- लोकसाहित्याची रूपरेखा
- भारतीय लोककथामाला (३१ पुस्तके)
- सिद्धार्थजातक खंड १ ते ७

ह. अ. भावे । रा. चिं. ढेरे

- संपूर्ण पंचतंत्र
- वेताळ पंचविशी

वरदा बुक्स 'सेनापती बापट मार्ग, पुणे १६'